# एस . वाय . बी . ए .

## राज्यशास्त्र - भारतीय राजकीय विचार

# घटक १
# राजा राममोहन रॉय

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.२.१ जीवन परिचय

१.२.२ सामाजिक विचार

१.२.३ धार्मिक विचार

१.२.३.१ ब्राह्मो समाजाची स्थापना

१.२.४ राजकीय विचार

१.२.४.१ वृत्तपत्र स्वातंत्र्य आणि मुद्रण स्वातंत्र्यासंबंधी विचार

१.२.४.२ कायद्यासंबंधी विचार

१.२.५ शैक्षणिक विचार

१.२.६ आर्थिक विचार

१.२.७ राजा राममोहन रॉय यांच्या विचारांचे परीक्षण

१. ३ स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न

१. ४ सारांश

१. ५ पारिभाषिक शब्द

१. ६ सरावासाठी प्रश्न

१. ७ संदर्भ सूची


## १. ० उद्दिष्टे

या घटकाच्या अध्ययनातून पुढील उद्दिष्टे साध्य होतील.

१) राजा राममोहन रॉय यांची विचारसरणी जाणून घेता येईल.

२) रॉय यांच्या विचारसरणीवर असलेला प्रभाव अभ्यासता येईल.

३) भारतीय समाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी रॉय यांनी केलेले प्रयत्न जाणून घेता येतील.

४) रॉय यांचे सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, व शैक्षणिक व अन्य विचार अभ्यासता येतील.

५) रॉय यांना आधुनिक भारताचे जनक म्हणून का ओळखले जाते हे जाणून घेता येईल.

## १. १ प्रस्तावना :–

१९व्या शतकाच्या पूर्वार्धात भारतात प्रबोधन युगाला सुरुवात झालेली होती. धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात सुधारणा चळवळ सुरू झाली होती. राजकीय क्षेत्रातही सुधारणेला सुरुवात झाली होती. या सुधारणा चळवळीत राजा राममोहन रॉय यांचे मोठे योगदान आहे. म्हणून राजा राममोहन रॉय यांना आधुनिक भारताचे जनक म्हणतात.

## १. २ विषय विवेचन :–

### १. २. १ जीवन परिचय :–

राजा राममोहन रॉय यांचा जन्म बंगालमधील राधानगरी या गावी २२ मे १७७२ रोजी झाला. त्यांच्या घराण्याचे मूळ आडनाव बॅनर्जी होते. रॉय यांचे पणजोबा कृष्णचंद्र बॅनर्जी हे मुर्शिदाबादच्या नबाबाच्या दरबारी आधिकारी होते. त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना 'रॉयरॉयल' असा किताब त्यांना देण्यात आला होता. तेव्हापासून हे घराणे 'रॉय ' या नावाने ओळखले जाऊ लागले.

राजा राममोहन रॉय यांना दिल्लीच्या बादशहाने आपली बाजू मांडण्यासाठी इंग्लंडच्या राजाकडे पाठविले. तेव्हा त्या बादशहाने त्यांना 'राजा' हा किताब बहाल केला. तेव्हापासून ते राजा राममोहन रॉय या नावाने ओळखले जावु लागले.

राजा राममोहन रॉय यांचे वडील रमाकांत बंगालमधील एक श्रीमंत जमीनदार होते. त्यांना अनेक भाषा अवगत होत्या. त्यांनी अनेक तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. त्यांचा विचारांचा प्रभाव रॉय यांच्यावर पडला. त्यांनीही अनेक तात्त्विक ग्रंथ वाचले. त्याचा परिणाम त्यांनी मूर्तिपूजेला विरोध केला. तसेच त्यांनी अनेकेश्वरवादाच्या कल्पनेला विरोध केला. एकेश्वरवादाचा पुरस्कार करणाऱ्या रॉय यांनी हिंदू धर्मातील मूर्तिपूजेच्या प्रथेवर कडक टीका करणारे पुस्तक लिहिले. त्याचा परिणाम वडील आणि मुलगा यांच्यात भांडण झाले. रॉय यांनी घर सोडले. त्याच काळात त्यांच्या मोठ्या भावाचे निधन झाले. त्यावेळच्या प्रथेप्रमाणे त्यांची वहिनी सती गेली. या घटनेचा त्यांच्या मनावर परिणाम झाला. त्यांनी सती जाण्याच्या या अमानुष व क्रुर प्रथेविरुद्ध आंदोलन सुरू केले. त्यांच्या धार्मिक व सामाजिक सुधारणेची ती सुरुवात होती.

या दरम्यान राजा राममोहन रॉय यांची १८०९ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने शिरस्तेदार म्हणून निवड केली. परंतु त्यांनी ती नोकरी १८१४ मध्ये सोडली. १८१५ ला त्यांनी कलकत्त्याला 'आत्मीय सभा' सुरू केली. १८१८ ला सतीची चाल बंद करण्यासाठी चळवळ केली. या चळवळीला १८२९ मध्ये यश आले. त्यावेळचे गव्हर्नर जनरल लॉर्ड बेंटिगच्या सहकार्याने सतीची चाल बंद करण्यात आली.

राजा राममोहन रॉय यांनी धार्मिक व सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी चळवळी केल्या. तसेच पाश्चात्त्य इंग्रजी शिक्षणाचा पुरस्कार केला. भारतीय लोकांनी पाश्चात्त्य शिक्षण घेऊन नवीन विचारसरणीचा स्वीकार करावा यासाठी त्यांनी प्रयत्न केले. इंग्लंडमध्ये असतांना १८३३ मध्ये ते स्वर्गवासी झाले. त्यांच्या या जीवनातील विधिध

घटना, प्रसंग तथा विचारांचा प्रभाव त्यांच्या विचारसरणीवर पडलेला आहे. त्या काळात आस्तित्वात असलेल्या परिस्थितीतून त्यांच्या विचारांचा जन्म झाला.

## १. २. २ सामाजिक विचार :-

राजा राममोहन रॉय हे सामाजिक सुधारक होते. त्या काळातील सामाजिक स्थिती पाहता असे लक्षात येते की, तेथे खालील रूढी, परंपरा व प्रथा होत्या.

- **सतीची चाल :-**

त्या काळात पुरुषांना बहुपत्नीत्त्वाचा अधिकार होता. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांचा दुय्यम दर्जा होता. पतीच्या निधनानंतर स्त्रीला अस्तित्वच नसे. स्त्रियांच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची कल्पना त्यांना मान्य नसल्याने त्या काळात पती निधनासोबतच स्त्रियांना सती जावे लागे. विधवा स्त्रीचे तोंड पाहणे अशुभ असते. अशा काही भ्रामक कल्पना अस्तित्वात होत्या. त्यामुळे पतीच्या निधनानंतर तिला आत्मदहनास प्रवृत्त केले जाई.

- **अनिष्ट प्रथा :-**

ब्रिटिश भारतात येण्यापूर्वी देशात अनेक प्रकारच्या अनिष्ट रूढी व परंपरा अस्तित्वात होत्या. उदा. सतीची चाल, बालविवाह, केशवपन, पडदा पद्धत, जरठ विवाह, विधवा विवाहाला विरोध, स्त्री शिक्षणाला विरोध, अंधश्रद्धा, जातीभेद, वंशभेद इत्यादी.

- **स्त्रियांचा दुय्यम दर्जा :-**

त्या काळात स्त्रियांना समाजात दुय्यम मानले जाई. कुटुंबात तिला कनिष्ठ लेखले जाई. केवळ 'चूल' आणि 'मूल' एवढेच स्त्रीचे कार्यक्षेत्र होते. वारसा हक्कानुसार स्त्रीला मालमत्तेचा अधिकार नव्हता. पुरुषांशिवाय स्त्रीचे जीवन अर्थशून्य होते.

या त्या काळातील अनिष्ट रूढी, प्रथा तसेच स्त्रियांची स्थिती लक्षात घेता राजा राममोहन रॉय यांनी पुढील सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

**१) सती प्रथेला विरोध :-**

त्या काळात अस्तित्वात असलेल्या सती प्रथेला राजा राममोहन रॉय यांनी विरोध केला. त्यासाठी लोकभावना जागृत करून सती प्रथेविरुद्ध लोकमत तयार केले. ब्रिटिश शासनाला सतीबंदीचा कायदा करण्यासाठी भाग पाडले. १८१८ पासून सुरू केलेल्या त्यांच्या चळवळीला १८२८ मध्ये यश आले. अखेर गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेटींगच्या काळात १८२९ मध्ये सतीची प्रथा बंद करण्याबाबतचा कायदा करण्यात आला.

**२) विचाराप्रमाणे कृती :-**

रॉय यांनी त्या काळात अस्तित्वात असलेल्या हिंदू धर्माच्या तत्त्वाप्रमाणे समुद्र ओलांडणे पाप आहे ही प्रथा नष्ट करण्यासाठी स्वतः समुद्र पर्यटन केले. तसेच समाजातील विविध अंधश्रद्धा देशविकासाला घातक असल्याने त्या नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले. विचाराप्रमाणे कृती करून त्यांनी लोकांचा विश्वास संपादन केला.

**३) स्त्री सुधारणावादी कार्य :–**

i) त्या काळात स्त्रियांना मालमत्तेचा हक्क नव्हता. पती निधनानंतर पतीची मालमत्ता मुलाला मिळत असे, मुलीला नाही. त्यामुळे रॉय यांनी स्त्रियांना मातमत्तेचा अधिकार असावा असा आग्रह धरला.

ii) त्या काळात विधवा स्त्रियांचे जीवन दुःखी व उपेक्षित होते. जिवंतपणीच त्यांना मरणप्राय वेदना भोगाव्या लागत. या अनिष्ट बाबीकडे समाजाचे लक्ष वेधून स्त्रियांना स्वाभिमानाने जगता यावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

iii) त्या काळात अस्तित्वात असलेल्या बहुपत्नीत्वाच्या प्रथेमुळे स्त्रियांना हलाखीचे जीवन जगावे लागे. म्हणून रॉय यांनी असा विचार मांडला की, पहिली पत्नी जिवंत असतांना पुरुषाला दुसरा विवाह करावयाचा असल्यास त्यांनी दंडाधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी.

iv) स्त्रियांना समाजात स्वतंत्रपणे जीवन जगता यावे तसेच त्यांचा सर्वांगीण विकास घडून यावा या उद्देशाने त्यांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला.

अशाप्रकारे स्त्रियांच्या जीवनात सुधारणा घडवून आणण्यासाठी रॉय यांनी स्त्री स्वातंत्र्याचे महत्त्व जनतेला पटवून दिले. रॉय यांचे असे मत होते की, स्त्रियांच्या शारीरिक दुर्बलतेचा व असहाय्यतेचा फायदा पुरुषांनी घेऊन स्त्रियांच्या विकासात अडथळे निर्माण केले. म्हणून देशविकासातही अडथळे आले. यासाठी स्त्रियांचे जीवनमान सुधारणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी मांडले.

**४) समानता :–**

सामाजिक प्रगतीसाठी जात, धर्म, लिंग, वंश या आधारावर भेदाभेद करणे योग्य नाही म्हणून राजा राममोहन रॉय यांनी जाती व्यवस्थेला विरोध केला. तसेच वर्णव्यवस्थेलाही विरोध केला. गुलामगिरीच्या प्रथेला नाकारले. स्त्री–पुरुष समानतेच्या तत्त्वाचा स्वीकार केला.

राजा राममोहन रॉय यांच्या मते, भारतात सामाजिक सुधारणा तेव्हाच घडून येतील, जेंव्हा ब्रिटिश सरकार कायदे करतील. ब्रिटिशांशिवाय भारतीयांना तरणोपाय नाही. त्यामुळे त्यांनी ब्रिटिशांचे भारतातील आगमन वरदान मानले. ब्रिटिश शासनाने केलेल्या कायद्याने हिंदूधर्मीय लोकांची मानसिकता बदलेल. देशात सामाजिक सुधारणा घडून येतील, तेव्हाच भारत सोडावे अशी त्यांची अपेक्षा होती. त्यांच्या या सामाजिक सुधारणावादी चळवळीमुळे त्यांना 'आधुनिक भारताचे जनक' तसेच 'समाज सुधारणा चळवळीचे आद्य प्रणेते' म्हणतात.

## १. २. ३ धार्मिक विचार :–

राजा राममोहन रॉय हे मूलतः धर्मसुधारक होते. भारतीय जनतेवर धर्माचा जबरदस्त पगडा होता. धर्माच्या नावाखाली अंधश्रद्धा स्वीकारण्यात आल्या होत्या. जसे– समुद्र ओलांडणे पाप आहे. या अंधश्रद्धा नष्ट करण्यासाठी भारतीय जनतेने पाश्चात्त्य शिक्षण घेणे

आवश्यक आहे असे रॉय यांचे मत होते.

**१) धार्मिक सुधारणेची आवश्यकता :-**

रॉय यांच्या मते, धार्मिक परंपरेच्या नियंत्रणाखाली भारतीय जनता जखडून गेलेली होती. जनतेवर धर्माचा जबरदस्त पगडा होता. त्यामुळे भारतीयांचे राजकीय हित साध्य होण्यात अडथळे येत असत. जात, पंथ, उपपंथ, श्रेष्ठ, कनिष्ठ, उच्च, नीच अशा भावनेमुळे समाजाची एकात्मता नष्ट होऊन फुटीरतेची भावना निर्माण झाली होती. त्या काळात व्यक्तीच्या मनावर धर्माचा जबरदस्त पगडा असल्याने धर्मविरोधी कार्य करण्यास जनता तयार होत नसे. धार्मिक विचार, कर्मकांड यातच व्यक्तीने स्वतःला गुंतवून घेतले होते. मुर्तिपूजेचे अवडंबर, दांभिकपणा यामुळे समाजविकासात अडथळे निर्माण झाले असे रॉय यांचे मत होते. म्हणून रॉय यांनी धार्मिक सुधारणेला महत्त्व दिले.

**२) एकेश्वरवादाचा स्वीकार :-**

रॉय यांच्या मते, संपूर्ण विश्वाचा कर्ता करविता हा परमेश्वर आहे. मात्र तो अनेक नसुन एकच आहे. हे त्यांच्या धार्मिक विचाराचे मुख्य सुत्र होते. त्यांनी जनतेला एकेश्वरवादाचे महत्त्व पटवून दिले. ते स्वतः निष्ठावान एकेश्वरवादी होते. त्यांनी ब्राह्मो समाजाचे पहिले मंदिर निर्माण करून ते विश्वाच्या निर्मात्यास म्हणजे परमेश्वरास अर्पण केले.

**३) मूर्तिपूजेला विरोध :-**

रॉय यांचा मूर्तिपूजेला विरोध होता. त्यांना देवदेवता मान्य नव्हत्या. अनेक देवतांची पूजा करण्याच्या पद्धतीला त्यांनी विरोध केला. त्यांचा सर्व धर्माबाबतचा दृष्टिकोन सहिष्णुतावादी होता. कोणत्याच धर्माच्या लोकांनी मूर्तिपूजा करू नये, या त्यांच्या विचाराला त्या काळातील सनातनीय धर्मीयांनी विरोध केला. मात्र ते आपल्या विचारावर ठाम राहिले. त्यामुळे पंथ, उपपंथ यांचे कुंपन ओलांडून वैश्वीक धर्माचा पुरस्कार करणारे ते प्रखर प्रवक्ते ठरले. सहिष्णुता हे त्यांनी स्थापन केलेल्या ब्राह्मोसमाजाचे प्रमुख तत्त्व होते. समाज मंदिरात केली जाणारी उपासना ही नीतीमत्ता वाढविण्यासाठी असते. विविध धर्म आणि पंथ यांच्यात ऐक्य निर्माण व्हावे हा राजा राममोहन रॉय यांचा मुख्य उद्देश होता. वेदांप्रमाणेच बायबल आणि पुराणातील अनेक तत्त्वे मान्य होती.

## १. २. ३.१ ब्राह्मो समाजाची स्थापना :-

राजा राममोहन रॉय यांनी सामाजिक आणि धार्मिक सुधारणा घडवून आणण्यासाठी ब्राह्मो समाजाची स्थापना केली. १८२८ मध्ये ब्राह्मो समाजाची स्थापना करून समाजात अनेक सुधारणा घडवून आणण्याचे व समाजजागृतीचे कार्य केले.

**● उद्दिष्टे आणि तत्त्वे :-**

ब्राह्मो समाज निर्मितीमागचा रॉय यांचा उद्देश त्या काळात अस्तित्वात असलेल्या रूढी, परंपरा नष्ट करणे, धार्मिक सहिष्णुता निर्माण करणे हा होता. तसेच एकसंघ आणि एकात्म समाज निर्माण करण्याच्या उद्देशाने त्यांनी ब्राह्मो समाजाची स्थापना केली.

त्यांच्या मते, सर्व धर्मांचे तत्त्वज्ञान हे मानवी कल्याणावर आधारलेले आहे. त्यासाठी अनेक धर्म, पंथ यांच्यात एकात्मतेची भावना निर्माण व्हावी यासाठी एकेश्वरवादाचा स्वीकार केला. हिंदू धर्मातील अनेक देवांच्या कल्पनेतून अनेक धर्म व पंथ निर्माण होऊन एकसंघ समाजात फुटीरता निर्माण झाली. ही फुटीरता नष्ट करण्यासाठी व मानवी कल्याणासाठी त्यांनी एकेश्वरवादाची कल्पना मांडली व त्याचे महत्त्व ब्राह्मो समाजाच्या माध्यमातून समाजाला पटवून दिले.

**● धार्मिक स्वातंत्र्य :–**

पूर्वी समाजात अशी धारणा होती की, देवापर्यंत पोहचण्यासाठी पुरोहिताची आवश्यकता आहे. देवाला खुश करण्यासाठी पुरोहितांची आवश्यकता आहे. मात्र राजा राममोहन रॉय यांच्या मते, देव आणि मानव यांच्यात मध्यस्थीची गरज नाही. समाजातील प्रत्येक व्यक्तीला धार्मिक स्वातंत्र्य आहे. तेव्हा व्यक्तीने आपल्या इच्छेप्रमाणे देवाची पूजा करावी अशी कल्पना समाजात प्रसारीत करून जनतेत जागृती घडवून आणली.

**● मूर्तिपूजेला विरोध :–**

पूर्वीपासून हिंदू धर्मात मूर्तिपूजेला प्राधान्य देण्यात आले होते. परंतु रॉय यांच्या मते, निर्जीव मूर्तिपेक्षा सजीव मानवाची सेवा मानवाने करावयास हवी यासाठी त्यांनी मूर्तिपूजेला विरोध केला.

**● निर्गुण निराकार भक्तीचा स्वीकार :–**

रॉय यांनी मूर्तिपूजेला विरोध करून निर्गुण निराकार भक्तीचा स्वकार केला. कारण त्यांच्या मते, देव मूर्तित नसून मानवात दडलेला आहे. दीन–दुबळया, अपंग, अनाथ व्यक्तींची सेवा हीच खरी भक्ती होय. या भक्तीचा प्रसार करण्यासाठी त्यांनी ब्राह्मो समाजाचा आधार घेतला.

**● धार्मिक सहिष्णुता :–**

राजा राममोहन रॉय यांनी धार्मिक सहिष्णुता निर्माण करण्याच्या उद्देशाने ब्राह्मो समाजाची स्थापना केली. त्यामागचा उद्देश असा होता की, कोणत्याही धर्माने आपल्याच धर्माचे तत्त्वज्ञान श्रेष्ठ असे न मानता इतर धर्माचे तत्त्वज्ञान जाणून घ्यावयास हवे ही रॉय यांची अपेक्षा होती.

अशा प्रकारे राजा राममोहन रॉय यांनी समाजात सामाजिक व धार्मिक सुधारणा ब्राह्मो समाजाच्या माध्यमातून घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

## १. २. ४ राजकीय विचार :–

सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी राजा राममोहन रॉय यांना भारतातील सनदशीर चळवळीचे जनक म्हटले आहे. कारण भारतीय जनतेत अधिकाराची जाणीव निर्माण करण्याचे कार्य प्रथमतः राजा राममोहन रॉय यांनी केले. रॉय यांच्या राजकीय विचारातील महत्त्वपूर्ण बाबी पुढीलप्रमाणे–

**१) व्यक्ती स्वातंत्र्यासंबंधी विचार:-**

रॉय यांनी व्यक्ती स्वातंत्र्य आणि देशाच्या स्वातंत्र्यासंबंधी विचार मांडले. यात त्यांनी व्यक्ती स्वातंत्र्याला प्राधान्य दिले. विचार आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य हा वेद आणि उपनिषदातील तत्त्वज्ञानाचा गाभा आहे. तेव्हा इंग्रजांनी भारतात राहावे, सुधारणा कराव्यात असे त्यांचे मत होते. म्हणून ते ब्रिटिशांना वरदान मानत. त्यांच्या या विचारामुळे ते ब्रिटिशधार्जिणे होते अशी टीका केली जाते.

रॉय यांच्या मते, व्यक्ती स्वातंत्र्य हे समाजाचा प्राण आहे. व्यक्तीला केवळ शारीरिक स्वातंत्र्य देऊन उपयोग नाही तर त्यांना मानसिक स्वातंत्र्य द्यावयास हवे. व्यक्तीला आपल्या विचाराप्रमाणे कृती करण्याचे स्वातंत्र्य असावयास हवे. स्वातंत्र्याचे मुख्य सूत्र सामाजिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय अन्यायापासून मुक्ती होणे हे आहे. त्यामुळे रॉयनी व्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार करताना कोणत्याही व्यक्तीवर विशिष्ट धर्माची सक्ती केली जाऊ नये, प्रत्येकाला आपल्या इच्छेप्रमाणे धर्म स्वीकारण्याचे स्वातंत्र्य असावे, यासाठी त्यांनी धार्मिक क्षेत्रातील मूर्तिपूजा, कर्मकांड याला विरोध केला. सामाजिक क्षेत्रातील अनिष्ट रूढी, परंपरा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. ही स्वातंत्र्याची बीजे सर्वसामान्य व्यक्तीत रुजविण्यासाठी त्यांनी पाश्चात्त्य शिक्षणाचा पुरस्कार केला.

**२) शैक्षणिक स्वातंत्र्याचा हक्क:-**

रॉय यांच्या मते, व्यक्तीला ज्याप्रमाणे मालमत्ता बाळगण्याचा व तिचा विनियोग करण्याचा अधिकार आहे, त्याचप्रमाणे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी व समाज परिवर्तनासाठी शैक्षणिक स्वातंत्र्य आवश्यक आहे. शिक्षणामुळे समाजाला आपल्यासमोरील प्रश्नांचे आकलन होईल. शिक्षण हे उपजीविकेचे साधन असल्याने उदरनिर्वाहाची सोय होईल.

भारतात वर्षानुवर्षांपासून चालत आलेल्या अनिष्ट चालीरीती, रूढी, परंपरा यामुळे देशाची प्रगती होऊ शकली नाही. कारण भारतीय जनता अज्ञानी व निरक्षर असल्याने त्या अनिष्ट चालीरीतीत गुंतून राहील्या. या अनिष्ट चालीरीतीतून मुक्तता करण्याचा एकच मार्ग आहे तो म्हणजे शिक्षण. यासाठी त्यांनी शिक्षणाचा प्रसार करून भारतीय जनतेत जागरूकता आणण्याच्या दृष्टिने प्रयत्न केले.

**जीविताचा हक्क :-**

रॉय यांच्या मते, जीविताचा हक्क नसणे म्हणजे त्याच्या हक्कावर मोठा आघात आहे. कारण हक्काशिवाय व्यक्तीचा विकास होऊ शकत नाही. व्यक्तीचा जीविताचा हक्क हिरावून घेणे हे असंस्कृतपणाचे लक्षण आहे. यासाठी शासनाने व्यक्तीला जीविताचा हक्क सर्वांगीण विकासाच्या दृष्टिने आवश्यक आहे असे रॉय यांचे मत होते.

रॉय यांच्या मते, ब्रिटिशांनी भारतीय नागरिकांना अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य द्यावे. या स्वातंत्र्याने व्यक्ती आपले विचार मांडू शकेल. सर्वांगीण विकासासाठी अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य आवश्यक आहे.

रॉय यांच्या मते, समाजातील अनिष्ट प्रथा, परंपरा, चालीरीती नष्ट करण्यासाठी कायदा करणे आवश्यक आहे. तसेच या कायद्यात परिस्थितीनुसार बदल व्हावयास हवा, कायद्यामागे दंडशक्तीयुक्त सामर्थ्य असते. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्याला शिक्षा होते. म्हणून शिक्षेच्या भीतीपोटी जनता कायद्याचे पालन करतात. यासाठी ब्रिटिशांनी भारतातील अनिष्ट रूढी, परंपरा नष्ट करण्यासाठी कायदे करावयास हवे असे रॉय यांचे मत होते.

राजा राममोहन रॉय यांच्या राजकीय विचाराचा आढावा घेतल्यास ते लोकशाही शासनपद्धतीचे पुरस्कर्ते होते हे लक्षात येते. व्यक्ती विकासाला त्यांनी साध्य मानले. त्या दृष्टिने व्यक्ती स्वातंत्र्य, जीवितांचा हक्क, कायद्यासंबंधी विचार रॉय यांनी मांडले.

## १. २. ४. १ वृत्तपत्र स्वातंत्र्य आणि मुद्रण स्वातंत्र्यासंबंधी विचार :-

वर्तमानपत्र हे समाज जागृतीचे, समाजाच्या अपेक्षा व्यक्त करणारे साधन आहे. तसेच लोकमत घडविणारे व सरकारवर नियंत्रण ठेवणारे हे प्रभावी साधन आहे. समाजात घडणाऱ्या घटनांचे प्रतिबिंब वर्तमानपत्रातून व्यक्त होते. या घटना शासनापर्यंत पोहचविण्याचे कार्य वृत्तपत्राच्या माध्यमातून केले जाते. म्हणून राजा राममोहन रॉय यांनी वृत्तपत्र स्वातंत्र्याबाबत विचार मांडले. या वृत्तपत्र व मुद्रण स्वातंत्र्यासंबंधी आपली भुमिका स्पष्ट करतांना रॉय यांनी स्पष्ट केले की,

१) अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा मानवी स्वातंत्र्याचा पाया आहे. व्यक्तीच्या भावना समाजापर्यंत व शासनापर्यंत पोहचविण्यासाठी व जनजागृतीसाठी वृत्तपत्र स्वातंत्र्य व मुद्रण स्वातंत्र्य आवश्यक आहे.

२) वृत्तपत्र हे लोकमत घडविण्याचे व जनतेचे विचार शासनापर्यंत पोहविण्याचे प्रभावी माध्यम आहे. शासकीय योजना व शासनाने घेतलेले निर्णय जनतेपर्यंत पोहचविण्याचे तसेच त्याबाबतच्या प्रतिक्रिया व्यक्त करणारे प्रभावी माध्यम आहे. त्यामुळे वृत्तपत्र स्वतंत्र असणे आवश्यक आहे असे रॉय यांचे मत होते.

३) भारतात सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक घडवून आणण्यासाठी रॉय यांनी मुदण स्वातंत्र्य आवश्यक मानले.

या आपल्या वृत्तपत्र व मुद्रण स्वातंत्र्यासंबंधी विचारांच्या प्रसारासाठी, कार्याच्या प्रसिद्धीसाठी व जनजागृतीसाठी रॉय यांनी नियतकालिके काढली. पारशी भाषेत 'मिरत-उल-अखबार' तर बंगाली भाषेतील 'संवाद कौमुदी' हे वृत्तपत्र सुरू केले.

त्या काळात ब्रिटिशांचा वृत्तपत्र स्वातंत्र्याला विरोध होता. ब्रिटिश कंपनीकडून चालविली जाणारी वृत्तपत्रे भारतीय जनतेला जागृत करीत नाहीत. ती केवळ ब्रिटिशधार्जिणे असल्यामुळे त्यात ब्रिटिश शासनाविषयी अवास्तव स्तुती केली जाते. त्यामुळे भारतीय जनतेच्या मनात ब्रिटिश शासनाविषयी आदर राहात नाही. म्हणून ब्रिटिशांनी वृत्तपत्र स्वातंत्र्याचा अधिकार देणे आवश्यक असल्याचे मत रॉय यांनी मांडले. त्याचा परिणाम ब्रिटिशांनी १८२३ मध्ये लिखाणावर बंदी घातली. या अधिकार प्राप्तीसाठी रॉय यांनी

न्यायालयात दाद मागितली. पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. तेव्हा त्यांनी ब्रिटिश राजा आणि त्यांचे मंत्रिमंडळ यांना वृत्तपत्र स्वातंत्र्याचे महत्त्व पटवून दिले व मागणी केली.

वृत्तपत्रीय स्वातंत्र्याच्या अभावाने जनतेच्या मनात असंतोष निर्माण होऊन क्रांतीचा धोका निर्माण होऊ शकेल. आजपर्यंत कोणत्याही देशात वृत्तपत्राच्या स्वातंत्र्यामुळे क्रांती झालेली नाही. त्यासाठी ब्रिटिशांनी भारतीयांना मुद्रण स्वातंत्र्याचा अधिकार द्यावा, अन्यथा क्रांतिचा धोका असल्याचे त्यांनी ब्रिटिश शासनाला पटवून दिले.

खालील बाबींसाठी वृत्तपत्र व मुद्रण स्वातंत्र्याची आवश्यकता त्यांनी स्पष्ट केली.

१. कार्यक्रमाची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी.

२. ब्रिटिश सरकारने केलेल्या कायद्याला जनतेचा पाठिबा मिळविण्यासाठी.

३. लोकांच्या ज्ञानात भर घालण्यासाठी.

४. जनतेत जागृती घडवून आणण्यासाठी.

५. लोकविकासासाठी व जनतेच्या मनातील असंतोष दूर करण्यासाठी.

वरील बाबींचा विचार करून राजा राममोहन रॉय यांनी ब्रिटिश शासनाकडे वृत्तपत्र स्वातंत्र्याचा आग्रह धरला. त्याच्या प्रयत्नामुळे १८२३ मध्ये गव्हर्नर जनरल जेम्स ॲडम्स यांनी काढलेला वटहुकूम लागू झाला.

हे सर्व करण्यामागे ब्रिटिश शासनाला विरोध करणे अथवा अडचणीत आणणे हा रॉय यांचा उद्देश नव्हता. याउलट शासनाची कार्यक्षमता वाढावी व जनतेचा प्रतिसाद मिळावा हा त्यांचा वृत्तपत्र व मुद्रण स्वातंत्र्यामागील हेतू होता.

### १. २. ४. २ कायद्यासंबंधी विचार :–

राजा राममोहन रॉय यांचा ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीवर विश्वास नव्हता. त्यांचा विश्वास ब्रिटिश पार्लमेंटवर होता. म्हणून भारतासाठी ब्रिटिश पार्लमेंटने कायदे करावे असा त्यांचा आग्रह होता. ब्रिटिश पार्लमेंट ईस्ट इंडिया कंपनीप्रमाणे केवळ स्वतःचा विचार न करता इतरांचा विचार करणारी उदार संस्था आहे, असे त्यांचे मत होते. त्यामुळे ब्रिटिश पार्लमेंट भारतीय जनतेच्या हितासाठी कायदे करेल अशी रॉय यांची धारणा होती. कायदा तयार करण्यासाठी आवश्यक असलेली पात्रता भारतीयांमध्ये नसल्याने ब्रिटिशांनी कायदे करावे असा त्यांचा आग्रह होता.

ब्रिटिश पार्लमेंटचे सदस्य बुद्धिमान, चिकित्सक वृत्तीचे आहेत. ते भावनेच्या आहारी जात नाहीत. भारतीय समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा नष्ट करण्यासाठी ते कायदे करतील. चिकित्सक वृत्तीच्या ब्रिटिशांनी भारतीय समाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी कायदे करावेत असा विचार त्यांनी मांडला. कायदा करताना आवश्यकता वाटल्यास भारतातील सुशिक्षित आणि श्रीमंत व्यक्तींचा सल्ला ब्रिटिशांनी घ्यावा असेही त्यांनी त्यावेळी सुचविले. शेकडो मैल दूर असलेल्या ब्रिटिशांना भारतीयांच्या समस्या व अपेक्षा यांच्या माध्यमातून

जाणून घेता येतील.

**कायदयाचे अधिराज्य :–**

राजा राममोहन रॉय यांनी देशाचा राज्यकारभार हा कायदयानुसार चालावा असा आग्रह धरला होता. सर्वधर्मीयांसाठी समान कायदा असावा, कायदयाच्या बाबतीत ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवर त्यांचा विश्वास होता. कोणत्याही एका व्यक्तीच्या अथवा गटाच्या मर्जीनुसार राज्यकारभार चालविला तर समाजात अत्याचार, गोंधळ, बेशिस्तीचे वातावरण निर्माण होईल. म्हणून रॉय यांनी कायदयाच्या अधिराज्याला महत्त्व दिले.

भारतीय समाज हा विविधतेने नटलेला आहे. भारतात अनेक जाती धर्मांच्या आधारावर कायदा न करता सर्वांसाठी समान नागरी कायदा करण्यात आला ज्यामुळे समाजात जातीभेद, धर्मभेद, वंशभेद निर्माण न होता एकात्म समाज निर्माण होऊ शकेल.

भारतीय समाजात अनिष्ट रूढी, परंपरा, अंधश्रद्धा आहेत. या गोष्टी कायदयाने सुटणे शक्य नाही. म्हणून ब्रिटिशांनी कायदयाचे महत्त्व जनतेला पटवून दिले. जनतेची मानसिकता घडवून आणावी असा आग्रह धरला. कायदयामागे दंडशक्तीयुक्त सामर्थ्य असल्याने कायदयाचे उल्लंघन करणाऱ्यांस शिक्षा होते. शिक्षेच्या भीतीपोटी जनता कायद्याचे पालन करते. कायदा करण्याचा अधिकार सार्वभौम सत्तेला म्हणजेच संसदेला असावा संसदेने कायदा करताना जनतेच्या इच्छा आकांक्षा विचारात घेऊन कायदा करावयास हवा असे रॉय यांचे मत होते.

## १. २. ५ शैक्षणिक विचार :–

राजा राममोहन रॉय यांच्या काळात पारंपरिक शिक्षणपद्धती अस्तित्वात होती. ब्राह्मण हे मठ किंवा आश्रमात शिक्षण घेत असत. काजी हे मदरसात तर ख्रिश्चनधर्मीय मिशनरीत शिक्षण घेत होते.

ब्रिटिशांच्या आगमनानंतर भारतीयांना पाश्चात्त्य शिक्षणाची ओळख झाली. तेव्हा भारतीयांना धर्मावर आधारित पारंपारिक शिक्षण द्यावे की विज्ञानावर आधारित पाश्चात्त्य शिक्षण द्यावे असा वाद सुरू झाला.

राजा राममोहन रॉय यांच्या मते पाश्चात्त्य देशांनी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, आधुनिक तत्त्वज्ञान यात प्रगती केली. कारण हे शिक्षण आधुनिकतेवर, विवेकावर आधारलेले आहे. त्यात बुद्धिला चालना मिळत नाही. म्हणून रॉय यांनी भारतातील पारंपरिक शिक्षणाला विरोध केला. त्यांनी पाश्चात्त्य आधुनिक शिक्षणाचा पुरस्कार केली होता.

पाश्चात्त्य शिक्षणात आमूलाग्र बदल झाला. त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनाचा स्वीकार आहे. निसर्ग शक्तीचा उपयोग त्यांनी स्वतःच्या हितासाठी करून घेतला. म्हणून भारतीयांनी स्वतःची प्रगती घडवून आणण्यासाठी पाश्चात्त्य शिक्षणाचा अवलंब करावयास हवा असे रॉय यांचे मत होते. त्यासंबंधी लेख लिहून त्यांनी भारतीय जनतेत जागृती घडवून आणली.

रॉय यांनी स्वतः वेद, उपनिषदे, शास्त्रे, पुराणे इत्यादी धार्मिक ग्रंथांचा अभ्यास केला होता. संस्कृत भाषेचा अभ्यास सुरू रहावा यासाठी त्यांनी स्वतःच्या राहत्या घरी 'वेदांत कॉलेज' स्थापन केले. परंतु केवळ संस्कृतच्या शिक्षणाने भारताची प्रगती होऊ शकणार नाही, असे त्यांना वाटत होते. ब्रिटिशांनी देवु केलेले पाश्चात्त्य शिक्षणच भारतात प्रगती घडवून आणु शकेल असा त्यांना विश्वास वाटत होता. यासाठी ११ डिसेंबर १८१३ रोजी त्यांनी शिक्षणाबाबत ब्रिटिशांना पत्र लिहिले. ब्रिटिशांनी भारतात पाश्चात्त्य शिक्षणावर आधारित शिक्षण द्यावे असा आग्रह धरला. त्यांच्या आग्रहामुळे १८१९ मध्ये कलकत्ता येथे शाळा स्थापन झाली. १८२२ मध्ये हिंदू कॉलेज स्थापन करण्यात आले होते.

त्या काळातील सनातनी प्रवृत्तीच्या लोकांनी रॉय यांना विरोध केला. मात्र नंतर त्याचे महत्त्व काही लोकांना पटल्यामुळे त्यांनी अप्रत्यक्षरित्या मदतही केली. परंतु पौर्वात्य की पाश्चात्त्य शिक्षण हा वाद कायम होताच. परंतु रॉय यांच्या मते, इंग्रजांच्या ख्रिस्ती मिशनरी संस्था भारतात याव्या, त्यांनी भारतीयांना शिक्षण द्यावे. हे शिक्षण पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही देण्यात यावे असा त्यांनी आग्रह धरून स्वतः शैक्षणिक कार्यात सहभागी झाले.

### १. २. ६ आर्थिक विचार :-

राजा राममोहन रॉय यांच्या मते, समाजातील प्रत्येक व्यक्तीला मालमत्ता बाळगण्याचा अधिकार असावा. श्रीमंताकडून गरीबांचे होणारे आर्थिक शोषण थांबविण्यासाठी शासनाने कायदे करून गरीबांना संरक्षण दिले पाहिजे.

ब्रिटिशांच्या आगमनापूर्वी भारत देश 'सुजलाम सुफलाम' असा संपन्न देश होता. भारतातील कापड, मसाल्याचे पदार्थ, हस्तिदंत, कलाकुसरीच्या वस्तूंना मोठ्या प्रमाणात मागणी होती. ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी धोरणामुळे भारतातील हस्तोद्योग बंद पडले. भारताचे शोषण होऊन स्वंयपूर्ण आणि स्वावलंबी असलेला भारत देश परावलंबी बनला.

कॉर्नवॉलिसने बंगाल प्रांतात कायमधारा जमीन पद्धती लागू केली. त्यामुळे श्रीमंताकडून गरीबांचे शोषण होऊ लागले होते. या अर्थिक शोषणाला विरोध करण्यासाठी रॉय यांनी जमीनदारी पद्धत नष्ट करण्याबाबत शासनाला सुचविले.

रॉय यांच्या सूचनेला ब्रिटिशांनी दिलेले उत्तर असे होते की, 'शेतकऱ्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी आमची आहे. ' वास्तविक ब्रिटिशांनी शेतकऱ्यांसाठी काहीच केले नव्हते.

जमीनदारांकडून होणाऱ्या शोषणाच्या संदर्भात रॉय यांनी केलेल्या सूचना-

ब्रिटिश काळात सुरू झालेल्या जमीनदारी प्रथेत सर्वसामान्य शेतकऱ्यांचे शोषण श्रीमंत जमीनदार वर्गाकडून होते. हे शोषण थांबविण्यासाठी रॉय यांनी पुढील सूचना केल्या.

१. खंडणीची रक्कम कमी करण्यात यावी.

२. चैनीच्या वस्तूंवर कर लावण्यात यावा.

३. कर वसूल करताना इंग्रज अधिकाऱ्यांसोबत भारतीय प्रतिनिधी असावा.

४. शेतीला प्रोत्साहन देण्यात यावे.

अशा प्रकारच्या सुधारणा शेतकऱ्यांच्या हितासाठी करण्याचा आग्रह रॉय यांनी धरला. यामागे रॉय यांचा हेतू भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास करणे हा होता.

ईस्ट इंडिया कंपनीने मीठाच्या व्यापारात आपली मक्तेदारी निर्माण केली. मीठाच्या किमती वाढविल्याने मीठाचे उत्पादन करणाऱ्या कामगारांना पशूप्रमाणे वागणुक दिली जाई. म्हणून रॉय यांनी सुचविले की, मीठाच्या व्यापारात ईस्ट इंडिया कंपनीची असलेली मक्तेदारी नष्ट करावी व मीठाच्या किमती कमी करण्यात याव्या. जेणेकरून सर्वसामान्य व्यक्तीला जीवन जगणे सोयीचे होईल.

भारतात कामाच्या निमित्ताने ईस्ट इंडिया कंपनीचे अधिकारी येतात. त्यांना भरपूर पगार दिला जातो. सेवानिवृत्तीनंतर पेन्शन दिली जाते. हा सर्व खर्च भारताच्या तिजोरीतून होतो. सेवानिवृत्तीनंतर ते अधिकारी मायदेशी म्हणजे इंग्लंडला जातात त्यामुळे भारतीय संपत्तीचा ओघ देशात राहात नाही. विविध मार्गांनी भारतीयांचे ब्रिटिशांकडून होणारे शोषण थांबावे, व्यक्तीला मालमत्ता बाळगता येऊन आपला विकास साधता यावा असे रॉय यांचे मत होते.

## १. २. ७ राजा राममोहन रॉय यांच्या विचारांचे परीक्षण :–

रॉय हे प्रगल्भ बुद्धिचे होते. लहान वयातच त्यांनी अनेक धर्मांचा आणि भाषेचा अभ्यास केला होता. विविध तत्त्वज्ञाने अभ्यासली. त्यांच्या धार्मिक विचाराला पाश्चात्त्य शिक्षणाची जोड लाभली, त्यामुळे अंधश्रद्धेऐवजी वास्तववादी दृष्टिकोनाचा त्यांनी स्वीकार केला. त्यांचे सामाजिक, धार्मिक व राजकीय कार्य भविष्यात मार्गदर्शक ठरणारे आहेत. म्हणून त्यांना आधुनिक भारताचा जनक, शिल्पकार तसेच मनु म्हणून ओळखले जाते. हे पुढील बाबींवरून स्पष्ट होते.

### १. पाश्चात्त्य शिक्षणाचा पुरस्कार:–

भारतातील अनिष्ट चालीरीती, अंधश्रद्धा नष्ट व्हाव्यात यासाठी रॉय यांनी पाश्चात्त्य शिक्षणाचा आग्रह धरला. समाजाने नवीन दृष्टिकोन आणि विचारांचा स्वीकार करावा असा त्यांचा प्रयत्न होता. त्यासाठी रॉय यांनी पाश्चात्त्य शिक्षणाचा पुरस्कार केला. त्यांच्या या विचारांनी इतिहासकार मुजुमदार यांनी त्यांना 'आधुनिक राजकीय चळवळीचे जनक' म्हटले.

### २. सामाजिक सुधारणा :–

ब्रिटिश काळात भारतीय समाजात अनेक अनिष्ट चालीरीती अस्तित्वात होत्या. उदा. बालविवाह, विधवा विवाहाला विरोध इत्यादी. या अनिष्ट रूढी, प्रथां विरुद्ध ब्रिटिशांनी कायदा करून भारतात सुधारणा घडवून आणावी यासाठी त्यांनी ब्रिटिशांकडे या

गोष्टीचा पाठपुरावा केला. त्यांच्या सातत्याने चालविलेल्या प्रयत्नाचे फलित सतीची चाल ब्रिटिशांनी कायद्याने बंद केली.

### ३.राजकीय कार्य :–

भारतात ब्रिटिशांचे राज्य होते. रॉय यांनी पाश्चात्त्य विचारसरणी, वृत्तपत्र व मुद्रण स्वातंत्र्याचा पाठपुरावा करून तो अधिकार भारतीयांसाठी मिळविला. भारतीय जनतेला स्वातंत्र्य असावे असा व्यक्ती स्वातंत्र्यवादी विचार त्यांनी मांडला. देशात शांतता, सुव्यवस्था व प्रगती व्हावी यासाठी त्यांनी कायद्याचे राज्य निर्माण व्हावे यासाठी प्रयत्न केले. राजकीय चळवळीचे कार्य प्रथमतः त्यांनी केले.

### ४. आर्थिक विकास :–

भारताच्या आर्थिक विकासासाठी रॉय यांनी जमीनदारी पद्धतीवर नियंत्रण असावे यासाठी प्रयत्न केले. औद्योगिकीकरणाला प्राधान्य देण्याबाबत विचार मांडले. भारतातील ईस्ट इंडिया कंपनीची मक्तेदारी नष्ट व्हावी, इंग्लंडप्रमाणे भारतात नवनवीन उद्योगधंदे विकसित व्हावे, बेकारांना काम मिळावे असा त्यांचा प्रयत्न होता. यामागचा मुख्य हेतू भारताचा आर्थिक विकास घडवून आणण्याचा होता.

### ५. प्रबोधनाचे आद्यप्रवर्तक :–

राजा राममोहन रॉय यांनी त्या काळातील समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, जुन्या चालीरीती, रूढी, परंपरा यांना विरोध केला. पाश्चात्त्य शिक्षणाचा नवीन मार्ग स्वीकारून विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनाचा स्वीकार केला. युरोपातील प्रगती, नवीन विचारांनी प्रभावित झालेल्या रॉय यांनी व्यक्ती स्वातंत्र्यवादी विचार मांडले. वेद आणि उपनिषदांची जोपासना केली. म्हणून स्वामी विवेकानंद यांनी रॉय यांना 'नवचैतन्य प्राप्त झालेल्या भारताचा पहिला मानव' असे संबोधले.

### ६. उदारमतवादी चळवळीचे प्रवर्तक :–

रॉय यांचा दृष्टिकोन उदार होता. राजकीय जुलुमापासून व्यक्ती मुक्त व स्वतंत्र असावी. जनहितासाठी ब्रिटिश सहकाराशी जुळवून घ्यावे कारण ब्रिटिशांच्या सहकार्याशिवाय भारतात सुधारणा होणे शक्य नाही. त्यादृष्टिने रॉय यांनी अनेक प्रयत्न केले.

### ७. मानवतावादी दृष्टिकोन :–

त्या काळात भारतीय समाजात असलेली जातीयता, विषमता, यामुळे समाजात काही व्यक्तींना श्रेष्ठ तर काहींना कनिष्ठ मानले जाई. जाती, धर्म, वंश, लिंग, पैसा या आधारावर भेदाभेद केला जाई. यामुळे देशात एकात्मतेच्या मार्गात अडथळे निर्माण झाले. हा भेदाभेद रॉय यांना मान्य नव्हता. सर्वांना समान मानावे. माणूस म्हणून सर्वांसाठी समान कायदा असावा असा मानवतावादी दृष्टिकोनाचा स्वीकार रॉय यांनी केला.

त्यांच्या या वरील विचाराने भारतीय समाजात जागरूकता, सुधारणा व प्रगती

घडवून आणण्यास मदत झाली. आधुनिक समाज निर्माण करण्यात आपल्या नवीन विचारांची भर त्यांनी घातली. त्यामुळे राजा राममोहन रॉय यांना 'आधुनिक भारताचा जनक' असे म्हटले जाते. काहींनी त्यांना 'आधुनिक भारताचा शिल्पकार' तर काहींनी मनु म्हटले आहे. काहींनी त्यांना भारतीय राष्ट्रीयत्वाचे जनक असेही संबोधिले. त्यांच्या कार्याचा विचार करता, प्रबोधनाच्या क्षितिजावरचा एक दैदीप्यमान तारा म्हणून त्यांची गणना केली जाते. यावरून त्याचे आधुनिक भारताच्या जडणघडणीतील महत्त्वाचे असलेले योगदान स्पष्ट होते.

## १. ३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१) राजा राममोहन रॉय यांनी ब्राह्मो समाजाची स्थापना केव्हा केली ?

२) ब्राह्मो समाजाची तत्त्वे सांगा.

३) रॉय यांच्या काळात भारतात अस्तित्वात असलेल्या अनिष्ट प्रथा कोणत्या ?

४) सतीची चाल केव्हा व कोणी बंद केली ?

५) रॉय यांनी कोणत्या शिक्षण पद्धतीचा स्वीकार केला ?

६) रॉय यांच्या धार्मिक सुधारणेतील कोणत्याही दोन बाबी सांगा.

७) रॉय यांच्या राजकीय विचारातील दोन महत्त्वपूर्ण बाबी लिहा.

८) रॉय यांनी काढलेली नियतकालिके कोणती ?

९) कायद्याचे अधिराज्य म्हणजे काय ?

१०) जमीनदारांकडून होणाऱ्या आर्थिक शोषणाच्या संदर्भात रॉय यांनी केलेल्या सूचना कोणत्या ?

## १.४ सारांश

आधुनिक भारताचे जनक म्हणून ओळखले जाणारे राजा राममोहन रॉय यांनी देशात सामाजिक, धार्मिक सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. भारतीय समाजावर धर्माचा जबरदस्त पगडा होता. यात अनेकश्वरवादाची कल्पना, मूर्तिपूजा, पुरोहिताचे महत्त्व याला रॉय यांनी विरोध केला. आपल्या विचारांचा प्रसार व प्रचार करण्यासाठी त्यांनी ब्राह्मो समाजाची स्थापना केली. समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा, चालीरीती, अंधश्रद्धा नष्ट करण्यासाठी ब्रिटिशांकडे कायदा करण्यासाठी आग्रह धरला. त्यांच्यात प्रयत्नाने सतीची चाल लॉर्ड बेटींगच्या काळात कायद्याने बंद करण्यात आली. यात सुधारणा करण्यासाठी भारतीयांनी पाश्चात्त्य शिक्षण घ्यावे असा त्यांचा आग्रह होता. शिक्षणाचा अधिकार पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही असावा असे त्यांचे मत होते. ब्राह्मो समाजाच्या माध्यमातून सामाजिक व धार्मिक सुधारणा घडवून आणली. भारतात सनदशीर मार्गाने राजकीय चळवळ

सुरू केली. व्यक्ती स्वातंत्र्यासंबंधी विचार, शैक्षणिक, स्वातंत्र्याचा हक्क, जीविताचा हक्क, अभिव्यक्तिचे स्वातंत्र्य, कायद्यासंबंधी विचार त्यांनी मांडून लोकशाहीला पूरक वातावरण निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. अभिव्यक्ती हा मानवी स्वातंत्र्याचा पाया असल्याने त्यांनी वृत्तपत्र स्वातंत्र्य व मुद्रण स्वातंत्र्यासाठी ब्रिटिश शासनाकडे आग्रही भूमिका धरून तो मिळविला. भारतात कायद्याचे राज्य यावे, यासाठी ब्रिटिश पार्लमेंटने भारतीयांसाठी कायदा करावा असे त्यांचे मत होते. ब्रिटिशांच्या आगमनाने पाश्चात्त्य शिक्षणाची ओळख झाली. पाश्चात्त्य शिक्षण वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारित असल्याने रॉय यांनी पाश्चात्त्य शिक्षणाचा आग्रह धरला. देशाच्या आर्थिक स्थितीचा विचार करून जमीनदारांकडून होणाऱ्या शोषणाच्या संदर्भात त्यांनी काही सूचना केल्या. यावरून रॉय हे प्रबोधनाचे आद्य प्रवर्तक तसेच उदारमतवादी चळवळीचे प्रवर्तक होते. त्यांच्या कार्याचा अभ्यास केल्यास त्यांचा असलेला मानवतावादी दृष्टिकोन स्पष्ट होतो. त्यांनी आधुनिक भारताच्या विकासासाठी जे मोलाचे कार्य केले त्यावरून त्यांना आधुनिक भारताचे जनक, शिल्पकार म्हणून ओळखले जाते. यावरून त्यांच्या कार्याची महती स्पष्ट होते.

## १. ५ पारिभाषिक शब्द

१) सतीची चाल – पती निधनानंतर पतीसोबत आत्मदहन करण्याची प्रथा.

२) जरठ विवाह – वयोवृद्ध व्यक्तीशी अल्पवयीन मुलीचे लग्न करण्याची प्रथा.

३) एकेश्वरवाद – ईश्वराचे एकच अस्तित्व, एकाच ईश्वराची कल्पना.

४) सनातनी – परंपरागत विचार.

५) सनदशीर चळचळ – शांततेच्या व न्याय मार्गाने चालवलेली चळवळ.

## १.७ सरावासाठी प्रश्न

१) राजा राममोहन रॉय यांचे धार्मिक विचार स्पष्ट करा.

२) राजा राममोहन रॉय यांचे सामाजिक विचार स्पष्ट करा.

३) राजा राममोहन रॉय यांच्या राजकीय विचारांचा आढावा घ्या.

४) रॉय यांचे आर्थिक विचार स्पष्ट करा.

५) रॉय यांच्या शैक्षणिक विचारावर निबंध लिहा.

६) राजा राममोहन रॉय यांना आधुनिक भारताचे जनक का म्हणतात ते सांगा.

७) ब्राह्मो समाजाची तत्त्वे  व उद्दिष्टे स्पष्ट करा.

## १.६ संदर्भ सूची

१) डॉ. बाचल वि. मा. , वराडकर र. घ.(२०१०) , निराली प्रकाशन, पुणे(२०१०).

२) भारतीय राजकीय विचारवंत – प्रा. गोखले आर. एम. कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे(१९७९).

३) भारतीय राजकीय विचारवंत – प्रा. मुळीक आर. जी. (१९९७), सायली, सौ. सिंधुताई राजाराम मुळिक.

४) भारतीय राजकीय विचारवंत – प्राचार्य देवरे पी. डी. डॉ. निकुंभ डी. एस. (२००८), भारतीय राजकीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव.

५) भारतीय राजकीय विचारवंत – प्रा. वराडकर र. घ. , विद्या प्रकाशन, नागपूर.

# घटक २

## न्या. महादेव गोविंद रानडे

**अनुक्रमणिका**


२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२ २ विषय विवेचन

  २.२.१ जीवन परिचय

  २.२.२ न्या. रानडे यांचे राजकीय विचार

  २.२.३ न्या. रानडे यांचे हिंदू राष्ट्रवादासंबधी विचार

  २.२.४ सामाजिक विचार

    २.२.४.१ भारताची ब्रिटिशकालीन स्थिती

    २.२.४.२ राष्ट्रीय सामाजिक परिषद

    २.२.४.३ समाज सुधारणेच्या पद्धती

  २.२.५ आर्थिक विचार

  २.२.६ न्या. रानडे यांच्या विचारांचे परीक्षण

२.३ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

२.४ सारांश

२.५ पारिभाषिक शब्द

२.६ संदर्भ सूची

२.७ सरावासाठी प्रश्न


## २. ० उद्दिष्टे :

या घटकाच्या अध्ययनातून पुढील उद्दिष्टे साध्य होण्यास मदत होईल.

१) न्या. रानडे यांच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक कार्याची ओळख विद्यार्थ्यांना होईल.

२) न्या. रानडे यांचे देशविकासात व महाराष्ट्राच्या जडणघडणीत असलेले योगदान जाणून घेता येतील.

३) न्या. रानडे यांची विचारसरणी व दृष्टिकोन अभ्यासता येईल.

४) न्या. रानडे यांनी नोकरी संभाळून केलेल्या समाजकारणाची व राजकारणाची ओळख

होईल.

५) न्या. रानडे यांच्या काळातील हिंदूस्थानची स्थिती व ब्रिटिशांकडून झालेले आर्थिक शोषण व त्यावरील त्यांनी सांगितलेल्या उपाययोजना जाणून घेता येईल.

## २. १ प्रस्तावना :-

थोर समाजसुधारक, धर्मसुधारक, देशभक्त, उत्तम लेखक, चांगले वक्ते, श्रेष्ठ इतिहासकार आणि अर्थशास्त्रज्ञ असलेल्या न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांनी सनदशीर मार्गाने ब्रिटिश सत्तेला विरोध केला. देशात विशेषतः महाराष्ट्रात सामाजिक, आर्थिक सुधारणा घडवून आणण्यासाठी विविध सामाजिक, राजकीय व शैक्षणिक संस्था स्थापन करून सक्रीय सहभागी होणारे हे न्या. रानडे यांचे व्यक्तिमत्त्व असामान्य होय. ज्यांनी आधुनिक राजकारणाचा पाया घातला. महाराष्ट्रात त्यांनी केलेल्या कार्यामुळे त्यांना 'आधुनिक महाराष्ट्राचे जनक' म्हणून संबोधले जाते.

## २. २ विषय विवेचन :-

### २. २. १ जीवन परिचय :-

न्या. रानडे यांचा जन्म १८ जानेवारी १८४२ रोजी नाशिक जिल्ह्यातील निफाड या गावी झाला. थोर समाजसुधारक, निस्सीम देशभक्त, श्रेष्ठ इतिहासकार, उत्तम अर्थशास्त्रज्ञ व उत्तम वक्ते म्हणून संपूर्ण महाराष्ट्राला ते परिचित आहे.

न्या. रानडे यांचे प्राथमिक शिक्षण कोल्हापूर येथे झाले. उच्च शिक्षण त्यांनी मुंबईला घेतले होते. प्रारंभीचे शिक्षण घेत असतांना वयाच्या १२ व्या वर्षी १८५४ मध्ये त्यांचा सखुबाईशी विवाह झाला. १८६४ मध्ये त्यांनी एम. ए. ही पदवी संपादन केली. मुंबई विद्यापीठाचे ते पहिले पदवीधर होते, म्हणून त्यावेळी त्यांना गौरविण्यात आले. १८६६ मध्ये त्यांनी कायद्याची पदवी प्राप्त केली. (L. L. B. )

शिक्षणानंतर १८६८ ते १८७१ या काळात त्यांनी मुंबईच्या एल्फिस्टन महाविद्यालयात प्राध्यापकाची नोकरी केली. त्याचवेळी त्यांनी स्मॉल कॉज कोर्टाचे न्यायाधिश व पोलीस मॅजिस्ट्रेट म्हणून काम पाहिले. १८७१ मध्ये त्यांची नेमणुक पुण्याच्या न्यायालयात न्यायाधीश म्हणून करण्यात आली होती.

१८७१ ते १८९३ या २२ वर्षाच्या काळात त्यांनी पुण्याच्या सार्वजनिक व राजकीय जीवनात चैतन्य निर्माण करण्याचे कार्य केले. १८७० मध्ये त्यांनी पुण्यात 'सार्वजनिक सभेची' स्थापना केली. १८७१ मध्ये त्यांनी या सभेची सुत्रे स्वतःच्या हातात घेतली होती. सार्वजनिक सभेच्या व्यासपीठावरून सनदशीर राजकारण, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची स्थिती, स्वदेशी उद्योगाच्या ऱ्हासाची कारणे, बालविवाहाला विरोध यांसारखे विचार त्यांनी मांडले. १८७३ मध्ये त्यांच्या पत्नीचे निधन झाले. त्यावेळी मित्राच्या आग्रहास्तव व

वडीलांच्या समाधानासाठी त्यांनी दुसरा विवाह केला. त्यांची दुसरी पत्नी ११ वर्षाची कुमारिका होती. तेंव्हा रानडे यांचे वय ३१ वर्षाचे होते. नंतरच्या काळात त्यांना आपली चुक लक्षात आल्याने त्यांनी बालविवाहाला विरोध केला.

न्या. रानडे हे राष्ट्रीय सामाजिक परिषदेचे संस्थापक होते. १८८७ पासून त्यांनी दरवर्षी काँग्रेसच्या अधिवेशनानंतर त्याच सभा मंडपात राष्ट्रीय सामाजिक परिषदेच्या सभा घेतल्या. या परिषदेचा मुख्य उद्देश, समाज सुधारणेसाठी समाजात जागृती घडवून आणणे हा होता. याशिवाय न्या. रानडे यांचा संबंध अन्य सामाजिक व राजकीय संस्थांशी होता. उदा. सामाजिक सभा, प्रार्थना सभा, विधवा विवाह उत्तेजक मंडळ, इंडियन नॅशनल काँग्रेस इत्यादी. तसेच ज्ञानविकास व मनोविकास संस्था असलेल्या वसंत व्याख्यानमाला, वक्तृत्व उत्तेजक सभा, सार्वजनिक सभेचे त्रैमासिक, डेक्कन सभा, मुलींचे महाविद्यालय, ग्रंथोत्तेजक सभा यांच्याशी होता.

इतिहासकार म्हणून प्रसिद्ध असलेल्या न्या. रानडेंनी 'मराठी सत्तेचा उदय' हा ग्रंथ लिहिला. प्रार्थना समाजाची तत्त्वे, उपासना पद्धती आणि विधी यांचे समर्थन करण्यासाठी त्यांनी एकेश्वरवादाची कल्पना मांडली. म्हणून त्यांना 'प्रार्थना समाजाचे आधारस्तंभ' म्हटले जाते. १६ जानेवारी १९०९ रोजी मुंबई येथे या महापुरुषाचा स्वर्गवास झाला. त्यांच्या कार्याचा गौरव करताना लोकमान्य टिळकांनी काढलेले गौरद्गार असे, 'महाराष्ट्राच्या थंड गोळ्याला सजीव करण्याचे महान कार्य रानडेंनी केले. ' यावरून त्यांच्या कार्याची महती आपल्या लक्षात येते. त्यांच्या कार्याचा सखोल अभ्यास करण्यासाठी त्यांची विचारसरणी जाणून घेऊ.

## २.२.२ न्या. रानडे यांचे राजकीय विचार :-

व्यक्तीच्या समुच्चयातून राष्ट्र निर्माण होते. या राष्ट्राचे एक सरकार असते. व्यक्तीला सुखी, समाधानी व आनंदी जीवन जगता यावे यासाठी राज्यसंस्था निर्माण झाल्या.

न्या. रानडे यांच्या मते, राज्यसंस्था चालविण्याचे कार्य ज्या व्यक्तीं करतात त्यांनी राज्याचा उपयोग स्वहितासाठी न करता जनहितासाठी करावयास हवा. राजाचे कर्तव्य आहे की,

१. समाजात शांतता व सुव्यवस्था निर्माण करून ऐक्य प्रस्थापित करणे.

२. परकीय आक्रमण किंवा अंतर्गत कलहापासून देशाचे रक्षण करणे.

३.जनतेचे हित विचारात घेऊन जनहितार्थ सेवा पुरविणे.

मात्र ब्रिटिश शासनाने याकडे दुर्लक्ष केले. कालांतराने लोकसंख्या वाढत गेली. उत्पादन वाढले, परकीय आक्रमणे झाली. भारतीय समाजात पोटवर्ग व उपवर्ग निर्माण झाले. व्यक्तीला समाजात एक स्वतंत्र घटक म्हणून मान्यता मिळत गेली.

याच काळात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली. भांडवलशाहीचा उदय आणि विकास झाला. भांडवलदारानी स्वतःचा विकास केला. त्याचप्रमाणे भारतीयांनी आपल्या देशाचा विकास करावा. स्वातंत्र्य मिळवावे व या स्वातंत्र्याचा उपयोग देशहितासाठी करावा

असा उदार दृष्टीकोन न्या. रानडे यांनी मांडला.

न्या. रानडे यांना आदर्शवादी विचार किंवा अनियंत्रित राजेशाही मान्य नव्हती. त्यांच्या मते, व्यक्तीने स्वतःच्या विकासासाठी राज्य निर्माण केले. तेव्हा राज्याने व्यक्तीहित व समाहितासाठी पुढील कार्य करावयास हवे. –

१) राज्याने जनतेला व्यक्तिविकासासाठी आचार–विचारांचे स्वातंत्र्य द्यावे व समाजात शांतता व सुव्यवस्था निर्माण करावी.

२) समाजातील श्रेष्ठ–कनिष्ठता नष्ट करून समाजातील विषमता नष्ट करून न्यायपूर्ण वातावरण निर्माण करणे. तसेच व्यक्तीवर होणारे अन्याय नष्ट करून समाजात न्याय प्रस्थापित करणे.

३) देशाच्या आर्थिक विकासासाठी विविध कल्याणकारी योजना तयार करून त्यांची अंमलबजावणी करणे तसेच सामाजिक व राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे.

४) समाजाच्या विकासासाठी विविध कल्याणकारी योजना तयार करून त्यांची अंमलबजावणी करणे तसेच सामाजिक व राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे.

५) व्यक्तीला खाजगी मालमत्तेचा अधिकार असावा. गरीबांना स्वतंत्रपणे जीवन जगता यावे यासाठी श्रीमंतांकडून जास्त कराची वसुली करण्यात यावी.

अशाप्रकारे न्या. रानडे यांनी व्यक्तिविकासाला साध्य मानून राज्याला व्यक्तिविकासाचे साधन मानले. जनतेची क्षमता, कुवत व कर्तृत्व यावर देशाचा विकास अवलंबून असतो हे लक्षात घेऊन जनतेला कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी शिक्षण देण्याचा आग्रह धरला.

न्या. रानडे यांच्या राजकीय विचारातील महत्त्वपूर्ण बाबी पुढीलप्रमाणे –

● स्वाभिमान, प्रतिष्ठा, ज्ञान, देशाभिमान, जबाबदारीची जाणीव, स्वातंत्र्य इत्यादी बाबींना प्राधान्य देणारी लोकशाही शासनपद्धती स्वीकारावी असे त्यांचे मत होते.

● मनुष्याचे चांगले किंवा वाईट ठरविताना आपल्या सदसद्विवेक बुद्धिचा वापर करावा. वाईटातून नेहमीच चांगले होते असे त्यांचे मत होते.

● जात, धर्म, वंश, पंथ हे घटक व्यक्तिविकासाच्या व राष्ट्रविकासाच्या मार्गातील अडथळे आहेत. म्हणून त्यांच्या विषयी असलेला फाजील अभिमान सोडावा. तसेच तडजोड आणि सामंजस्य बुद्धिने कार्य करावे असा मवाळ आणि नेमस्तवादी विचार न्या. रानडे यांचा होता.

● ब्रिटिशांनी भारतात कायद्याचे राज्य निर्माण केले. ही त्यांनी भारतीयांना दिलेली मोठी देणगी आहे. म्हणून ब्रिटिश हे भारतीयांसाठी वरदान आहे असे त्यांचे मत होते. तेव्हा भारतीयांनी त्यांना विरोध करू नये असा मवाळ दृष्टीकोन न्या. रानडेंचा होता.

● हिंदू समाजात अनेक रूढी, परंपरा आहेत. रूढी व परंपराप्रिय असलेल्या भारतीय

समाजाला पाश्चात्त्य विचारसरणी एकदम आवडणार नाही. तेव्हा ब्रिटिशांनी भारतीय जनतेची मानसिकता बदलून हळूहळू भारतात सुधारणा घडवून आणावी, असा नवउदारमतवादी विचार न्या. रानडेंचा होता.

यावरून आपल्या लक्षात येते की, लोकशाही, स्वातंत्र्य, विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन, सनदशीर मार्ग, मवाळ धोरण हे न्या. रानडे यांच्या राजकीय तत्त्वज्ञानातील महत्त्वपूर्ण बाबी होत्या.

## २. २. ३ न्या. रानडे यांचे हिंदू राष्ट्रवादासंबंधी विचार :-

न्या. रानडे यांचा कालखंड १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातील आहे. या काळात महाराष्ट्राच्या राजकारणात जहाल आणि मवाळ असे दोन गट होते. न्या. रानडे हे मवाळवादी विचारांचे होते. त्यांना ब्रिटिश सत्ता ईश्वरी वरदान वाटायची. आपला धर्म, संस्कृती व परंपरा त्यांना श्रेष्ठ वाटायच्या. ब्रिटिश राजसत्तेत दोष आहे हे ते मान्य करत. हे दोष नष्ट करण्यासाठी अर्ज आणि विनंती करून म्हणजेच सनदशीर मार्गाने आपले प्रश्न मांडावेत असे त्यांनी सुचविले.

ब्रिटिश सत्तेला विरोध केल्यास आपल्या देशाचे नुकसान होईल, म्हणून जोपर्यंत आपल्या देशात सामाजिक सुधारणा होत नाही तोपर्यंत भारतीयांनी राजकीय सुधारणा म्हणजे स्वातंत्र्याचा विचार करणे योग्य ठरणार नाही असे न्या. रानडे यांचे विचार होते. ब्रिटिशांशी एकनिष्ठ असणारे न्या. रानडे यांनी हिंदूस्थानातील जनतेला राजकीयदृष्ट्या जागृत करण्याचे व एकत्रित करण्याचे कार्य केले. त्यासाठी जनतेला जाज्वल्य इतिहासाची आठवण करून दिली. गतकाळात घडलेल्या घटना व पराक्रम यांचा संबंध वर्तमानकाळाशी जोडून भविष्य काळातील आशा-आकांक्षा यांची जाणीव करून देण्याचे महान कार्य न्या. रानडे यांनी केले.

ब्रिटिशांच्या एकछत्री राज्यकारभारामुळे हिंदूस्तानात विखुरलेली जनता ही ब्रिटिशांच्या एकछत्री अंमलाखाली आली. त्यांच्यात आपण एक असल्याची भावना निर्माण झाली. राष्ट्रवादाच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास ब्रिटिश सत्ता ही आपल्या देशासाठी वरदान ठरलेली आहे असे न्या. रानडे यांचे मत होते.

परंतु ब्रिटिशांकडून भारतीयांचे होणारे शोषण योग्य नाही. तरीही जनतेने हे समजून घेतले पाहीजे की, पारतंत्र्य कितीही वाईट असले तरी या वाईटातून आपल्याला चांगले दिवस येणार हे न्या. रानडे यांनी लोकांना पटवून दिले. व त्यांच्यात नवचैतन्य निर्माण केले.

न्या. रानडे यांनी जनतेला असे आवाहन केले की, आपआपसातील मतभेद किंवा कलह विसरून जा. संघटीत व्हा.  या संघटीत शक्तीमुळेच हिंदूस्तानचा विकास जलद गतीने होऊ शकतो. व्यक्तीने केवळ मी आणि माझा संसार असा सीमित विचार न करता समाज हा विचार करावा. समाजसेवेच्या वृत्तीतून व्यक्तीने कार्य करावे. या विशाल दृष्टीकोनामुळे जनतेत आत्मीयता निर्माण होईल. ही आत्मीयता किंवा आपलेपणाची

भावना राष्ट्रवाद निर्माण करण्यास कारणीभूत ठरेल. त्या काळात सुरू झालेल्या राष्ट्रीय चळवळीला पाठिंबा देण्यासाठी त्यांनी जनतेत जागृती घडवून आणली.

न्या. रानडे यांच्या मते, देशाचा राज्यकारभार सुरळीत चालविण्यासाठी देशाची एक राज्यघटना असावी. ही राज्यघटना तयार करण्याचे काम चांगल्या अशा बुद्धिमान लोकांकडे सोपवावे. राष्ट्रविकासाच्या योजना आखाव्यात. त्या आखताना जात, धर्म, वंश, पंथ, लिंग आदी बाबींचा विचार करू नये.

अशाप्रकारे न्या. रानडे यांनी देशातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक तसेच मानसिक परिस्थितीचा विचार करून जनतेत राष्ट्राभिमान निर्माण करण्याचे व त्यांना संघटित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

## २. २. ४ सामाजिक विचार :-

न्या. रानडे यांना आधी सामाजिक सुधारणा की राजकीय सुधारणा हा वाद मान्य नव्हता. त्यांच्या मते, हिंदुस्थानात मोठ्या प्रमाणात सुधारणा झाल्या पाहिजे. कारण त्याशिवाय राजकीय आणि आर्थिक सुधारणा होणे शक्य नाही. न्या. रानडे यांच्या मते, राजकीय आणि सामाजिक सुधारणा या दोन्ही गोष्टी समाज जीवनासाठी सारख्याच महत्त्वपूर्ण आहेत. आपण राजकीय सुधारणेला महत्त्व देऊन स्वातंत्र्य प्राप्त केले तर आपला देश स्वतंत्र होईल, हे निश्चित. परंतु देशातील अनिष्ट रूढी, परंपरा, अंधश्रद्धा तशाच कायम राहिल्या तर मनुष्य स्वतंत्रपणे जीवन जगू शकणार नाही. म्हणून राजकीय स्वातंत्र्याचा विचार करण्याची ही वेळ नाही, असे न्या. रानडे यांचे मत होते.

प्रथमतः व्यक्तीने शिक्षण घ्यावे. अंधश्रद्धा नष्ट करून विज्ञाननिष्ठ दृष्टीकोनाचा स्वीकार करावा. कर्तव्याची जाणीव करून घ्यावी. स्वविवेकाचा वापर करावा. असे केल्याने सामाजिक स्वातंत्र्य प्राप्त होईल असे त्यांचे विचार होते. सामाजिक स्वातंत्र्य राजकीय स्वातंत्र्याचा पाया आहे. सामाजिक स्वातंत्र्याशिवाय राजकीय स्वातंत्र्याची इमारत स्वतंत्रपणे उभी होऊ शकणार नाही. तेव्हा आधी सामाजिक स्वातंत्र्य की राजकीय स्वातंत्र्य या वादात न पडता प्रथम स्वतःत सुधारणा घडवून आणाव्यात, कारण या दोन्ही संकल्पना परस्परांशी संबंधित आहेत असे न्या. रानडे यांचे मत होते.

### २. २. ४. १ भारताची ब्रिटिशकालीन स्थिती :-

ब्रिटिश काळात भारतीय समाजाची स्थिती अत्यंत निराशाजनक होती. त्या काळात जातीभेद, विषमता, अनिष्ट चालीरीती, स्त्रियांना दुय्यम स्थान अशा अनेक प्रकारच्या समस्या होत्या. शिक्षण हे केवळ विशिष्ट वर्गासाठीच उपलब्ध होते. धर्मस्वातंत्र्याचा फायदा समाजातील काही लोकांनाच मिळाला, ही भारताची त्या काळातील स्थिती पाहून न्या. रानडे यांनी सुधारणेसंबंधी विचार मांडला. त्यांच्या मते, ‘‘समाज सुधारणा म्हणजे जुन्या विचारांत

परिस्थितीनुसार योग्य तो बदल करून नवीन विचार स्वीकारणे होय. ''

ही सामाजिक सुधारणा ब्रिटिशांच्या काळात घडवून आणल्यास भारतीय जनतेची मानसिकता तयार होईल. तेव्हा स्वातंत्र्य मिळविण्यास वेळ लागणार नाही. यासाठी न्या. रानडे यांनी ब्रिटिश राजवट असतांनाच देशात सामाजिक सुधारणा घडवून आणाव्यात असे विचार जनतेला पटवून दिले.

## २.२.४.२ राष्ट्रीय सामाजिक परिषद :-

न्या. रानडे यांच्या प्रेरणेने व प्रयत्नाने १८७० मध्ये राष्ट्रीय सामाजिक परिषदेची स्थापना झाली. राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात नंतर तेथेच राष्ट्रीय सामाजिक परिषदेची सभा होत असे.

- **उद्देश –** या राष्ट्रीय सामाजिक परिषदेचा उद्देश सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक आदी विविध क्षेत्रांत सुधारणा घडवून आणणे हा होता.
- **हेतू –** या राष्ट्रीय सामाजिक परिषदेचा हेतू असा होता की, राष्ट्रीय काँग्रेस मधील दोष, वैगुण्ये दूर करून देशात ऐक्य निर्माण करणे.
- **कार्यपद्धती –** न्या. रानडे यांनी सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी सनदशीर मार्गाचा अवलंब केला. सतत २० वर्षे त्यांनी सामाजिक सुधारणेबाबतचे विचार जनतेसमोर मांडले.

समाज सुधारणेसाठी सामाजिक रचना माहीत असणे आवश्यक आहे. समाजातील विविध प्रश्नांसंबंधीची माहिती जाणून घेण्यासाठी त्यांनी प्रश्नावली तयार केली. या प्रश्नावलीत स्त्रीशिक्षण, व्यसन, केशवपन, जलपर्यटनावरील बंदी, विधवा विवाहाला विरोध, प्रौढ शिक्षण अशा अन्य बाबींची माहिती जाणून घेणारे प्रश्न होते.

**व्यक्ती स्वातंत्र्याबाबत विचार :-**

न्या. रानडे यांच्या मते, समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी व्यक्तीला आचार व विचारांचे स्वातंत्र्य असावयास हवे. या स्वातंत्र्यामुळे व्यक्ती नवनवीन विचार जाणून घेण्याचा प्रयत्न करते. मात्र हिंदूस्थानात धर्माच्या नावाखाली व्यक्तीला बंदीस्त ठेवले गेले. कर्मापेक्षा दैवावर विश्वास ठेवला जाई. न्या. रानडे यांच्या मते, ''दैववाद हा अधःपतन होत चाललेल्या मानवी समाज वृक्षाला येणारे अत्यंत कटू फूल आहे. '' यासाठी त्यांनी व्यक्ती स्वातंत्र्याला महत्त्व दिले.

**जातीव्यवस्थेला विरोध :-**

भारतात जातीव्यवस्थेला समाजाचा पाया मानून श्रेष्ठ आणि कनिष्ठ असे स्तर निर्माण करण्यात आले. काही जातींना कनिष्ठ मानून त्यांना हीनतेची वागणुक दिली गेली. त्यामुळे समाजातील काही व्यक्तींचा विकास होऊ शकला नाही. म्हणून न्या. रानडे यांनी

सामाजिक सुधारणेतील अडसर असलेल्या जातीव्यवस्थेला विरोध केला.

### २. २. ४. ३ समाजसुधारणेच्या पद्धती :-

न्या. रानडे यांनी देशात सामाजिक सुधारणा घडवून आणण्याबाबत तीन पद्धती सांगितल्या.

१) समाजातील जुन्या चालीरिती, रूढी, परंपरा यांना बदलत्या परिस्थितीनुसार अर्थ देऊन समाजात सुधारणा घडवून आणावी. तसेच आमच्या देशात वर्षांनुवर्षांपासून चालत आलेल्या काही चांगल्या रूढी, परंपरा असतील त्यांचा वापर करावा.

२) समाजातील ज्या काही अनिष्ट रूढी, परंपरा, चालीरीती आपल्या बुद्धिला पटत नसतील त्यांचा त्याग करावा.

३) समाजात काही वेळा जनता सांगून ऐकत नसेल म्हणजेच सुधारणा घडवून आणणे शक्य नसेल तेव्हा योग्य तो कायदा करून सुधारणा करावयास हवी.

अशाप्रकारे न्या. रानडे यांनी हिंदू धर्माच्या जुनाट वृक्षावर जी बांडगुळ वाढली होती ती कापुन काढण्याचा प्रयत्न केला. हे करतांना सामाजिक आणि राजकीय सुधारणेची ताटातुट केली नाही. त्यांच्या मते, जसे सूर्यप्रकाशापासून उष्णता किंवा गुलाबाच्या सौंदर्यापासुन त्याचा सुगंध जसा वेगळा करता येत नाही, त्याचप्रमाणे समाजकारण आणि राजकारण यांना वेगळे करता येत नाही. सामाजिक सुधारणेच्या पायावरच राजकीय स्वातंत्र्याची इमारत जास्त काळ टिकू शकेल. म्हणून न्या. रानडे यांनी सामाजिक सुधारणेला प्राधान्य दिले होते.

### २. २. ५ आर्थिक विचार :-

न्या. रानडे यांनी हिंदूस्थानच्या आर्थिक परिस्थितीचा सखोल व चिकित्सक पद्धतीने अभ्यास केला. रानडे यांच्या मते, ब्रिटिशांनी हिंदूस्थानचे शोषण केल्यामुळे देश गरीब बनला. सधन, संपन्न, सुजलाम, सुफलाम असा आर्थिक दृष्टिने भरभराटीचा असलेला देश हिंदूस्थान होता. मात्र ब्रिटिशांच्या आगमनानंतर ब्रिटिशांनी विविध मार्गाने भारतीयांचे शोषण केले. भारतात काम करणाऱ्या ब्रिटिश अधिकाऱ्यांना दिला जाणार पगार, पेन्शन हिंदूस्थानच्या तिजोरीतून दिला जाई. तसेच इतर अनेक मार्गांनी हिंदूस्थानातील बराच पैसा ब्रिटिशांकडे जात होता. त्यामुळे शोषण होऊन हिंदूस्थानात दारिद्र्य आले. या दारिद्र्याच्या कारणांची मीमांसा न्या. रानडे यांनी केली.

**दारिद्र्याची कारणे :**

१) हिंदूस्थानातील जनतेत उद्योगधंद्यांसाठी लागणारा धाडसीपणा नाही.

२) वाढत्या लोकसंख्येप्रमाणे उद्योगधंद्यांची वाढ न झाल्याने हिंदूस्थानातील दारिद्र्य वाढले. भांडवलाचा तुटवडा हे उद्योगधंदे न वाढण्यामागील कारण होय.

३) भारत हा शेतीप्रधान देश आहे. शेती ही मागासलेल्या अवस्थेत असल्यामुळे दारिद्र्य वाढले. सावकारांच्या कर्जामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती खालावलेली होती.

४) भारतातील ७०% जनता ही गावात राहते. गावातील जनता ही परंपराप्रिय असल्यामुळे गावाचा विकास होऊ शकला नाही.

या विविध कारणांमुळे निर्माण झालेल्या दारिद्र्यावर न्या. रानडे यांनी पुढील उपाय सुचविले.

**दारिद्र्य निर्मूललनावरील न्या. रानडेंनी सुचविलेले उपाय :-**

न्या. रानडे यांची आर्थिक समितीच्या सदस्यपदी सरकारने नेमणूक केली. त्यावेळी त्यांनी देशाच्या आर्थिक व औद्योगिक प्रगतीसाठी काही उपाय सुचविले. ते उपाय पुढीलप्रमाणे.

१) आर्थिक विकासासाठी सरकारने आर्थिक नियोजन करावे.

२) सरकारने आर्थिक क्षेत्रात हस्तक्षेप करून उद्योगधंद्याला चालना द्यावी.

३) उपलब्ध साधन सामग्रीचे योग्य वाटप करून उद्योगधंद्याचा विकास करावा.

४) मोठ्या उद्योगधंद्याप्रमाणे लघु उद्योगधंद्याला चालना द्यावी.

५) उद्योगधंद्यासाठी लागणारे भांडवल निर्माण करावे.

६) भारताने आपला माल आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत न्यावा.

७) देशाचे शहरीकरण घडवून आणावे.

८) शेती व्यवसायाचे आधुनिकीकरण करावे.

९) शेतकऱ्यांसाठी लागणाऱ्या भांडवल पुरवठ्यासाठी भू-विकास बँकांची स्थापना करावी.

१०) तांत्रिक पद्धतीने व आधुनिक पद्धतीने शेती करण्यासाठी विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणासाठी पाठवावे.

अशाप्रकारच्या विविध उपाययोजना सुचवून न्या. रानडे यांनी हिंदूस्थानच्या आर्थिक प्रगतीला चालना दिली. हिंदूस्थानच्या अर्थशास्त्राचा पाया रचण्याचे महत्त्वपूर्ण कार्य न्या. रानडे यांनी केले.

## २. २. ६ न्या. रानडे यांच्या विचारांचे परीक्षण :-

न्या. रानडे थोर समाजसुधारक, धर्मसुधारक, देशभक्त, उत्तम लेखक, चांगले वक्ते, श्रेष्ठ इतिहासकार व अर्थशास्त्रज्ञ होते. २२ जानेवारी १९०१ मध्ये लोकमान्य टिळकांनी त्यांच्याविषयी लिहिलेल्या लेखात म्हटले की, ' महाराष्ट्र देश त्यावेळी एक थंड गोळा होऊन पडला होता. या थंड गोळ्यास कोणत्या प्रकारे ऊब दिली असता तो थंड गोळा

सजीव होईल व हातपाय हलवु लागेल याचा रात्रंदिवस विचार करून अनेक प्रकारे व अनेक उपायांनी त्यास सजीव ठेवण्याचे कठीण कार्य अंगावर घेऊन, त्याकरिता जीवापाड जर कोणी मेहनत केली असेल तर ती प्रथमतः महादेव रानडे यांनी केली असे म्हटले पाहिजे. हेच त्यांच्या थोरवीचे आणि असामान्य व्यक्तीमत्त्वाचे लक्षण आहे.

न्या. रानडे यांनी विविध क्षेत्रात सुधारणा केल्या. सरकारी नोकरीत राहून त्यांनी राजकीय कार्यकर्त्याची भूमिका चांगल्या प्रकारे बजावली. त्यांनी व्यापक स्वरूपात समाज सुधारणेचे कार्य केले. म्हणून त्यांना 'समाजसुधारकांचे मुकुटमणी' असे म्हटले गेले होते.

मात्र समाजसुधारकाच्या अंगी लागणारे औदार्य, सहनशीलता, नीतिधैर्य न्या. रानडे यांच्याकडे नव्हते अशी टीका केली गेली. कारण न्या. रानडे यांची बहीण वयाच्या २१ व्या वर्षी विधवा झाली होती. त्यावेळी बहिणीचा पुनर्विवाह करण्याचे धाडस त्यांनी दाखविले नाही. तसेच त्यांच्या पहिल्या पत्नीच्या निधनानंतर मित्राच्या आग्रहाखातर व वडिलांच्या समाधानासाठी ३१ वर्षाचे न्या. रानडे ११ वर्षाच्या रमाबाईंशी विवाहबद्ध झाले. परंपरावादी समाजाच्या विरोधात जाण्याचे धाडस त्यांनी केले नाही. असे धाडस आपण केले तर समाज आपल्यापासून दूर जाईल अशी भीती त्यांच्या मनात असावी.

न्या. रानडे यांच्या सामाजिक विचारांबाबतच्या काही अपवादात्मक बाबी सोडल्या तर त्यांचे सामाजिक विचार समाज सुधारणेच्या दृष्टिने मोलाचे होते. हे मान्य करावे लागते. सामाजिक सुधारणेप्रमाणेच ते राजकीय सुधारणा घडवून आणण्यात सक्रीय होते. राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. काँग्रेसच्या नेत्यांना वेळोवेळी मार्गदर्शन व प्रोत्साहन देण्याचे कार्य त्यांनी केले. न्या. रानडे हे व्यावसायिक राजकारणी नव्हते. केवळ लोकहिताचा विचार करणारे ते समाजसुधारक होते. समाजसुधारणेबरोबर त्यांनी आधुनिक राजकारणाचा पाया घातला. म्हणून त्यांच्या विचारांना महत्त्व प्राप्त झाले, त्यांनी केलेल्या महाराष्ट्रातील कार्यामुळे त्यांना 'आधुनिक महाराष्ट्राचे जनक' म्हणुन ओळखले जावु लागले.

## २. ३ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न :-

१) न्या. रानडे यांनी स्थापन केलेली सामाजिक संस्था कोणती?

२) न्या. रानडे यांच्या मते राज्याचे कर्तव्य कोणते?

३) न्या. रानडे यांच्या राजकीय तत्त्वज्ञानातील महत्त्वपूर्ण बाबी सांगा.

४) न्या. रानडे यांनी देशाचा राज्यकारभार सुरळीत चालावा यासाठी कोणत्या बाबी सुचविल्या?

५) राष्ट्रीय सामाजिक परिषदेची स्थापना कोणी व केव्हा केली?

६) न्या. रानडे यांनी हिंदूस्थानच्या दारिद्र्याची कोणती कारणे सांगितली?

७) दारिद्र्य निर्मूलनाबाबतचे न्या. रानडे यांनी सुचविलेले उपाय सांगा.

## २. ४ सारांश :–

थोर समाजसुधारक, धर्मसुधारक, देशभक्त, उत्तम वक्ता व लेखक तसेच श्रेष्ठ इतिहासकार आणि अर्थशास्त्रज्ञ असलेल्या न्या. रानडे यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजहितासाठी व हिंदूस्थानच्या प्रगतीसाठी केला. समाज प्रबोधनासाठी व्याख्याने दिलीत. सार्वजनिक सभेचे व्यासपीठ तसेच प्रार्थना सभा, राष्ट्रीय सामाजिक परिषदेच्या माध्यमातून समाजात प्रबोधन केले. मवाळ विचारसरणीच्या न्या. रानडे यांनी सनदशीर मार्गाचा स्वीकार ब्रिटिश सत्तेला विरोध करण्यासाठी केला. भारताने प्रथम सामाजिक सुधारणा घडवून आणावी. त्यानंतरच राजकीय स्वातंत्र्याचा विचार करावा. सामाजिक सुधारणेवरच राजकीय स्वातंत्र्याची इमारत असल्याने ब्रिटिशांनी कायदे करून भारतीय जनतेची मानसिकता बदलावी असे त्यांचे विचार होते. व्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या न्या. रानडे यांचा दृष्टीकोन उदारमतवादी होता. ब्रिटिश राजवट भारतात असतानाच सामाजिक सुधारणा घडवून आणाव्यात असे त्यांचे विचार होते. ब्रिटिशांकडून होणारे भारतीयांचे आर्थिक शोषण हे हिंदूस्थानातील दारिद्र्य निर्मितीस कारणीभूत असून त्या संदर्भात न्या. रानडे यांनी काही उपायही सुचविले होते. या त्यांच्या उपायांमुळे हिंदूस्थानाच्या आर्थिक विचाराला चालना मिळाली. भारतीय अर्थशास्त्राचा पाया रचण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले. त्यांच्या कार्यामुळे त्यांना समाजसुधारकांचे मुकुटमणी म्हटले गेले. आधुनिक राजकारणाचा पाया त्यांनी रचला. त्यांनी महाराष्ट्रात केलेल्या कार्यामुळे त्यांना 'आधुनिक महाराष्ट्राचा जनक' असे संबोधले गेले. यावरून त्यांच्या कार्याची व विचारांची महती आपणास पटते.

## २. ५ पारिभाषिक शब्द :–

१) आदर्शवादी विचार :– व्यक्तीहितापेक्षा राज्यहिताला प्राधान्य देणारी विचारसरणी

२) अनियंत्रित सत्ता :– कोणत्याही प्रकारचे बंधन अथवा नियंत्रण नसलेली सत्ता.

३) सनदशीर मार्ग :– अर्ज, विनंती यासारख्या शांतता व लोकशाहीला अनुकूल असलेला मार्ग

## २. ६ संदर्भ सूची :–

१) प्रा. वराडकर र. घ. , भारतीय राजकीय विचारवंत – विद्या प्रकाशन, नागपूर.

२) प्राचार्य देवरे पी. डी. , डॉ. निकुंभ डी. एस., (२००८). भारतीय राजकीय विचारवंत – प्रशांत पब्लीकेशन्स, जळगांव

३) प्रा. मुळीक आर. जी. , सौ. सिंधुताई राजाराम मुळीक,(१९९७). भारतीय राजकीय विचारवंत – सांगली

४) प्रा. पाटील बी. बी. , (१९९७). भारतीय राजकीय विचारवंत - फडके प्रकाशन, कोल्हापूर

५) प्रा. गोखले रामचंद्र महादेव, `(१९७९). भारतीय राजकीय विचारवंत –कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे

## २. ७ सरावासाठी प्रश्न

१) न्या. रानडे यांचे सामाजिक सुधारणासंबंधी विचार स्पष्ट करा.

२) न्या. रानडे यांचे राजकीय विचार विशद करा.

३) न्या. रानडे यांनी स्थापन केलेल्या राष्ट्रीय सामाजिक परिषदेची माहिती देऊन त्यांच्या सामाजिक सुधारणेच्या पद्धती सांगा.

४) न्या. रानडे यांच्या हिंदू राष्ट्रवादी विचारांचे परीक्षण करा.

५) न्या. रानडे यांनी मांडलेल्या आर्थिक विचारांचा आढावा घ्या.

६) हिंदूस्थानातील दारिद्र्याची कारणे व त्यावरील न्या. रानडे यांनी सुचविलेले उपाय विशद करा.

७) न्या. रानडे यांना 'आधुनिक महाराष्ट्राचे जनक' का संबोधतात ?

८) न्या. रानडे यांच्या विचारांचे परीक्षण करा.

# घटक ३
# दादाभाई नौरोजी

**अनुक्रमणिका**

३.० उद्दिष्टे
३.१ प्रस्तावना
३.२ विषय विवेचन
३.२. १ जीवन परिचय
३.२. २ दादाभाई नौरोजींचे राजकीय विचार
३.२. ३ दादाभाई नौरोजींचे आर्थिक विचार
३.२. ३.१ दादाभाई नौरोजी यांचा आर्थिक उत्सारणाचा सिद्धांत
३.२. ४ दादाभाई नौरोजींच्या विचारांचे परीक्षण
३.३ स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न
३.४ सारांश
३.५ पारिभाषिक शब्द
३.६ संदर्भ सूची
३.७ सरावासाठी प्रश्न

## ३.१ प्रस्तावना

भारताला स्वातंत्र मिळवून देणाऱ्या अनेक विचारवंतांपैकी एक राजकीय विचारवंत दादाभाई नौरोजी होत. दादाभाई नौरोजींच्या राजकीय जीवनाची सुरुवात सामाजिक सुधारणांपासून झाली. राष्ट्रीय सभेने स्वराज्याचा स्वीकार करावा असा आग्रह धरणारे दादाभाई उदारमतवादी होते. नीती व न्यायाला राज्याचा आधार मानणाऱ्या दादाभाईंनी ब्रिटिशांच्या सामाजिक सुधारणांचा स्वीकार केला. मात्र भारताच्या दारिद्र्यास ब्रिटिशांना जबाबदार धरले. ब्रिटिशांनी केलेल्या आर्थिक शोषणामुळेच भारतात दारिद्र्य निर्माण झाले. याबाबत त्यांनी आर्थिक उत्सारणाचा सिद्धांत मांडला. ब्रिटिशांनी केलेल्या आर्थिक व नैतिक शोषणामुळे त्यांनी स्वराज्याचा मंत्र भारतीय जनतेला दिला. याबाबतचे सविस्तर विवेचन आपण या प्रकरणात अभ्यासणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२. १ जीवन परिचय :–

दादाभाईंचा जन्म ४ सप्टें, १८२५ ला पारशी कुटुंबात झाला. वयाच्या १० व्या वर्षी वडिलांचा मृत्यु झाला. कुशाग्र बुद्धीमुळे शिक्षण बोर्डाने त्यांना उच्च शिक्षणासाठी पाठविण्याचे ठरविले.

त्यामुळे शिक्षण मोफत असावे व ते आवडीनुसार घेता यावे असा विचार त्यांच्या मनात निर्माण झाला. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी एलफिन्स्टन कॉलेजात तत्वज्ञान व गणित हे विषय शिकविले या विद्यालयातील ते पहिले भारतीय शिक्षक होते. अध्यापनाबरोबर त्यांनी सामाजिक कार्यात भाग घेतला. ज्ञान प्रसारक मंडळाची स्थापना केली. स्त्री–शिक्षणाचा पुरस्कार केला. विधवा विवाहाला प्रोत्साहन दिले. धार्मिक सुधारणा केल्या, तसेच बॉम्बे असोसिएशन, पारशी जिमखाना व अल्बर्ट मिशनची स्थापना केली.

१८८५ मध्ये नोकरी सोडून एका कंपनीचे ते भागीदार बनले. कंपनीमार्फत ते इंग्लंडला गेले. तेथील तीन वर्षांच्या वास्तव्यात इंग्लंडमधील सामाजिक व राजकीय संस्थांची माहिती मिळविली. ब्रिटिश पार्लमेंटच्या समितीसमोर भारतातील आर्थिक परिस्थितीचे चित्रण केले. 'इंग्लंडमध्ये ईस्ट इंडिया असोसिएशन' या संस्थेची स्थापना केली. भारतात आल्यावर मुंबई, मद्रास, कलकत्ता येथे त्याच्या शाखा सुरु केल्या.

१८७५ मध्ये ते मुंबई महापालिकेत निवडून आले. ब्रिटिश भारताचे आर्थिक व नैतिक शोषण कशाप्रकारे करत आहे या संबंधीचे विचार मांडले. ३० जून १९१७ रोजी दादाभाईंचा मृत्यु झाला.

### ३.२.२ दादाभाईंचे राजकीय विचार :–

दादाभाई नौरोजी यांच्या राजकीय जीवनाची सुरुवात स्त्री–शिक्षण या सामाजिक सुधारणेच्या कार्यापासूनच झाली. त्यांनी प्रत्येक राजकीय प्रश्नाचा स्वतंत्रपणे विचार केला. त्यांच्या मते, राष्ट्रीय सभेचे केवळ राजकीय बाबींचा स्वीकार करावा. त्यात सामाजिक, आर्थिक, धार्मिक या समस्यांमुळे आपण आपले मूळ उद्दिष्ट– स्वराज्याचे साध्य करू शकणार नाही. यासाठी प्रथमत: राष्ट्रीय सभेने स्वराज्याचाच विचार करावा, असे नौरोजींचे मत होते. त्यांच्या राजकीय विचारात उदारमतवाद, सनदशीर मार्ग, तसेच नैतिक मुल्य यांचा प्रामुख्याने विचार केला गेला आहे. त्यांच्या राजकीय विचारांची ठळक वैशिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.

१) **उदारमतवाद :–** दादाभाई नौरोजींच्या राजकीय विचारांचे वर्णन राजकीय उदारमतवाद असे केले जाते. भारतातील 'राजकीय उदरमतवादाचे आद्य प्रवर्तक' म्हणून त्यांना ओळखले जाते.

त्यांचा उदारमतवाद हा सामाजिक सुधारणेच्या उद्देशाने प्रेरित झालेला होता. म्हणून

सामाजिक व राजकीय सुधारणा हे त्यांच्या उदारमतवादाचे ध्येय होते. शक्तिप्रयोग हा जरी राज्याचा आवश्यक भाग असला तरी तो राज्याचा आधार होऊ शकत नाही. राज्याचा आधार न्याय व नीतीच असावयास हवी.

**व्यक्ती स्वातंत्र :-** व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच व्यक्तीला स्वतंत्रपणे व चांगले जीवन जगता येण्यासाठी स्वातंत्र्य आवश्यक आहे. म्हणून ब्रिटिशांनी आपल्याप्रमाणेच भारतीय जनतेलाही स्वातंत्र्य दयावे अशी आग्रही भूमिका नौरोजींनी मांडली. या स्वातंत्र्यामुळे भारतीय जनतेत जबाबदारीची जाणीव व प्रामाणिकतेचा भाव निर्माण होऊ शकेल.

**न्याय :-** ब्रिटिश शासनाने सनदी सेवक म्हणून भारतीयांची नेमणूक करताना भेदभाव करु नये. त्यांचा दर्जा व पात्रतेचा विचार करून व्यक्तीला नोकरीची संधी दिली पाहिजे.

**कायदेमंडळात प्रतिनिधीत्व :-** ब्रिटिशांनी कायदे करताना भारतीय जनतेच्या इच्छा आकांक्षा जाणून घेणे आवश्यक आहे. यासाठी ब्रिटिशांनी भारतीय जनतेला ब्रिटिश पार्लमेंटमध्ये प्रतिनिधीत्व द्यावे. भारतीय प्रतिनिधींच्या विचारांचा विचार करून योग्य कर लावावे किंवा इतर धोरण ठरवावे. असे नौरोजींचे मत होते. तसेच बिटीशांनी लष्करावर केला जाणारा खर्च कमी करावा अशी आग्रही भूमिका मांडली. आणि आपले उदारमतवादी दृष्टिकोन स्पष्ट केला.

२) **ब्रिटिश शासनावर टीका :-** (१) ब्रिटिशांनी केलेल्या शोषणामुळे भारतीय जनता गरीब किंवा दरिद्री बनली. (२) भारतीय जवानांना प्रशासनाचा अनुभव नसल्यामुळे ते चांगल्याप्रकारे प्रशासन सांभाळू शकत नाही. म्हणून ब्रिटिश सत्ता भारतीयांसाठी शाप ठरत आहे. अशी टीका केली. (३) ब्रिटिश अधिकाऱ्यांचा दृष्टिकोन संकुचित स्वरूपाचा आहे. ते केवळ आपल्या स्वार्थाचा विचार करतात. म्हणून ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या स्वार्थी व चैनीपणावर टीका केली. (४) ब्रिटिश त्यांच्या जनतेप्रमाणे भारतीय जनतेला स्वातंत्र्य देत नाही. भारतीय जनतेवर अन्याय व अत्याचार करतात. विषमतेची वागणूक देतात. ब्रिटिशांनी स्वातंत्र्य, समता, न्याय ही उदारमतवादी तत्वे केवळ आपल्या देशातच ठेवली अशी टीका केली.

३) **शस्त्राच्या आधारावर सत्ता :-** ब्रिटिशांनी भारतीयांची मने न जिंकता बल किंवा शस्त्राच्या आधारावर सत्ता टिकविण्याचा प्रयत्न केला. मात्र अशी सत्ता जास्त काळ टिकत नाही. अशी टीका नौरोजींनी केली. म्हणून ब्रिटिशांच्या या नीतीमुळे नाराज झालेल्या नौरोजींनी त्यांच्यावर टीका केली तसेच जनतेला संघटित करण्याचा प्रयत्न केला.

४) **राजकीय व सामाजिक प्रगती :-** नौरोजींनी ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी धोरणावर टीका केली. मात्र त्यांच्यामुळे भारतात सामाजिक व राजकीय सुधारणा होण्यास मदत झाली. म्हणून त्यांना वरदानही मानले.

ब्रिटिशांच्या राजवटीमुळे देशातील अनिष्ट रुढी, परंपरा नष्ट होण्यास मदत झाली. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या लोकशाहीच्या चार तत्वांची ओळख झाली. या

तत्वांमुळे उदारमतवादी दृष्टिकोन निर्माण झाला. म्हणून नौरोजींनी ब्रिटिशांविषयी आपली निष्ठाही व्यक्त केली.

५) **सनदशीर चळवळ :-** नौरोजींचा लोकशाही तत्वांवर विश्वास आल्यामुळे त्यांनी सनदशीर मार्गाचा स्वीकार केला. यात क्रांति ऐवजी उत्क्रांत मार्गाने स्वराज्य मिळविल्यावर भर देण्यात आला. सनदशीर मार्गात आपल्या मागण्या मान्य असावयास हव्या. आपली मागणी किती न्यायपूर्ण आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न आपण करावयास हवा. हे शक्य न झाल्यास स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या साधनांद्वारे स्वराज्याचे ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न करावा.

अशा प्रकारे दादाभाई नौरोजींनी सामाजिक सुधारणेपासून राजकीय सुधारणेची सुरुवात केली. योग्य अयोग्यतेचा विचार करून भारतीय जनतेला संघटित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. स्वराज्याचा मूलमंत्र त्यांनी जनतेला दिला. यावरून त्यांच्या राजकीय कार्याची ओळख पटते. राजकीय चळवळ सनदशीर मार्गानेच चालावी.

## ३.२. ३ दादाभाई नौरोजी यांचे आर्थिक विचार :-

दादाभाई नौरोजीं यांनी या ग्रंथात आर्थिक विचार मांडले. यात ब्रिटिश शासनाच्या चूकीच्या धोरणामुळे भारतात दारिदय्र निर्माण झाले. त्यांच्या आर्थिक शोषणामुळेच भारतात आर्थिक विषमता, दारिद्र्य यासारख्या समस्यांना तोंड दयावे लागत आहे. भारतात दारिद्र्य निर्माण होण्याची कारणे पुढील प्रमाणे :-

१) इंग्लंडमधील माल भारतीय बाजारपेठेत आला त्यामुळे भारतातील लघुउद्योगधंदे बंद पडले.

२) विदेशी माल देशी मालापेक्षा उत्कृष्ठ दर्जाचा होता. तो कमी किंमतीत भारतीय जनतेला मिळत असे. म्हणून भारतात ब्रिटिश मालाची मागणी वाढली. त्याचा परिणाम भारतीय उद्योगांवर झाला.

३) भारतीय उद्योगधंदे बंद पडल्यामुळे तरुणवर्ग बेकार झाला.

४) उद्योगधंदे बंद पडल्यानंतर ब्रिटिशांनी आपल्या वस्तूंच्या किंमती वाढविल्या.

५) भारतात असलेल्या ब्रिटिश लोकांचा पगार व त्यांना दिले जाणारे निवृत्ती वेतन भारतातून इंग्लंडकडे जाऊ लागले.

६) भारतीय भांडवलांवर ब्रिटिशांचे वर्चस्व निर्माण झाले.

७) ब्रिटिशांनी अनेक वस्तूंवर मोठया प्रमाणात कर लावला.

८) ब्रिटिश नोकरदारांना चैनी जीवन जगता यावे यासाठी पगाराव्यतीरिक्त इतर सुखसोयी दिल्या जात. हा सर्व खर्च भारताच्या तिजोरीतून केला जाई.

अशा प्रकारे ब्रिटिशांनी वेगवेगळ्या मार्गांनी भारतीयांचे शोषण केले. व्यक्तिप्रमाणेच देशालाही कर्जबाजारी केले. परिणामी भारतात दारिद्र्य निर्माण झाले.

### ३.२.३.१ आर्थिक उत्सारणाचा / शोषणाचा सिद्धांत :–

दादाभाई नौरोजी यांनी आर्थिक उत्सारणाच्या सिद्धांतात ब्रिटिशांनी भारतीयांचे केलेले शोषण व त्यांचे भारताच्या आर्थिक परिस्थितीवर झालेल्या परिणामांचा अभ्यास केला. ब्रिटिश वेगवेगळया मार्गाने भारतीयांचे आर्थिक शोषण करीत असत. त्यामुळे भारतीयांना आर्थिक संकटाला तोंड दयावे लागे.

**१.ब्रिटिश सत्तेचे परिणाम :–** ब्रिटिशांनी व्यापार करता करता भारतात आपली सत्ता प्रस्थापित केली. या सत्तेचा उपयोग त्यांनी आपल्या देशाचे वैभव व संपन्नता वाढविण्यासाठी केला होता. भारतीयांचे शोषण करीत असतांना त्यांचा दृष्टिकोन स्वार्थी व संकुचित स्वरूपाचा होता.

**२.लॉर्ड कर्झन :–** लॉर्ड कर्झन असे म्हणत असे की , आपण ब्रिटिश सम्राज्याचा इतर काही भाग आपण गमावला तर चालू शकेल मात्र हिंदुस्थान हा चेक गमावु नये या कर्झनच्या वाक्यावरुन भारताची संपन्न आर्थिकपरिस्थिती लक्षात येते. तसेच ब्रिटिश भारतीयांचे करत असलेले आर्थिक शोषण स्पष्ट होते. ब्रिटिशांना भारतीयांविषयी तिरस्कार होता हे दादाभाई नौरोजींनी आपल्या ग्रंथात नमुद केले आहे.

**३.इंग्लंडमधील औदयोगिक क्रांतिचे परिणाम : –** १७ व्या शतकात इंग्लंडमध्ये औदयोगिक क्रांति झाली. हस्तचलित यंत्राची जागा बाष्पचलित यंत्राने घेतली. मोठमोठे उद्योगधंदे वाढले. कारखान्यासाठी लागणारा कच्चा माल भारतातून निर्यात होत असे, हा माल अल्पदरात खरेदी केला जाई. त्यामुळे भारतीय शेतकऱ्यांचे शोषण होऊ लागले. शेतीचे उत्पन्न कमी होऊ लागले. परिणामी उपासमार, कुपोषण, दारिद्र्य अशा समस्या निर्माण झाल्या.

ब्रिटिशांनी कमीत कमी वेळात व कमीत कमी श्रमात मोठया प्रमाणावर उत्पादन करून भारतात विक्रीसाठी आणला. ब्रिटिशांचा माल स्वस्त आणि सुबक असल्यामुळे मालाची मागणी वाढली. त्यामुळे भारतीय लघुउद्योगधंदयावर विपरित परिणाम झाले. दारिद्र्य, बेकारी, नैतिक शोषण यासारख्या समस्या कामगारांसमोर निर्माण झाल्या अशा विविध मार्गांनी ब्रिटिशांनी भारतीयांचे आर्थिक शोषण केले.

**४.करांद्वारे आर्थिक शोषण :–** ब्रिटिशांनी स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी भारतीय मालांवर मोठ्या प्रमाणात कराची आकारणी केली. त्यामुळे जनतेचे आर्थिक शोषण होऊ लागले. वस्तूंप्रमाणेच घरपट्टी, रस्तापट्टी, शिक्षणकर अशा करांपासून ब्रिटिशांनी भरपूर संपत्ती जमा केली. मात्र त्या प्रमाणात जनतेला हव्या असलेल्या सुखसोई उपलब्ध करून दिल्या नाहीत. त्यामुळे हालाखीचे जीवन जगावे लागले.

**५. दुहेरी शोषण :–** नौरोजींच्या मते, ब्रिटिशांनी भारतीयांचे दुहेरी शोषण केले. कमीत कमी किंमतीत कच्चामाल विकत घेतला व तयार झालेला माल जास्तीत जास्त

किंमतीत विकून भारतीयांचे दुहेरी शोषण केले.

भारतीय मालाची तुलना ब्रिटिश मालाशी होऊ शकत नव्हती. कमी किंमतीत स्वस्त व सुबक माल भारतीय बाजारपेठेत ब्रिटिशांनी आणल्यामुळे भारतीय उद्योगधंदे बंद पडले. उद्योजकांचे व्यवसाय बुडाले. शेतकरी कर्जबाजारी बनले. तरुणांचा वर्ग बेकार झाला. श्रीमंत अधिक श्रीमंत बनले तर गरीब अधिक गरीब बनले. त्यामुळे ब्रिटिशांच्या काळात भारतीयांना आर्थिक शोषणामुळे हालाखीचे जीवन जगावे लागले.

ब्रिटिशांनी मोठया प्रमाणात स्वत:च्या सुखसोयींसाठी व अधिकाऱ्यांच्या पगारासाठी भारताच्या तिजोरीतून पैसा खर्च केला. तसेच राज्य कारभार चालविण्यासाठी आपल्या देशातून कर्ज रूपाने पैसा आणला. या कर्जाची परतफेड भारतीय जनतेकडून करण्यात आली त्यामुळे भारत देश कर्जाच्या खाईत लोटला गेला.

**६.नैतिक शोषण –:** नौरोजींच्या मते, ब्रिटिशांनी केवळ भारतीयांचे आर्थिक शोषण केले नाही तर नैतिक शोषणही केले. ही देशाच्या दृष्टिने अतिशय गंभीर बाब आहे. हे त्यांनी स्पष्ट केले. उदा. भारतातील वरिष्ठ पदे युरोपियन लोकांसाठी ठेवली जात वरिष्ठ पदावर काम करणारे हेअधिकारी सेवानिवृत्तीनंतर मायदेशी जात त्यामुळे आमचे आर्थिक शोषण होण्याबरोबरच त्यांचा प्रशासकीय अनुभव, त्यांना असलेले कायदयाचे ज्ञान, कौशल्य हे ही त्यांच्यासोबत जात. त्यामुळे या अधिकाऱ्यांचा भारतीय जनतेला उपयोग नव्हता. ब्रिटिशांचे हेधोरण म्हणजे भारतीयांचे नैतिक शोषण होते.

## ३.२.४ दादाभाई नौरोजींच्या विचारांचे परिक्षण –:

दादाभाई नौरोजींच्या विचारांचा प्रभाव असंख्य भारतीय नागरिकांवर पडलेला होता. दादाभाईं सारख्या नि:स्वार्थी आणि सार्वजनिक कार्याला पूर्णत: वाहून घेतलेला दुसरा माणूस आपण पाहिलेला नाही असे उद्‌गार वेबरडन यांनी काढले. दादाभाईंनी राष्ट्रीय भावना जतन करून त्यांचा विकास केला. नव्या युगाच्या चळवळीचे प्रथम पाऊल त्यांनी टाकले. त्यांचा मार्ग काटेरी होता. मात्र हिंमतीने मार्ग काढला. त्यांच्या विचार व कर्तृत्वामुळे आधुनिक भारतीय नेत्यांनी त्यांना गुरु मानले. म्हणूनच त्यांना 'पितामह' म्हणून ओळखले जाते. शिक्षणातून त्यांनी जनतेला हक्काची जाणीव करून देण्यासाठी आग्रह धरला. दादाभाई नौरोजींचा ब्रिटिशांवर विश्वास होता. त्यांच्या विषयी आदराची भावनाही होती. कारण ब्रिटिशांमुळे देशात सामाजिक सुधारणा होतील यावर त्यांचा विश्वास होता. मात्र आर्थिक उत्सारणाच्या सिद्धांतामुळे त्यांचे ब्रिटिशांविषयी चांगले मत नव्हते हेस्पष्ट होते. ब्रिटिशांनी भारतीयांचे आर्थिक व नैतिक शोषण केले. म्हणून त्यांनी भारतीय जनतेला स्वराज्याचा मंत्र दिला. राजा राममोहन रॉय यांचेच कार्य नौरोजींनी पुढे चालविले. म्हणून त्यांना 'पितामह' संबोधले जाते.

## ३.३ पारिभाषिक शब्द :–

(१) आर्थिक उत्सारण – आर्थिक शोषण



## ३.४ स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न

# घटक ४

## लोकमान्य टिळक

४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

४.२.१ ब्रिटिश नोकरशाहीवर टीका

४.२.२ जहालवादाबाबतचे विचार

४.२.३ क्रांतिकारी राष्ट्रवादाबाबत मते

४.२.४ सामाजिक सुधारणांविषयी मते

४.२.५ भारतीय राष्ट्रवादाचे जनक

४.२.६ स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण

४.२.७ होमरूल विषयी विचार

४.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

४.४ सारांश

४.५ सरावासाठी प्रश्न

४.६ शब्दार्थ

४.७ अधिक वाचनासाठी ग्रंथ

### जीवनपरिचय :-

बाळ गंगाधर टिळक यांचा जन्म २३ जुलै १८५६ साली रत्नागिरी जिल्ह्यातील चिरवली या गावी झाला. सुसंस्कृत, परंपराप्रिय वातावरणात त्यांच्यावर घरातच सात्विकतेचे संस्कार झाले. वडिलांच्या प्रभावातून त्यांचे गणित आणि संस्कृत हे आवडीचे विषय बनले. मात्र पुण्यात उच्च शिक्षणाची संधी मिळाल्यावर त्यांनी कायद्याचे शिक्षण घेण्याचे ठरविले. भविष्यातील सामाजिक आणि राजकीय कार्याची ही पूर्वतयारी होती. भारतामध्ये स्वातंत्र्य चळवळीची बिजे पेरून भारतीय समाजात ब्रिटिश शासनाविषयी असंतोष निर्माण करण्यात लोकमान्य टिळकांचे मोठे योगदान आहे. त्यामुळे त्यांना ''भारतीय असंतोषाचे जनक'' म्हणून ओळखले जाऊ लागले.

## ४.० उद्दिष्टे :-

लोकमान्य टिळकांच्या राजकीय विचारांचे अध्ययन करताना तुम्हाला खालील गोष्टींचे ज्ञान होणार आहे-

१) लो.टिळकांनी भारतीय समाजात ब्रिटिश शासनाविरूद्ध जागृती निर्माण करण्यासाठी ब्रिटिश नोकरशाहीवर केलेल्या टिकेचे अध्ययन करता येईल.

२) टिळकांचे जहालवादी विचार अभ्यासता येतील.

३) क्रांतिकारी राष्ट्रावादाबाबत टिळकांच्या मतांचे अध्ययन करता येईल.

४) भारतातील सामाजिक सुधारणांविषयी लो. टिळकांची भूमिका समजेल.

५) टिळकांच्या विचारात भारतीय राष्ट्रवाद कशाप्रकारे उदयाला आला आहे याचा अभ्यास करता येईल.

६) स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्य याविषयी टिळकांची मते जाणून घेता येतील.

७) होमरूल चळवळीविषयी टिळकांच्या भूमिकेचे अध्ययन करता येईल.

## ४.१ प्रस्तावना :-

ब्रिटिशांच्या साम्राज्यातून स्वतंत्र होण्यासाठी भारतात जी स्वातंत्र्याची चळवळ सुरू झाली तीची वैचारिक आणि कृतीच्या अर्थाने पायाभरणी करण्याचे प्रयत्न १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात झाले. यामध्ये लोकमान्य टिळकांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. भारतीय लोकांमध्ये ब्रिटिशांविषयी असंतोष आणि राजकीय जागृती घडवून आणण्यासाठी टिळकांनी केलेले प्रयत्न पायाभूत मानले जातात. ''मराठा'' आणि ''केसरी'' या वृत्तपत्रांमधून तत्कालीन राजकीय परिस्थितीवर भाष्य करीत त्यांनी अनेक लेख लिहिले. या लेखांमधून आणि वेळोवेळी त्यांनी केलेल्या भाषणातून त्यांची राजकीय राजकीय भूमिका व्यक्त झाली आहे. सर्वसामान्य भारतीय लोकांच्या आकलनाच्या दृष्टीने त्यांनी लिहिलेले लेख विचारप्रवण आणि राजकीय जागृती घडवून आणण्यासाठी मूलभूत ठरावेत असे आहेत. त्यातून त्यांचे राजकीय विचार प्रकट झाले आहेत. यामुळे लोकमान्य टिळकांना भारतीय असंतोषाचे जनक असे म्हटले जाते.

## ४.२ विषय विवेचन :-

प्रस्तुत प्रकरणात आपणास लो. टिळकांच्या राजकीय विचारांचा काही भागात विचार करायचा आहे. त्यांच्या राजकीय विचारातून जी मूलभूत स्वरूपाची सूत्रे सापडतात त्यांचा खालील मुद्यांमधून विचार करता येतो.

### ४.२.१ ब्रिटिश नोकरशाहीवर टीका :–

लोकमान्य टिळकांनी ब्रिटिश प्रशासक आणि नोकरदार वर्गावर अनेक प्रकारे टीका केली आहे. भारतातील वेळोवेळी उद्‌भवलेल्या नैसर्गिक आपत्तीच्या वेळी, संघर्षाची हाताळणी करताना, सामाजिक क्षेत्रात हस्तक्षेप करताना ब्रिटिश प्रशासकांनी घेतलेली भूमिका अनेकदा अक्षेपार्ह अशी होती. त्यावर स्वातंत्र्य चळवळीतील अनेक तरुणांची आक्रमक प्रतिक्रिया असे. टिळकांनीदेखील कठोर शब्दात या नोकरशाहीला विरोध केला होता. ऑक्टोबर १८९६ मध्ये मुंबई इलाख्यात प्लेगची भयंकर साथ सुरू झाली होती. त्याकाळात वेळोवेळी निर्णय घेण्यासाठी आणि साथीवर नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी ब्रिटिश शासनाने रँड या अधिकाऱ्याची नेमणूक केली. या अधिकाऱ्याने ब्रिटिश सोल्जर्सची मदत घेऊन उंदीर वगैरे नष्ट करण्यासाठी जी मोहीम चालविली त्यामुळे मोठा संघर्ष उद्‌भवला. त्यांनी सामान्य नागरिकांच्या घरात घुसून धुडगूस घातला. यावर टिळकांनी कडक टीका केली.

'स्वराजा'विषयी विचार मांडतांना टिळकांनी ब्रिटिश प्रशासनाला विरोध केला. ते म्हणतात, ''येथील नागरिकांच्या हिताच्या दृष्टीकोनातून कोणते बदल करणे आवश्यक आहे तो मला 'स्वराज्य' स्पष्ट करताना सांगावयाचे आहे. आज या देशाचे प्रशासन न दिसणाऱ्या परकीय नोकरशहांच्या हातात आहे. ते नको आहे. ते नियंत्रण आमच्याकडे आले पाहिजे. स्वराज्य म्हणजे या देशातील नागरिकांकडे शासनाचे नियंत्रण येणे. आम्हाला असे सांगण्यात येते की, सध्याची व्यवस्था चांगली आहे. कारण, प्रशासकांची निवड व नेमणूक ही निश्चित अशा नियमानुसार इंग्लंडमध्ये होत असते. ते अतिशय चांगले असतीलही, ते अतिशय उत्तम रीतीने निपजले असतीलही; परंतु ही व्यवस्था कितीही चांगली असली तरी इतरांची आहे. ती येथील नागरिकांनी निर्माण केलेली नाही. '' ब्रिटिश नोकरदारांवर टीका करताना ते केवळ परकीय आहेत म्हणून टिळकांनी टीका केली असे नव्हे तर त्यांच्या हिताचा विचार करून ते प्रशासकीय रचना करतात आणि राबवतात म्हणूनही त्यांना टिळकांचा विरोध होता.

याच कारणामुळे भारतीय समाजाच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रामध्ये ब्रिटिशांच्या हस्तक्षेपाला त्यांचा विरोध होता. अगोदर राजकीय स्वातंत्र्य नंतर सामाजिक सुधारणा या त्यांच्या भूमिकेमागे हे कारण होते. त्यांना ही भीती वाटत होती की, एकदा शासनास भारतीयांच्या सामाजिक धार्मिक क्षेत्रात हस्तक्षेप करण्याचे कायदे करण्याचे अधिकार ही ओघानेच त्यांना मिळतील आणि त्या पाठोपाठ धार्मिक, सामाजिक संघर्ष सोडविण्याचे अधिकार न्यायालयांना द्यावे लागतील. त्यामुळे ब्रिटिश शासक, नोकरदार यांचे अधिकार अमर्याद रीतीने वाढतील. शासक किंवा न्यायाधीश हे सर्वच पाश्चिमात्य संस्कृतीतून वाढलेले त्यांना आमचे धार्मिक, सामाजिक नीती-नियम, रूढी, परंपरा तपासायला देणे योग्य नाही. हा भारतीय समाजाचा अपमान आहे असे टिळकांना वाटत असे.

### ४.२.२ जहालवादाबाबतचे विचार

लोकमान्य टिळकांच्या भूमिकेचे विश्लेषण कोणत्याही एका चौकटीत करणे अवघड आणि अपूर्ण ठरते. तत्कालीन राजकीय आणि सामाजिक परिस्थितीचे भान राखत सावधपणे परंतु स्वातंत्र्य चळवळीचे उद्दिष्ट समोर ठेवून टिळकांनी वेळोवेळी वैचारिक तसेच कृतीच्या पातळीवर विशिष्ट शैली स्वीकारली असे म्हणता येते. जहाल विचारसरणी आणि क्रांतिकारकांच्या कारवाया याबाबत टिळकांची भूमिका साधारण १९०५ नंतर अधिक स्पष्ट होऊ लागली. यावर्षी झालेल्या बंगालच्या फाळणीमुळे तेथील तरुण क्रांतिकारकांच्या कारवाया अधिक जहाल होऊ लागल्या होत्या. ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या हत्या करण्यामध्ये त्याची परिणती होऊ लागली. त्यामुळे सुडाच्या भावनेने ब्रिटिशांनी अनेक अन्यायकारक कायदे करून दडपशाही सुरू केली. शस्त्र आणि दारूगोळा तसेच इतर स्फोटक साहित्य जवळ बाळगणे हा गुन्हा ठरविणारा कायदा करण्यात आला. वृत्तपत्रांवर कडक निर्बंध घालणारा, बैठका-सभांवर बंदी घालणारा असे अनेक कायदे ब्रिटिशांनी संमत करून भारतीयांचे स्वातंत्र्य अत्यंत संकुचित केले. यावर टिळकांनी ''केसरी''तून टीकेचे प्रहार केले. इंग्लंडमध्ये असलेल्या उदारमतवादी लोकशाही व्यवस्थेची ब्रिटिशांना आठवण करून देऊन त्यांच्या दडपशाहीबद्दल खेद व्यक्त केला. त्याचा क्रांतिकारकांवर प्रभाव पडून देशामध्ये ब्रिटिश अधिकाऱ्यांचे हत्यासत्र सुरू झाले. त्यामुळे टिळक जहालवादाचा, क्रांतिचा प्रसार होण्यासाठी अनुकूल वातावरण तयार करीत होते असे म्हटले जाऊ लागले. पाश्चिमात्य टीकाकारांनी याच हेतूने टिळकांना '' भारतीय असंतोषाचे जनक'' तसेच '' हिंसेचा व बंडखोर प्रवृत्ती अनुयय करणारे'' असे संबोधतात.

अर्थात टिळकांच्या विचारप्रणालीविषयी कोणतेही निश्चित लेबल लावून विश्लेषण करणे अवघड ठरते. प्रसंगानुरूप त्यांनी सनदशीर आणि आक्रमक अशा भूमिका स्वीकारल्या असे मात्र निश्चितपणे म्हणता येते. त्यांनी सर्वकाळ संपूर्ण अहिंसा कधीही स्वीकारली नाही. ''नाठाळाच्या माथी हाणू काठी'' या उक्तीप्रमाणे त्यांनी शिवाजी महाराजांनी केलेल्या अफजलखानाच्या वधाचे समर्थन केले; चाफेकर बंधूंनी रँडसाहेबाचा खुन केल्यानंतर थोडीशी नापसंती दर्शवित त्यांच्या धाडसाचे कौतुकही केले. अर्थात अशा आक्रमक क्रांतिकारकांना त्यांनी प्रोत्साहन दिल्याचे आढळत नाही. उच्च प्रतिचे साध्य आणि साधकाचा हेतू याला ते महत्त्व देत असत. स्वातंत्र्यप्राप्तीची सर्वोच्च ध्येयप्राप्ती अधिक दूर जाणार नाही. चिंतनशील प्रवृत्ती, राजकीय चळवळीत भाग घेताना कठोर भूमिका, निर्भिडपणे सत्य मांडण्याची शैली ही वैशिष्टये टिळकांच्या राजकीय जीवनात निश्चितपणे आढळतात.

अर्थात क्रांतिकारकांच्या कार्यामुळे स्वातंत्र्यप्राप्तीच्या प्रयत्नांना अधिक वेग आणि गांभिर्य प्राप्त होते असे अनेक उदाहरणांवरून स्पष्ट होते. स्वातंत्र्य यज्ञामध्ये सनदशीर मार्ग, अर्ज, विनंत्या, वृत्तपत्रातून कठोर टीका, सामाजिक-धार्मिक उत्सवांचे अभिनव प्रयोग अशा अनेक प्रकारच्या समिधा पडत असतांना क्रांतिकारकांच्या हिंसक कारवायांनी हा यज्ञ अधिक प्रज्वलित झााला हे अनेकांनी मान्य केले आहे.

टिळकांची सहानुभूती क्रांतिकारकांच्या बाजूने झुकलेली असे. हे अनेक उदाहरणांनी दाखविता येते. चाफेकर बंधूंना रँडसाहेबांची हत्या केल्यानंतर धाडसी म्हणणे, श्यामजी कृष्ण वर्मा या क्रांतिकारकावर ''केसरी'' मध्ये लेख लिहिणे, सावरकरांना परकीय कापडाची

होळी केल्याबद्दल फर्ग्युसन कॉलेजच्या प्राचार्य रँग्लर परांजपे यांनी १० रुपये दंड केल्यावर त्याच्यावर '' हे आमचे गुरू नव्हते!'' असा कडक अग्रलेख लिहिणे अशी काही उदाहरणे देता येतात. १९०३ मध्ये नेपाळ येथे शस्त्र निर्मितीचा प्रयत्न झाला त्यात टिळकांचे सहाध्यायी खडीकर यांचा सहभाग होता. अर्थात यावरून टिळकांचा हिंसक कारवायांमध्ये प्रत्यक्ष सहभाग होता किंवा प्रोत्साहन होते असे म्हणता येत नाही.

प्रत्येक विचारवंत, कार्यकर्ता हा तत्कालीन सामाजिक-राजकीय परिस्थितीचे अपत्य असतो. त्या परिस्थितीच्या मागणीप्रमाणे, गरजेप्रमाणे त्याचे विचार, कार्यक्रम आणि त्यांचे अग्रक्रम ठरतात. टिळकांचा काळ म्हणजे भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील संक्रमण काळ होता. त्या टप्प्यापर्यंत अनेक सनदशीर मार्ग, अर्ज, विनंत्या वगैरे हाताळून पाहण्यात आले होते. शासन परकीयांचे असल्याने दडपशाही हा एकच मार्ग शासनाने स्वीकारल्याने नवे पर्याय शोधणे ही परिस्थितीची गरज बनली होती. अर्थात अशाही स्थितीत क्रांतिच्या वाटेने जाण्याचा मार्ग स्वीकारणे लष्करीदृष्ट्या अत्यंत प्रबळ अशा ब्रिटिश सत्तेसमोर उघड उघड आत्मघात ठरेल याचे वैचारिक भान तत्कालीन नेतृत्वाला होते. त्यामुळे 'स्वराज्या'चे लक्ष अधिकच दूर जाऊ शकले असते. अशा सर्व परिस्थितीचा साकल्ल्याने विचार करून टिळकांनी सनदशीर मार्ग, प्रसंगी आक्रमक पवित्रा, धार्मिक उत्सवांचे बदलते स्वरूप असे संमिश्र स्वरूप स्वातंत्र्य चळवळीला दिले.

## ४.२.३ क्रांतिकारी राष्ट्रवादाविषयी मते :-

लोकमान्य टिळक हे महात्मा गांधींप्रमाणे संपूर्ण अहिंसेचे समर्थक नव्हते. अर्थात हिंसक क्रांतिचे त्यांनी कधीही समर्थन केले नाही. टिळकांनी भारतीयांमध्ये आपल्या लेखणीच्या सहाय्याने प्रखर राष्ट्रवाद जागा केला. टिळकांच्या पूर्वी अनेक वर्षे सनदशीर मार्गाने स्वातंत्र्य मिळविण्याचे झालेले प्रयत्न ध्येयाप्रत पोहोचण्यात अपूरे ठरत होते याची जाणीव टिळकांबरोबरच अनेक तरुणांना झाली. १९०५ सालापासून टिळकांच्या तरुण अनुयायांच्या सहाय्याने सामर्थ्यशाली राष्ट्रवादाची सुरूवात झाली. बंगालची फाळणीनंतर ब्रिटिश अधिकाऱ्यांचे हत्यासत्रच सुरू झाले. क्रांतिकारी राष्ट्रवादाचे भीषण रूप बंगालमध्ये दिसू लागले ''मराठा'' आणि ''केसरी'' मधून टिळकांनी ब्रिटिशांवर केलेल्या टिकेचा परिणाम होऊन क्रांतिकारकांनी हत्यासत्र सुरू केले असा आरोप ब्रिटिश विचारवंत करू लागले सर व्हॅलेन्टाइन चिरोल यांनी टिळकांना ''भारतीय असंतोषाचे जनक असे संबोधले'' जॉन हायलंड या लेखकाच्या मते, '' टिळक हे हिंसेचा आणि बंडखोर प्रवृत्तीचा अनुनय करीत होते.'' १९०८ मध्ये टिळकांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल झाला तेव्हा त्यांच्या विरूद्ध असलेले ॲडव्होकेट वॅन्सन यांनी टिळकांच्या 'केसरी' आणि 'मराठा' वृत्तपत्रातील लेखांनी बंडाला चिथावणी देणारे आहेत असा आरोप केला.

अर्थात टिळकांनी स्वतः क्रांतिकारक राष्ट्रवादाचे समर्थन केले नाही. अनेकदा सनदशीर मार्गांना प्रथम स्थान देऊन त्यांनी राजकीय चळवळ मूळ उदिष्टापासून दूर जाऊ नये याची काळजी घेतली. याच हेतूने त्यांनी रक्तविरहित क्रांतिचे समर्थन केले. नाशिकमध्ये

टिळक गेले असता तेथील तरुण हिंसक कारवाया करीत असल्याची माहिती त्यांना मिळाली. त्यानंतर लगेचच झालेल्या जाहिर सभेत त्यांनी या वृत्तीवर कडक शब्दात टीका केली. १९०७ साली पुण्यात एका सार्वजनिक कार्यक्रमात त्यांनी आपली भूमिका स्वच्छ शब्दात मांडली, ''राष्ट्रवादी पक्षाचे ब्रिटिश नोकरशाही विरूद्धचे मार्ग हे क्रांतिकारक वाटणारे आहेत. परंतु ही क्रांति रक्तविरहीतच असली पाहिजे'' टिळकांनी अशा प्रकारे आपली भूमिका स्पष्टपणे मांडली. मानवी स्वभावाचे वर्णन करताना सात्विकवृत्ती आणि राजसवृत्तीला अग्रक्रम देत तामस वृत्तीने हिंसक कारवायांना महत्त्व देणाऱ्यांचा टिळक स्वीकार न करता शेवटच्या पसंतक्रमावर ठेवतात.

अर्थात टिळकांनी क्रांतिकारक राष्ट्रवाद्यांची संपर्क तोडलेला नव्हता. वि. दा. सावरकरांशी त्यांचे संबंध होते. नेपाळमध्ये शस्त्रास्त्रे निर्मितीचा प्रयत्न करणाऱ्यांमध्ये टिळकांचे सहाध्यायी होते. सावरकरांनी परकीय वस्त्रांची होळी केल्याबद्दल त्यांना दहा रूपयांचा दंड करणाऱ्या प्राचार्यांवर टिळकांनी कठोर टीका केली. डॉ. पी. एस. खानखोजे यांनी १९५४ मध्ये एका लेखात टिळक क्रांतिचे तत्त्वज्ञान स्वातंत्र्य चळवळीतील तरुणांना शिकवत होते आणि हाती शस्त्र धरण्याचे आवाहन करीत होते म्हणून तेही क्रांतिकारक होते असे म्हटले आहे. अर्थात या संदर्भात स्पष्ट पुरावे प्राप्त होत नाहीत.

स्वराज्यप्राप्तीला सर्वोच्च स्थान देत टिळकांनी कधी सनदशीर मार्ग तर कधी आक्रमक भूमिका स्वीकारल्याचे दिसते.

**राष्ट्रवादाचे सांस्कृतिक बंध :–**

राष्ट्रवादी भावनेच्या अनेक आधारापैकी देशाच्या इतिहास, परंपरा, संस्कृती, धार्मिक अधिष्ठान यांना टिळकांनी अधिक महत्त्व दिले. त्यामुळे त्यांनी हिंदूधर्म आणि संस्कृतीचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला अशी टीका टिळकांवर केली जाते. डॉ. वि. मा. बाचल आणि प्रा. स. म. गोळवीलकर यांनी त्यांच्या भारतीय राजकीय विचारवंत या पुस्तकात याबाबतीत संदर्भ दिले आहेत, ते असे, झकेरिया यांनी आपल्या 'नवोदित भारत' या पुस्तकात असे म्हटले आहे, 'की टिळक हिंदू–मुस्लिम संबंधात 'जशास तसे' ची भाषा बोलून वातावरण दूषित करीत होते.' ब्रिटिश इतिहासकार पॉवेल प्राईसने असे मत व्यक्त केले आहे की, भारतातील स्वयंशासनाच्या शक्यतेच्या पार्श्वभूमीवर टिळकांच्या असहिष्णु विचारांमुळे मुस्लिम लीग ही इंडियन नॅशनल कॉंग्रेसला समांतर पण प्रतिविरोधी अशी संघटना निर्माण झाली. ि टळकांचे टीकाकार सर व्हॅलेंटाईन चिरोल यांनी असा आरोप केला आहे की, 'राजकीय जहालपणा आणि सामाजिकदृष्ट्या जुनाट, बुरसटलेले हिंदू विचार यांचा समन्वय करून एक अनैतिकतेचे राजकारण टिळक खेळत होते.' त्यामुळे पुण्याच्या सार्वजनिक सभेतून मुस्लिम सदस्यांनी काढता पाय घेतला. रजनी पामदत्त यांनी टिळक व अरविंद घोष यांच्यावर असा आरोप केला आहे की, भारतीय राष्ट्रवादास चेतावनी देताना हिंदू पुनरुज्जीवनवादाचा आश्रय या दोघांनी घेतल्यामुळे राष्ट्रीय कॉंग्रेसच्या चळवळीतून मुस्लिम समाज अलग पडला. मानवेंद्रनाथ रॉय यांनी टिळक आणि अरविंद घोष यांच्या संदर्भात असे म्हटले आहे की, हा उग्र राष्ट्रवाद त्यांच्या पूर्वीच्या राष्ट्रीय कॉंग्रेसच्या बुद्धिवादी नेत्यांनी मांडलेला पुरोगामी विचारांवर व्यक्त झालेली प्रतिगामी

प्रतिक्रिया होती. तसेच रॉय यांच्या मते इ. स. १८५७ च्या शिपायांच्या बंडामागे जे परंपरावादी शक्तिघटक वावरत होते तेच घटक त्यानंतरच्या अर्धशतकानंतर या जहाल राष्ट्रवादी समजल्या गेलेल्या विचारांमागे दडलेले दिसतात.

राष्ट्रवादाच्या मानसिक आधारावर टिळकांनी अधिक भर दिला. मुळात राष्ट्रवाद ही मानसिक अवस्था असते. त्यानंतर आर्थिक, भौगोलिक, राजकीय घटकांचा प्रभाव असतो. भारतीय समाजाला मानसिकदृष्ट्या एका सुत्रात बांधण्यासाठी येथील धार्मिक आणि सांस्कृतिक बंध अधिक प्रभावी आणि उपयुक्त ठरतील अशी टिळकांची धारणा असावी. त्याच धारणेतून त्यांनी भारतातील प्राचीन धर्म, संस्कृती ज्यातून प्रकट होते असे वेद, उपनिषदे, भगवत गीता यांचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला. अशा जुन्या संस्कृतीवर राष्ट्राची इमारत उभी करणारा खरा राष्ट्रवादी असतो. अशी त्यांची धारणा होती. धर्म, संस्कृती, परंपरा व्यक्तीचे कौटुंबीक जीवन संघटीत करतात. हेच घटक राष्ट्रसंघटनाचे कार्यही करू शकतील. त्यासाठी भारतीय समाजाची नैतिक अधिष्ठाने टिकविली पाहिजेत. असे टिळकांना वाटत होते. राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हे सर्व सांस्कृतिक बंध अधिक मजबूत करता येतील असा त्यांचा विश्वास होता. याच भूमिकेतून भारतीयांच्या श्रद्धांचा वापर राष्ट्रीय चळवळीसाठी करून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. घराघरात होणार गणेशोत्सव त्यांनी सार्वजनिक केला. शौर्याच्या परंपरा भारतीय जनमानसात पुन्हा जागृत करून समाजात चैतन्य, उर्मी, उत्साह निर्माण करण्यासाठी सार्वजनिक शिवजयंती सुरू केली. अरविंद घोषांच्या प्रयत्नातून शिवजयंती कलकत्त्यातही साजरी होऊ लागली. जपानमध्येही काही ठिकाणी ती साजरी झाली.

राजकीय स्वार्थासाठी ब्रिटिशांनी निर्माण केलेल्या हिंदू-मुस्लिम दुहीमुळे भारतीय समाज दुभंगला जाऊन संभ्रमाच्या गर्तेमध्ये लोटला जात होता. अशा वेळी मनोबल उंचावण्याच्या प्रयत्नातील सांस्कृतिक राष्ट्रवादाची जोपासना हा एक भाग होता. अर्थात त्याचा दुसऱ्या बाजूला परिणाम होऊन भारतातील मुस्लिम समाज राष्ट्रीय चळवळीच्या प्रवाहातून बाजूला पडू लागला ही प्रतिक्रियात्मक गोष्ट होती. असा सामाजिक दुभंग निर्माण करणे हा सांस्कृतिक राष्ट्रवादाचा हेतू होता असे म्हणण्यासारखे निःसंदिग्ध पुरावे प्राप्त होत नाहीत. राष्ट्रवाद ही मुळातच मानसिक अवस्था असल्याने हा देश माझा आहे ही भावना विकसित करणाऱ्या सांस्कृतिक घटकांचा आधार घेत राष्ट्रीय चळवळीचा वेग वाढविण्याचा प्रयत्न टिळकांनी केला असे म्हणता येते.

## ४. २. ४ सामाजिक सुधारणांविषयी मते

काँग्रेसमध्ये जहाल आणि मवाळ असे गट पडून त्यांच्यामध्ये संघर्ष सुरू झाला असतानाच अगोदर राजकीय स्वातंत्र्य की सामाजिक सुधारणा असाही वाद विचारवंत आणि कार्यकर्त्यांमध्ये सुरू झाला. सामाजिक सुधारणांना प्रथमस्थान देणाऱ्यांमध्ये न्या. रानडे, गोपाळ गणेश आगरकर, बहरामजी मलबारी इत्यादी उच्चशिक्षित मंडळी होती. याच्या आगोदरच महात्मा फुलेंनी समाजसुधारणांसाठी टोकाचा विरोध पत्करून कार्य सुरू केले होते. राजकीय स्वातंत्र्यासाठी आंदोलन आणि सामाजिक सुधारणा चळवळ असे दोन

समांतर प्रवाह भारतीय सामाजिक प्रक्रियेत निर्माण झाले होते. अगोदर सामाजिक सुधारणा की राजकीय स्वातंत्र्य या वादात टिळकांची स्वतंत्र अशी भूमिका होती. अगोदर राजकीय स्वातंत्र्य मिळवावे नंतर त्या स्वातंत्र्याच्या मोकळ्या वातावरणात आपल्याच शासकांकडून सामाजिक सुधारणांसाठी वैधानिक प्रयत्न करता येतील अशा विचारांचा गट काँग्रेसमध्ये होता. दादाभाई नौरोजी त्याचे प्रतिनिधीत्व करीत होते. लो.टिळकांनी राजकीय स्वातंत्र्याला प्राधान्य दिले. सामाजिक सुधारणांविषयी त्यांची मते स्वतंत्र होती मात्र अनेक प्रसंगी त्यातून त्यांचे प्रतिगामित्व डोकावत असे अशी टीका त्यांच्यावर केली जाते.

**भारतातील समृद्ध ऐतिहासिक परंपरांचा अभिमान :–**

भारताची प्राचीन समृद्ध परंपरा आणि हिंदू धर्मातील नीतीमूल्ये यांचा टिळकांना प्रचंड अभिमान होता. त्यामध्ये हस्तक्षेप करण्याचा अधिकार परकीय शक्तीला देणे त्यांना कमीपणाचे आणि नाकर्तेपणाचे वाटे. अनेक जुन्या समाजविकासास प्रतिकूल घातक परंपरा भारतीय संस्कृतीने सोडायला हव्या हे त्यांना मान्य होते. मात्र अशा धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक बाबी हे भारतीयांचे क्षेत्र आहे. ब्रिटिशांनी बाकीच्या सर्व क्षेत्रांवर त्यांचे अधिकार प्रस्थापित केलेले असताना भारतीयांचे हे क्षेत्र तरी किमान सुरक्षित रहावे असे त्यांना वाटे. यामध्ये सुधारणा किंवा बदल करायचा असेल तर तो भारतीय लोक करतील ब्रिटिश नव्हे ब्रिटिशांना भारतीय समाजात सुधारणा करणारे कायदे करण्याचा, पर्यायाने वैधानिक हस्तक्षेप करण्याचा अधिकार एकदा मिळाला की त्या पाठोपाठ त्या कायद्यांचे पालन करवून घेणाऱ्या आणि संघर्ष उद्भवल्यास न्यायदान करण्याचाही अधिकार प्राप्त होईल. पाश्चिमात्य संस्कृती आणि आमची संस्कृती यात मूलभूत स्वरूपाचा फरक आहे. त्या संस्कृतीमध्ये वाढलेल्या ब्रिटिश प्रशासक आणि न्यायाधिशांनी भारतीय रूढी, परंपरा, नीतीमूल्ये तपासणे हास्यास्पद आणि आमची अकार्यक्षमता सिद्ध करणे होय. टिळकांच्या या भूमिकेतून त्यांच्या सामाजिक सुधारणा कुणी कराव्यात या मुद्यावर वाद होता असे म्हणता येते.

**राजकीय स्वातंत्र्य अगोदर, सामाजिक सुधारणा नंतर :–**

दादाभाई नौरोजींनी या संदर्भात मांडलेल्या भूमिकेचाच टिळकांनी पुरस्कार केला होता. राजकीय स्वातंत्र्य आणि सामाजिक सुधारणा या दोन्ही गोष्टी सारख्याच प्राधान्यक्रमाच्या आहेत. मात्र त्यासाठी वेगवेगळ्या व्यासपीठांची गरज आहे. राष्ट्रीय काँग्रेसने राजकीय स्वातंत्र्यासाठी लढा सुरू ठेवावा. सामाजिक सुधारणांना प्राधान्य देणाऱ्यांसाठी वेगळे व्यासपीठ निर्माण करावे हा विचार दादाभाई नौरोजींनी मांडला. त्यामागे एक दूरवरचा विचार होता. सांस्कृतिक विविधता असलेला भारतीय समाज परंपराप्रिय होता. सामाजिक सुधारणाच्या रेट्यामध्ये सामाजिक स्वास्थ्य विस्कळीत होऊन लोकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाल्यास राजकीय स्वातंत्र्याच्या उद्दिष्ट प्राप्तीपर्यंत पोचण्यासाठी लागणारे सामाजिक बळ विघटित होईल आणि ध्येय लांब जाईल. म्हणून लोकांमध्ये प्रथम राष्ट्रवाद निर्माण करण्याला पर्याय नाही. राजकीय स्वातंत्र्य आणि सामाजिक सुधारणा या वादात जनशक्ती विघटीत करण्यापेक्षा प्रथम राजकीय स्वातंत्र्याला स्थान द्यावे व ते प्राप्त झाले की सामाजिक सुधारणा शांतपणे आपल्याच शासकांकडून करून घेता येतील अशी टिळकांची भूमिका होती. शिवाय सामाजिक सुधारणा एकाएकी कायद्याच्या धाकाने करण्यासही त्यांचा विरोध

होता. यांत्रिकपणे अशा सुधारणा लादल्याने समाजात दुभंगलेपणा येईल. शिक्षण आणि सामाजिक जागृती ही सुधारणांची पूर्वावश्यकता आहे. त्यानंतर सुधारणांसाठी आपोआप समाजमन तयार होईल. आणि कायमस्वरूपी परिणामकारक अशा सुधारणा घडवून आणता येतील. असा त्यांचा विश्वास होता. समाजसुधारणांचा आग्रह धरणाऱ्यांनी हा विचार प्रथम वैयक्तिक कृतीच्या पातळीवर सिद्ध करावा. स्वतःच्या वर्तनाने ते दर्शवावे असेही टिळकांना वाटत असे.

## ४.२.५ भारतीय राष्ट्रवादाचे जनक :–

मध्ययुगीन काळात महाराष्ट्रात राष्ट्रवादाचा प्रादेशिक आविष्कार शिवाजींनी 'हिंदवी स्वराजाची' स्थापना केली त्या प्रसंगी झाला. राष्ट्रवादाचा धार्मिक आधार यावेळी स्पष्ट झाला. मात्र या भावनेला व्यापक स्वरूप प्राप्त होण्यास २० वे शतक उजाडावे लागले. समान भू–प्रदेश, एकच–भाषा, धर्म, निकट वास्तव्य किंवा नियमित संवाद हे राष्ट्रवादाचे मुख्य आधार भारतासारख्या महाकाय भौगोलिक प्रदेश आणि सांस्कृतिक विविधता असलेल्या देशात असणे ही दुर्मिळ गोष्ट होती. ''हा देश माझा आहे'' भावना प्रत्येक भारतीयाच्या मनात असणे किंवा निर्माण करणे ही दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया असते. ती प्रक्रिया सुरू करण्यामध्ये टिळकांचे सर्वात प्रमुख योगदान आहे. राष्ट्रवाद ही मानसिक अवस्था असते. अशा वैविध्यपूर्ण महाकाय भारतात ती निर्माण करणे हे एखादा पर्वत उचलण्यासारखे कार्य होते. त्यासाठी बहुसंख्य लोकांना एका सूत्रात जोडू शकणाऱ्या हिंदू धर्माचा आधार घेत, 'मराठा', 'केसरी' या वृत्तपत्रांमधून ब्रिटिशांवर टीकेचे प्रहार करीत, राष्ट्रीय चळवळीतील तरुणांना मार्गदर्शन करीत, बहिष्कार, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण या कार्यक्रमाच्याद्वारे स्वराज्याची जाणीव निर्माण करीत टिळकांनी सर्व बाजूंवर आणि सर्व दिशांनी भारतीयांमध्ये राष्ट्रवाद निर्माण करण्याचे कार्य केले.

हिंदू धर्माकडे भारतात राष्ट्रवाद निर्माण करू शकणारा एकमेव बंध याच दृष्टीने ते पहात असत. त्यांनी या बाबत मांडलेले विचार राष्ट्रवादास प्रेरणा देणारे आहेत. ''आपला धर्म अतिशय जुना आहे. मानव जातीचा इतिहास जितका प्राचीन आहे तितकाच प्राचीन इतिहास आपल्या धर्माला लाभला आहे. अतिशय सुरूवातीपासून आर्यांचा धर्म वैदिक धर्म आहे. जसे एकाच कुटुंबाचे मूले व मूली हे भाग असतात, त्याचप्रमाणे अनेक भागांचे संलग्नीकरण आपल्या धर्मात झालेले दिसेल. आपण जर हे लक्षात ठेवून त्यातील विखुरलेले भाग एकत्र करण्याचा प्रयत्न केला तर त्यातून एक सामर्थ्यशाली शक्ती निर्माण होऊ शकेल. राष्ट्रीयत्वाचा एक अपरिहार्य भाग धर्म हा आहे. धर्म हा शब्द 'धृ' या धातूपासून बनलेला असून त्याचा अर्थ 'एकत्र बांधणे' असा होतो. धर्म आत्म्यास परमेश्वराशी व मानवास मानवाशी बांधतो. धर्म म्हणजे माणसाचे परमेश्वराच्या संदर्भातील कर्तव्य आणि माणसाच्या संदर्भातीलसुद्धा कर्तव्यच होय. हिंदूधर्म यास्तव एक नैतिक व सामाजिक बंध निर्माण करतो. वैदिक काळात हा देश एका व्यापक राष्ट्राप्रमाणे स्वयंपूर्ण होता. ते एकत्व जेव्हा भंग पावले तेव्हा आपले अधःपतन झाले ही एकता पुन्हा प्रस्थापित करावी, हे

नेत्यांचे कर्तव्य आहे. गीता, रामायण यांच्याशी असलेले नाते आपला समान वारसा नव्हे काय? आपण जर या समान वारशावर भर दिला व इतर पंथ व उपपंथ विसरलो तर परमेश्वरी कृपेने आपण भावी काळात या सर्व पंथ-उपपंथाचा समुच्चय करून भव्य राष्ट्र उभे करू शकू. डॉ वि.मा.बाचल यांनी उध्दृत केलेल्या टिळकांच्या या विचारांतून भारतीय राष्ट्रवादाची भावना व्यक्त होते. टिळकांच्या राष्ट्रवादात जुन्या परंपरा, प्रथा, श्रद्धा यांचे पुनरुज्जीवन झाले आहे अशी टीका केली जाते. मात्र योग्य, समाजानुकूल प्रथा, परंपरा राष्ट्रउभारणीस मदत करतात असे त्यांना वाटत असे. जुन्या समृद्ध परंपरांचा आधार घेत राष्ट्रवादाची उभारणी करणे योग्य आहे असे त्यांचे मत होते. या दृष्टीनेच त्यांनी सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंती सुरू केले. धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमाच्या निमित्ताने लोकांना संघटन करून त्यांच्यात राष्ट्रवाद जागाविणे शक्य होईल हा त्यांचा अंदाज मोठ्या प्रमाणात खरा ठरला.

## ४.२.६ स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि स्वराज्याविषयी विचार

स्वातंत्र्यप्राप्तीसाठी केवळ वैचारिक पातळीवरचे, आणि सनदशीर साधनांचे मार्ग अपुरे ठरत असल्याचे लक्षात येऊन टिळकांनी जनसमान्यांना सहभागी करून घेणाऱ्या उद्देशाने कृतीच्या पातळीवर काही मार्ग हाताळले. त्या मार्गाचे महत्त्व आणि गांभिर्य लवकरच स्पष्ट झाले. अर्थात बहिष्कार आणि स्वदेशी या साधनांचे स्वरूप आणि महत्त्व टिळकांपूर्वीच लोकांच्या परिचयाचे झाले होते. समाजसुधारणांना अग्रक्रम देणाऱ्या नेतृत्वाला ते पूर्वीच ज्ञात होते. मात्र बंगालच्या फाळणीनंतर टिळकांनी या साधनांचा परिणामकारकपणे वापर केला.

**स्वदेशी :-**

भारताचे आर्थिक शोषण करताना ब्रिटिशांनी काही धोरणे आखली होती. भारतातील नैसर्गिक साधन संपत्तीची लूट करून ती इंग्लंडमध्ये नेणे. या संपत्तीच्या दळणवळणासाठी रेल्वे, रस्ते वगैरे आंतर्रचना करणे, इंग्लंडमध्ये झालेल्या औद्योगिकीकरणास अधिक गती देण्यासाठी या कच्च्या मालाचे पक्क्या मालात रूपांतर करणे आणि पुन्हा त्या वस्तू आपल्या वसाहती असलेल्या देशांमध्ये नेऊन विकणे अशा अत्यंत विचारपूर्वक केलेल्या रचनेमुळे भारताचे दुहेरी नुकसान होत होते. येथील नैसर्गिक साधनसंपत्तीची लुट होण्याबरोबरच इंग्लंडमध्ये यंत्राच्या सहाय्याने तयार झालेल्या वस्तूंचा दर्जा, स्वरूप भारतातील स्वदेशी वस्तूंपेक्षा उच्च प्रतिचे असे. त्यामुळे भारतीय बाजारपेठेत स्वदेशी वस्तू बाजूला पडून या परकीय वस्तूंनी बाजारपेठ काबीज केली. त्या ग्राहकांच्या पसंतीस उतरू लागल्या. एका बाजूला साधन संपत्तीचे शोषण आणि दुसऱ्या बाजूला भारताचा बाजारपेठ म्हणून वापर शिवाय येथील पारंपरिक स्वदेशी उद्योगांवर बेकारीची कुऱ्हाड येऊ लागली. अशा दुहेरी पद्धतीने होणाऱ्या भारताच्या शोषणावर टिळकांपूर्वीच न्या. रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, दादाभाई नौरोजी यांनी स्वदेशीचा उपाय शोधला होता. तो अधिक परिणमकारकरीतीने राबविण्याचा निर्धार टिळकांनी केला. महाराष्ट्रातील प्रत्येक खेडे त्यांनी स्वदेशीच्या प्रचारासाठी

पिंजून काढले. परकीय वस्तू खरेदी न करणे किंवा केल्या असतील तर त्यांचा वापर न करता त्यांची होळी करणे आणि स्वदेशी वस्तू वापरण्याचा निर्धार करणे हा स्वदेशीचा कार्यक्रम सर्वत्र राबविला जाऊ लागला. त्यातून स्वदेशी उद्योगांना संजीवनी तर मिळालीच. परंतु सर्वसमान्य लोकांना स्वातंत्र्य चळवळीत सहभागी करून राष्ट्रपेम निर्माण करण्याची संधी मिळाली. डॉ. वि. मा. बाचल यांनी आपल्या भारतीय राजकीय विचारवंत या पुस्तकात टिळकांचे यासंदर्भात मुंबईतील गिरणी कामगारांना उद्देशून केलेले प्रेरणादायी भाषण उद्धृत केले आहे. यामध्ये टिळक म्हणतात, ''माझ्या स्वतःकडे जर साम्राज्य असते तर मी जे केले असते तेच ब्रिटिश करीत आहेत. प्रत्येक जण जीवन-संघर्षात गुंतला आहे. पण आपण जेव्हा आपले सर्वस्व गमावले तेव्हा आपण आपले डोळे उघडले. आपल्याकडील सात कोटी लोकांना दिवसभराचे पोटभर जेवणसुद्धा मिळत नाही. आपल्या या हलाखीवर एकच उपाय आहे व तो म्हणजेच स्वदेशीचे व्रत होय. स्वदेशी यशस्वी व्हायची असेल तर त्यास बहिष्काराची जोड दिली पाहिजे. जर तुम्ही दोन लाख लोक एकत्र येऊन निर्धाराने कृती कराल तर तुम्ही काय साध्य करू शकणार नाही? स्वातंत्र्यवीर सावरकरांनी स्वदेशीचा पुरस्कार करीत परकीय वस्तूंची होळी केली तेव्हा त्यांना फर्ग्युसन कॉलेजच्या प्राचार्य रॅंग्लर परांजपे यानी १० रूपयांचा दंड केला. तेव्हा टिळकांनी 'केसरी'मधून त्यावर कडक अग्रलेख लिहिला. त्याचे शिर्षक होते '' हे आमचे गुरूच नव्हे!'' स्वदेशीच्या संदर्भात याचा पुन्हा उल्लेख करावा लागतो.

**बहिष्कार :-**

स्वदेशीला जोडूनच दुसऱ्या एका कार्यक्रमाने ब्रिटिश प्रशासन खिळखिळे करणाचा प्रयत्न करण्यात आला ते म्हणजे 'बहिष्कार'. ब्रिटिश भारतावर राज्य करीत असले तरी त्यामध्ये भारतीयांची शक्ती ते वापरत होते. रोजगार, उपजीविका यासाठी भारतीय लोक यामध्ये नोकरदार, कामगार म्हणून राबत होते. एक प्रकारे हा प्रशासनाचा गाडा ओढण्यात त्यांचा मोठा हातभार लागत होता. मूठभर ब्रिटिश अधिकाऱ्यांना भारतीयांच्या मदतीशिवाय प्रशासन चालविणे केवळ अशक्य आहे हे ओळखून बहिष्काराचे हत्यार वापरण्यात आले. ब्रिटिशांच्या प्रसाशकीय कामगार बहिष्कार असे त्या कार्यक्रमाचे स्वरूप होते. स्वदेशी आणि बहिष्कारामुळे भारतीयांमध्ये प्रचंड आत्मविश्वास निर्माण झाला आणि राष्ट्रप्रेम जागृत झाले. आर्थिक हालअपेष्टा सहन करीत लोकांनी बहिष्काराला पाठिंबा दिला. त्यात सहभागी झाले. या संदर्भात डॉ. बाचल यांनी पुण्यात टिळकांनी केलेल्या भाषणाचा काही भाग आपल्या पुस्तकात पुढीलप्रमाणे उद्धृत केला आहे. टिळक म्हणाले, ''तुम्ही हे लक्षात ठेवले पाहिजे की, ज्या सत्तेच्या आधारावर भारतातील हे प्रशासन चालविले जाते त्या सत्तेच्या सामर्थ्याचा तुम्ही स्वतः एक घटक आहात. ही अवाढव्य प्रशासकीय यंत्रणा एक घटक सुरळीत चालण्यासाठी तुम्ही एक वंगण म्हणून उपयोगी पडत आहात. तुम्ही जरी दुर्लक्षित व पीडित असला तरी हे प्रशासन अशक्य करून टाकण्याची ताकद तुमच्यात आहे हे लक्षात घ्या. येथील टपाल व तार व्यवस्था तुम्हीच तर चालवित आहात. जमीन महसूल पट्टा तुम्हीच ठरवीत आहात व महसूलही तुम्हीच गोळा करीत आहात. तुम्ही जरी कनिष्ठ पातळीवर काम करीत असलात तरी हे प्रशासन चालावे म्हणून तुम्हीच सर्व काही करीत

आहात. तेव्हा तुमचे हात अशा अयोग्य कार्याला लावण्याऐवजी चांगल्या कार्यास लावता येतील का? याचा तुम्ही विचार करा.'' ब्रिटिश शासन खिळखिळे करण्याच्या हेतूने लोकांना संघटित करण्याबरोबर ब्रिटिशांचा व्यापारी हेतू हाणून पाडणे, त्यांची आर्थिक कोंडी करणे आणि लोकांमध्ये राष्ट्रप्रेम जागविणे असे अनेक हेतू बहिष्कार या कार्यक्रमातून साध्य झाले असे या भाषणातून लक्षात येते. बहिष्काराचे स्वरूप स्पष्ट करताना २ जानेवारी १९०७ रोजी कलकत्ता येथील टिळकांच्या भाषणाचा काही भाग डॉ. वि. मा. बाचल यांनी उद्धृत केला आहे तो असा. यात टिळक म्हणतात, '' आम्ही शस्त्रविरहित आहोत व आम्हास शस्त्राची गरज नाही. आमच्याकडे बहिष्काराच्या रूपाने एक सामर्थ्यशाली हत्यार आहे. मूठभर इंग्रज अधिकारी जे प्रशासन या देशात चालवितात ते तुमच्या-आमच्या सहाय्याने चालविले जाते. तेव्हा आमच्या पिळवणुकीची आम्हीच खुषीने झालेली हत्यारे आहोत. जरी तुम्हास शासनास क्रियात्मक विरोध करण्यास स्वातंत्र्य नसले तरी स्वतःवर नियंत्रण ठेवून स्वतःस सुखांपासून वंचित करून तुम्हास परकीय शासनास विरोध करता येणार नाही का? आम्ही त्यांना महसूल गोळा करण्यास मदत करणार नाही, शांतता राखण्यास मदत करणार नाही, भारतीय रक्ताच्या व भारतीय पैशाच्या आधाराने भारताच्या हद्दीबाहेर चाललेल्या युद्धप्रयत्नात सहाय्य करणार नाही, आम्ही त्यांना न्यायप्रशासन चालण्यात सहाय्य करणार नाही. आम्ही आमच्यासाठी आमची न्यायालये निर्माण करू, वेळ येईल तेव्हा करसुद्धा भरणार नाही. तुम्ही हे एकजुटीने करू शकाल काय? तर तुम्ही उद्यापासूनच स्वतंत्र व्हाल'' असहकाराचे स्वरूप अशा रीतीने अत्यंत स्वच्छ आणि साध्या शब्दात स्पष्ट करण्यामागे जनमानसाना संघटित करून त्यांची शक्ती वाढविणे आणि ब्रिटिशांना धक्का देणे हाच हेतू होता हे स्पष्ट होते.

**राष्ट्रीय शिक्षण :-**

ब्रिटिशांनी भारतात शिक्षणाची सोय करताना प्रशासकीय सोयीचा विचार केला होता. त्यांच्या प्रशासनात निम्नस्तरीय अधिकारी कारकून, चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांची नेहमीच निकड भासत असे. या सर्व कामांसाठी आणि भूमिकांसाठी योग्य नोकरदार वर्ग तयार करण्याच्या उद्देशाने त्यांनी भारतात शाळा महाविद्यालये सुरू केली. मात्र हे शिक्षण इंग्रजीतून आणि महाग असे. सर्वसामान्य लोक त्यापासून वंचित रहात असत. तसेच शिक्षणाचा हेतू प्रशासकीय सोयीचा असल्याने त्याच प्रकारचे शिक्षण दिले जाई. त्यामुळे स्वातंत्र्य चळवळीला या सुशिक्षीत तरुणांचा उपयोग होण्यावर मर्यादा येत असत. त्यामुळे भारतीय लोकांनी सुरू केलेल्या शाळा महाविद्यालयांतून राष्ट्रीय शिक्षण दिले जावे असा विचार लो. टिळक, आगरकर, चिपळूणकर यांनी केला होता. स्वातंत्र्य चळवळीला भक्कम करू शकणाऱ्या, आणि मदत करू शकणाऱ्या तरुणांना घडविणे हा या शिक्षणाचा हेतू असेल असाही विचार त्यांनी केला. त्याच हेतूने त्यांनी पुण्यात न्यू इंग्लिश स्कुल आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली आणि फर्ग्युसन कॉलेज सुरू केले.

शिक्षणाने व्यक्तीवर राजकीय संस्कार केले जाऊ शकतात. हक्काची जाणीव, अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा आणि स्वातंत्र्याचे महत्त्व शिक्षणामुळेच निर्माण होते असा फ्रान्स, इंग्लंड, अमेरीका या देशांचा अनुभव होता. राजकीय जागृती घडवून आणणारे तत्त्वज्ञान लोकांना वाचता आले तर क्रांति घडून येते हा या देशाचा अनुभव टिळक, गोखले

यांना माहित होता. म्हणून भारतात सामाजिक संस्काराबरोबरच राजकीय जागृती घडवून आणणारी राष्ट्रीय शाळा-महाविद्यालये सुरू करण्याचे कार्य त्यांनी केले.

राष्ट्रीय शिक्षण देताना शिक्षक आणि विद्यार्थी यांच्याविषयी टिळकांचा विशिष्ट दृष्टीकोन होता. चारित्र्य संवर्धन, विशिष्ट ध्येयवाद, कर्तव्यनिष्ठा, धार्मिक तत्त्वांमधील मानवतावाद, सहिष्णुवृत्ती, राष्ट्रप्रेम, राष्ट्रनिष्ठा या गोष्टींना शिक्षक आणि विद्यार्थी या दोघांच्या जीवनात असाधारण महत्त्व असायला हवे. प्राचीन भारतात गुरुकुलात शिक्षण देतांना नीतिमूल्ये, ध्येयवाद यांना जसे महत्त्व दिले जाई तसेच राष्ट्रीय शिक्षणातही दिले जावे. यासाठी हिंदू धर्मातील तत्त्वांच्या शिकवणुकीतून चारित्र्यसंवर्धन घडवून आणता येईल असा टिळकांचा विश्वास होता. असा आग्रह धरीत असताना त्यांनी औद्योगिक आणि तांत्रिक प्रगतीकडे दुर्लक्ष केले नाही. याबाबतीत भारतीय तरुण शिक्षित असणे ही काळाची गरज ओळखून असे औद्योगिक आणि तंत्रज्ञान देणारे शिक्षण दिले जावे असेही त्यांचे मत होते. भारतीय तरुणांवर संस्कार करणे हा शिक्षणाचा मुख्य हेतू मात्र विसरता कामा नये. त्यासाठी मातृभाषेतून देखील शिक्षण दिले जाण्याची शिफारस त्यांनी केली. थोडक्यात, राजकीय जागृती, स्वातंत्र्यप्राप्ती, व्यक्तिविकास आणि राष्ट्रउभारणी हे शिक्षणाचे मुख्य उद्देश यातून स्पष्ट होतात.

## ४.२.७ होमरूल अर्थात स्वराज्याविषयी विचार

भारतीय लोकांच्या मनात राष्ट्रवादाची भावना विकसित करताना टिळकांनी स्वराज्याला जन्मसिद्ध अधिकार म्हणणे यामध्ये तार्कीक संबंध आहे. राष्ट्रवाद निर्माण करून राष्ट्रनिर्मिती करण्याच्या प्रवाहातील स्वराज्य हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा होता. राष्ट्रवादी भावनेच्या विकासातील ती अंतिम सर्वोच्च पायरी होती. इ. स. १९१६ च्या लखनौ काँग्रेसमध्ये टिळकांनी याच हेतूने ''स्वराज्य हा माझा जन्म सिद्ध हक्क आहे'' ही ऐतिहासिक गर्जना केली. नैसर्गिक हक्कांच्या सिद्धांतातून स्वराज्याचा विचार उदयाला आला असे मानता येते. यात जन्मसिद्ध हक्काचा विचार आला असून स्वराज्यात स्वातंत्र्याचाही समावेश होतो. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी झालेल्या प्रयत्नाचे तीन टप्पे करता येतात. भारतीयांमध्ये राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रवाद निर्माण करणे. त्यादृष्टीने भारतीय लोकांना एका सूत्रात बांधू शकेल असा मानसिक बंध शोधणे. धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा हा एकमेव घटक यादृष्टीने महत्त्वाचा असल्याने त्याचा आधार घेत जनमानस संघटित करणे. हा पहिला टप्पा होय. लोकांना प्रेरणा मिळण्यासाठी आणि संघटित करण्यासाठी व्यासपीठ निर्माण करणे, तत्कालीन परिस्थितीत अनुकूल असणारे सार्वजनिक उत्सव सुरू करणे जेणे करून लोकांना नियमितपणे संघटित करता येईल आणि राजकीय जागृतीची साधने उपलब्ध होतील हा दुसरा टप्पा होय. तिसऱ्या टप्प्यात टिळकांची भूमिका अधिक आक्रमक बनली तो म्हणजे स्वराजाची मागणी. १९०५ ते १९०८ पर्यंत दुसरा टप्पा पार करीत १९१६ नंतर टिळकांनी होमरूल 'स्वराज्या' वर आपले लक्ष केंद्रित केले.

१९१५ मध्ये डॉ. ॲनी बेझंट आणि लो. टिळक यांनी होमरूल लीगची स्थापना केली. काँग्रेस मधील मवाळ गट स्वराज्याच्या विचाराशी पूर्ण सहमत होणार नाही तसेच

त्यासाठी सातत्याने प्रचार करावा लागेल हे लक्षात घेऊन होमरूल लीगची स्वतंत्रपणे स्थापना करण्यात आली.

**स्वराज्याचा अर्थ :–**

स्वराज्य अर्थात होमरूलचा अर्थ टिळकांनी १९१६ च्या होमरूल लीगच्या परिषदेमध्ये स्पष्ट केला होता. नैसर्गिक हक्काच्या सिद्धांताचा आधार घेत, आपण नैसर्गिक हक्कांचीच मागणी करीत आहोत हे स्पष्ट केले. माणूस हा निसर्गतःच स्वतंत्र असतो त्याचबरोबर त्याला स्वयंशासनाचा अधिकारही निसर्गतः असतो हा पायाभूत विचार येथे आहे. म्हणजे स्वातंत्र्य आणि स्वराज्याचा अधिकार मानवाला कुणी दुसऱ्या शक्तीने किंवा घटकाने प्रदान करण्याचा प्रश्न येत नाही. भारतीयांनादेखील या नियमाप्रमाणे स्वराज्य आणि स्वातंत्र्याचा अधिकार आहे. शिवाजीमहाराजांनी तरुण मावळ्यांना घेऊन ''हिंदवी स्वराज्या''ची केलेली स्थापना हा प्रादेशिक पातळीवर भारतात झालेला पहिला व्यवस्थित अविष्कार होता. त्याला तात्त्विक बैठक प्राप्त करून देण्याचा प्रयत्न समर्थ रामदासांच्या ''महाराष्ट्र धर्मात'' आढळते. स्वराज्याच्या या भावनेला अधिक व्यापक राष्ट्रीय स्वरूप देऊन स्वातंत्र्यप्राप्तीचे ध्येय गाठणे हा टिळक आणि ॲनी बेझंट यांच्या होमरूल चळवळीचा हेतू होता.

'स्वराज्य' म्हणजे 'स्वयंशासन' अर्थात असे शासन अनिर्बंध नसून त्यात सुनियंत्रीत सुप्रमाणित स्वातंत्र्य अभिप्रेत आहे. शासक आणि नागरिक यांनी स्वधर्माचे पालन केल्यास स्वराज्याची निर्मिती होते. अशा स्वराज्यामध्ये धार्मिक आणि सामाजिक परंपरा आणि त्यांनी घालून दिलेल्या कर्तव्यांचे पालन यांचा समावेश असल्याने 'स्वराज्य' या संकल्पनेला टिळकांनी राजकीय अधिष्ठाना बरोबरच नैतिक आधार प्राप्त करून दिला. स्वराज्याची मागणी आणि तिचा अर्थ स्पष्ट करताना टिळकांचे डॉ. बाचल यांनी उध्दृत केलेले विचार असे. यामध्ये टिळक म्हणतात, ''स्वराज्याचा संबंध राजाशी (इंग्लंडच्या) नाही. तो ब्रह्मासारखा अदृश्य आणि चांगले अथवा वाईट या गुणांच्या पलीकडे आहे. राजा ही संस्था न मोडता ती तशीच राहणार आहे. परंतु जे शासनदृष्टीस दिसू शकते ते मात्र बदलणार आहे. मी ज्या स्वराज्याविषयी बोलतो आहे ते दिसणाऱ्या शासनाशी संबंधीत आहे. येथील नागरिकांच्या हिताच्या दृष्टीकोनातून कोणते बदल या शासनात करणे आवश्यक आहे ते मी सांगत आहे. आज या देशाचे प्रशासन न दिसणाऱ्या परकीय नोकरशाहीच्या हातात आहे. ते नको आहे. ते नियंत्रण आमच्याकडे आले पाहिजे स्वराज्य म्हणजे या देशातील नागरिकांकडे शासनाचे नियंत्रण येणे. आम्हाला असे सांगण्यात येते की, सध्याची व्यवस्था चांगली आहे, कारण, प्रशासकांची निवड व नेमणूक ही निश्चित अशा नियमानुसार इंग्लंडमध्ये होत असते. ते अतिशय चांगले असतीलही. ते अतिशय उत्तम रीतीने निपजले असतीलही. परंतु ही व्यवस्था कितीही चांगली असली तरी इतरांची आहे. ती येथील नागरिकांनी निर्माण केलेली नाही. म्हणून ते या व्यवस्थेत समाधान मानू शकणार नाहीत. ती व्यवस्था त्यांना त्यांच्या हातात हवी आहे आणि हेच तर स्वराज्याचे मूलभूत तत्त्व आहे. मी असे म्हणत नाही की, तुम्हास तुमचे शासक नेमण्याचा किंवा निवडण्याचा अधिकार प्राप्त झाला की असे निवडलेले अगर नेमलेले शासक आतापेक्षा उत्तम असतील. एखादेवेळी ते वाईटसुद्धा असतील. परंतु तरीसुद्धा हा फरक आहे की, ज्या व्यक्तींना आम्ही निवडतो त्यांना आमच्या इच्छा आमलात आणणे भाग आहे. परंतु ज्यास आम्ही निवडत नाही तो स्वतःच्या इच्छा राबवील व आम्हास पसंत असो वा

# घटक ५
# महात्मा गांधीं

५.0 उद्दिष्टे
५.१ प्रस्तावना
५.२ विषय विवेचन
 ५.२.१ जीवन परीचय
 ५.२.२ सत्य आणि अहिंसा
 ५.२.३ साध्य–साधन संबंध
 ५.२.४ सत्याग्रहाचे महत्त्व
 ५.२.५ रामराज्य संबंधी विचार
 ५.२.६ गांधीजींचे आर्थिक विचार
 ५.२.७ गांधीजींचे अराज्यवादी विचार
 ५.२.८ गांधीजींचे सामाजिक विचार
 ५.२.९ गांधीजींचे शैक्षणिक विचार
५.३ स्वंय–अध्ययनासाठी प्रश्न
५.४ सारांश
५.५ सरावासाठी प्रश्न
५.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

---

## ५.0 उद्दिष्टे

१) महात्मा गांधी यांचे विचार जाणून घेणे.

२) महात्मा गांधींच्या मूलभूत तत्त्वांची ओळख करून घेणे.

३) महात्मा गांधींच्या सत्य व अहिंसा या तत्त्वांचा अवलंब करणे.

४) महात्मा गांधींच्या सत्याग्रह चळवळीचे महत्त्व जाणून घेणे.

५) महात्मा गांधींच्या सामाजिक, आर्थिक व अराज्यवादी विचार समजून घेणे.

## ५.१ प्रस्तावना

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात महात्मा गांधींचे मोठे योगदान आहे.गांधीजींनी सत्य आणि अहिंसा यांना आपल्या विचाराचे मूलभूत तत्त्व मानले. सत्य हे त्यांच्या जीवनाचे साध्य होते तर अहिंसा हे सत्या पर्यंत पोहचण्याचे साधन होते. गांधीजींनी साध्य व साधनाला परस्परपूरक मानले आहे.अहिंसेच्या मार्गाने त्यांनी सत्याग्रहाचा लढा दिला. महात्मा गांधींनी राजकीय विचाराप्रमाणेच देशातील सामाजिक प्रश्नांचा विचार केला.देशातील मद्यपानामुळे होणारा नैतिक ऱ्हास विचारात घेऊन त्याला विरोध केला.गायीचे महत्त्व ओळखून गोरक्षणाचा विचार मांडला. समाजात स्त्रियांना दुय्यम दर्जा असल्याने देशाच्या प्रगतीला अडथळे निर्माण होतात. याचा विचार करुन स्त्रियांना राजकारणात व समाजकारणात सहभागी करून घेतले. महात्मा गांधींनी खेड्यात असलेला भारत देश विचारात घेऊन लघुउद्योगाला महत्त्व दिले, ग्रामराज्याची संकल्पना मांडली.सत्याच्या विकेंद्रीकरणाला महत्त्व दिले. गांधीजींच्या रामराज्यात प्रजेला महत्त्व असेल. गावे स्वयंपूर्ण असतील. श्रमाला महत्त्व दिलेले असेल. अशा या महात्मा गांधींच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक विचारांची ओळख आपण या घटकातून अभ्यासणार आहोत.

## ५.२ विषय विवेचन

### ५.२.१ जीवन परीचय

महात्मा गांधींचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ साली तर मृत्यू ३० जाने १९४८ मध्ये झाला. प्राथमिक शिक्षण राजकोट येथे झाले.ते मॅट्रीकची परीक्षा १८५७ ला पास झाले.त्यांचे उच्च शिक्षण लंडन येथे झाले.त्यांना १८९१ मध्ये बॅरिस्टर ही पदवी मिळाली वयाच्या २२ व्या वर्षी व्यवसायाने वकिली सुरू केली. प्रथम वकिली राजकोट येथे सुरू केली.आफ्रिकेत वकिलीसाठी १८९३ ला गेले. आफ्रिकेत भारतीय नागरिकांवर होणारा अन्याय विचारात घेऊन त्यांनी सत्याग्रहाची सुरुवात १९०९ आफ्रिकेत केली. १९१४ मध्ये भारतात त्यांचे आगमन झाले. वकिलीबरोबरच जनजागृतीचे कार्य हाती घेतले.पुण्यात गोपाळ कृष्ण गोखल्यांची भेट झाली.त्यांच्या विचाराने प्रभावित झालेल्या गांधींनी गोपाळ कृष्ण गोखलेंना राजकीय गुरू मानले.

१९१६ नंतर राजकारणात गांधींचा प्रवेश लोकमान्य टिळकांनंतर (१९२०) पासून भारतीय स्वातंत्र चळवळीचे नेतृत्व म्हणून असहकार चळवळीने प्रारंभ झाला.१९२२ चौरीचौरा येथे हिंसात्मक घटना झाली.त्यामुळे गांधीनी असहकार कार्यक्रम मागे घेतला.१९२७ ला भारतात सायमन कमिशन आले. सायमन अशा घोषणा देऊन परततून लावले. मार्च १९२७ ला दांडी यात्रेला सुरुवात केली. १९३० ला इंग्लंडमध्ये गोलमेज परिषद पण गांधीजींनी उपस्थिती दर्शविली नाही. १९३१ ला (गांधी आयर्विन करार १९३१) ला दुसरी गोलमेज परिषद झाली. पण पदरात काहीच पडले नाही. १९३२ मधील गांधी - आंबेडकरांमध्ये पुणे करार झाला.

१९४२ ला चलेजाव चळवळ केली. १९४८ ला बिरला मंदिरात प्रार्थनेसाठी जात असताना नथुराम गोडसेंनी त्यांना गोळी घातली. तेव्हा ‘ हे राम’ म्हणत त्यांनी आपला प्राण सोडला.

## महात्मा गांधीचे राजकीय विचार : –

५.२.२ सत्य आणि अहिंसा : – महात्मा गांधींच्या राजकीय विचारांचा पाया ‘सत्य’ हे साध्य तर अहिंसा हे त्यांनी वापरलेले साधन होते.

**सत्य :**

गांधीजींनी सत्याला आपल्या जीवनाचे साध्य मानले होते.सत्याचा अर्थ खरे बोलणे असा आहे.याचाच दुसरा अर्थ खोटे बोलू नये असा आहे.गांधीजींनी आपल्या जीवनात सत्यापर्यंत पोहचण्यासाठी अनेक प्रयोग केले. त्यासाठी त्यांनी आपल्या विचारात बदलही केला. या सत्यासाठी केलेले विविध प्रयोग त्यांनी, ¿ L यापुस्तकातून व्यक्त केले आहे.

गांधींजींनी सत्याचे दोन प्रकार सांगितले आहेत.(१) सापेक्ष सत्य, (२) निरपेक्ष सत्य

**१) सापेक्ष सत्य :–** सापेक्ष सत्य याचा अर्थ, जे सत्य परिस्थितीनुसार बदलत असते म्हणजेच कायमस्वरूपी नसते याला गांधीजींनी सापेक्ष सत्य म्हटले आहे. सर्वसामान्य व्यक्तीच्या जीवनात सापेक्ष सत्याचा वापर केला जातो. व्यक्तीला दैनंदिन जीवनात कधी–कधी खोटयाचाही आधार घ्यावा लागतो.

**२) निरपेक्ष सत्य :–** हे सत्य परिस्थितीनुसार बदलत नाही. याचाच अर्थ जे कायमस्वरूपी असते, चिरंतन असते यालाच सत्यम, शिवम, सुंदरम असेही म्हटले जाते. ह्यालाच सच्चिदानंद असेही म्हटले आहे. हे सत्य फक्त साधू किंवा देवांचाच समावेश असू शकतो.

गांधींजींच्या मते, सर्वसामान्य व्यक्तीने सापेक्ष सत्यामधून निरपेक्ष सत्याकडे जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. म्हणजेच सामान्य व्यक्तीने आदर्श बनण्याचा प्रयत्न करावा.ही गांधींची अपेक्षा होती.

**अहिंसा :–**

अहिंसा याचा अर्थ हिंसा न करणे होय. या हिंसेत शारीरिक, मानसिक, वाचिक ( काया, वाचा,मने) हिंसा गांधींना मान्य नव्हती. म्हणून काया , वाचा , मने गांधींजींनी अहिंसेचा स्वीकार केला होता.

१) कायिक /शारीरिक अहिंसा :–या अहिंसेत कोणीही, कोणाला शारीरिक त्रास देवू नये. इजा करु नये, हे गांधींजींना अपेक्षित होते. हातात शस्त्र घेऊन अथवा विना शस्त्राने इतरांना मारणेही शारीरिक हिंसा झाली. अशाप्रकारची हिंसा गांधींना अजिबात मान्य नव्हती.

२) वाचिक अहिंसा :–याचा अर्थ कोणत्याही व्यक्तीला टोचून बोलू नये. तिला बोलून दुखवू नये. तिच्याबद्दल अपशब्द काढू नये अथवा भांडू नये. जेणेकरून त्या व्यक्तीला वाईट वाटेल याला वाचिक अहिंसा म्हटले आहे.

३) मानसिक अहिंसा :- याचा अर्थ दुसऱ्या व्यक्तीविषयी आपल्या मनात वाईट विचार येणे. तसेच एखाद्या व्यक्तीविषयी द्वेश, तिरस्कार, स्वार्थ, अहंभाव, मत्सराची भावना बाळगणे ही सुद्‌धा मानसिक हिंसा होय.

अशा प्रकारे गांधीजींनी काया-वाचा - मने या तिन्ही अर्थाने अहिंसेचा अर्थ घेतला. अहिंसेची संकल्पना व्यापक व विस्तृत अर्थाने घेतली. गांधींजींनी अहिंसेचे तीन प्रकार सांगीतले आहे. ते पुढीलप्रमाणे :-

**अहिंसेच तीन प्रकार :-**

१) **सामर्थ्यवानांची अहिंसा:-** महात्मा गांधींजींच्यामते, यात दोन व्यक्ती किंवा दोन राष्ट्रे यांच्यात संघर्ष झाल्यास व्यक्ती किंवा राष्ट्र सामर्थ्य असूनही प्रतिकार करीत नाही. हिंसा करणाऱ्याला माफ करते.त्यामुळे समोरच्या व्यक्तीचे ह्रदयपरिवर्तन होते. अशी व्यक्ती सामर्थ्य असूनही प्रतिकार करीत नाही. त्याला गांधींजींनी सामर्थ्यवानांची अहिंसा म्हटले आहे.

२) **दुर्बलांची अहिंसा :-** गांधीजींच्या मते, दोन व्यक्ती किंवा दोन गट यांच्यात संघर्ष होतो.या व्यक्ती किंवा गटातील एखादी व्यक्ती किंवा गट दुर्बल असेल म्हणजे त्याची प्रतिकार करण्याची क्षमता नसेल त्यांच्या हातून हिंसा होत नाही यालाच गांधींजींनी दुर्बलांची अहिंसा म्हटले आहे.

३) **भित्र्यांची अहिंसा :-**गांधींजींच्यामते, जेव्हा एखादी व्यक्ती किंवा गट भित्रा असल्यास, तर तो प्रतिकार करण्याऐवजी रणांगण सोडून जात असेल तर त्याच्या हातून हिंसा होण्याचा प्रश्नच नाही. म्हणून गांधींजींनी याला भित्र्यांची अहिंसा असे म्हटले आहे. गांधीजींच्या मते,

वरील अहिंसेच्या प्रकारात सर्वात श्रेष्ठ अहिंसा ही सामर्थ्यवानांची आहे.तर सर्वात कनिष्ठ अहिंसा भित्र्यांची आहे.रणांगणातून पळून जाण्यापेक्षा देशासाठी वीरमरण आलेले केव्हाही चांगले, असा विचार गांधींजींचा होता. जी व्यक्ती सामर्थ्यवान असते, उदार असते अशी व्यक्ती आदर्शापोटी हिंसा करत नाही. ती सर्वश्रेष्ठ असते.म्हणून व्यक्तीने सामर्थ्यवानांच्या अहिंसेचा स्वीकार करावा असे गांधींचे मत होते.

म. गांधींच्या राजकीय विचारांत सत्याग्रहाला श्रेष्ठ स्थान आहे.सत्याग्रह म्हणजे अहिंसात्मक संघर्षाचे एक मोठे शस्त्र आहे. अहिंसात्मक मार्गाने युद्ध करण्याचा तो एक मार्ग आहे. सत्याग्रहाचा अर्थ सत्याचा आग्रह होय. गांधींजींचा सत्यावर विश्वास होता. म्हणून सत्य हे त्यांनी आपल्या जीवनाचे ध्येय मानले.सत्यापर्यंत पोहचण्यासाठी त्यांनी अहिंसेच्या मार्गाचा स्वीकार केला.सत्याग्रह म्हणजे अन्याय, अत्याचार, दडपशाही आणि शोषण यांच्याविरुद्ध केलेल्या आत्मिक शक्तीचा वापर होय.सॉक्रेटिस, येशु ख्रिस्त हे महापुरुष सत्यासाठीच लढले.१९२२ साली 'यंग इंडिया' या वर्तमानपत्रात त्यांनी सत्याग्रहाचे महत्त्व सांगितले.

### ५.२.३ साध्य – साधन संबंध :–

गांधींजींच्या मते, साध्य आणि साधन ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. साध्य जितके चांगले तितकेच साधनही चांगले असावयास हवे. कारल्याच्या बियांना कितीही साखरेचे पाणी घातले तर ते कडूच राहणार म्हणून गांधीजींनी साध्य आणि साधन ह्या दोन्ही गोष्टी श्रेष्ठ मानल्या. स्वातंत्र मिळविणे हे त्यांचे साध्य होते. त्यासाठी गांधींजींनी असहकार या अहिंसेच्या साधनाचा स्वीकार केला. साध्य आणि साधन परस्परपूरक आहेत म्हणून गांधींजींनी दोन्ही गोष्टींना महत्त्व दिले. सत्य हे साध्य मानले तर अहिंसा हे साधन मानले. सत्य हे गांधीजींनी आपल्या जीवनाचे साध्य मानले होते. सत्य याचा अर्थ खरे बोलणे म्हणजेच खोटे बोलू नये.महात्मा गांधींनी सत्यापर्यंत पोहचण्यासाठी अहिंसेच्या मार्गाचा स्वीकार केला.गांधींजींनी सामाजिक जीवनाप्रमाणेच राजकीय जीवनात सत्याला महत्त्व दिले.गांधींजींच्या मते, जितके साध्य चांगले असेल तितकेच साधनही चांगले असावयास हवे.उदा.परीक्षेत पहिल्या क्रमांकाने पास होणे हे आपले साध्य आहे.तितकेच साधनही चांगले असण्यासाठी अभ्यास करणे आवश्यक आहे.कॉपी करणे, परीक्षकांना धमकी देणे, पैसे देऊन गुण वाढवून घेणे या सर्व मार्गांपेक्षा अभ्यास करणे हे श्रेष्ठ साधन आहे. तसेच,

एखाद्या व्यक्तीच्या पोटात गोळा झाला असेल तर त्या व्यक्तीचा जीव वाचविण्यासाठी शस्त्रक्रिया करणे आवश्यक असते.त्यामागे डॉक्टरांचा हेतू रोग्याचे प्राण वाचविणे हा असतो.मात्र डॉक्टरांनी वापरलेली साधने गंजलेली असल्यास रोग्याचा प्राण जाण्याची शक्यता दाट असते.तेव्हा हेतू साध्य होऊ शकत नाही.म्हणून गांधींजीनी साध्याइतकेच साधनाला महत्त्व दिले.

### ५.२.४ सत्याग्रहाचे महत्त्व :–

सत्याग्रह हा मनुष्याचा जन्मसिद्ध हक्क आहे.तसेच ते एक पवित्र कर्तव्य आहे.सत्याग्रही व्यक्तीने कष्ट सहन करण्याची तयारी ठेवावी.आत्मबलिदान करावे.असे केल्यानेच सत्याग्रहाचा विजय होतो.सत्याग्रहाच्या मार्गाने जाणाऱ्या व्यक्तीचा मृत्यू झाला तर त्याच्या मृत्यूनंतर हजारो लोक त्याचे अनुयायी बनतात.सत्याग्रह हे एक नैतिक शस्त्र आहे.त्याचा आधार केवळ आत्मबल आहे.त्यामुळे हे शस्त्र केवळ वीरपुरुषांचे शस्त्र आहे.यावरून सत्याग्रहाचे महत्त्व स्पष्ट होते.

### सत्याग्रहीसाठीच्या पात्रता :–

१) ईश्वरावर श्रद्धा हवी. जेणेकरून तो विरोधाचा त्रास सहन करू शकेल.

२) अन्याय झाला असेल तरच सत्याग्रह करावा.

३) सत्याग्रहीचे आरोग्य उत्तम असावे.

४) ब्रम्ह चर्याचे पालन करावे.

५)　संपत्ती व प्रसिद्धीची हाव नसावी.

६)　विरोधकांबद्दल प्रेम व आदर असावा.

७)　व्यक्ती ध्येयनिष्ठ असावी. त्याच्या ठिकाणी चिकाटी व निर्धार असावा.

अशाप्रकारे गांधीजींनी मानसिक आत्मबल वाढवून जनतेने सत्याग्रहाच्या मार्गाचा अवलंब करावा, असा आग्रह धरला.

सत्याग्रहाची तंत्रे / साधने -

गांधींजींचा अहिंसेवर विश्वास होता.म्हणून सत्यापर्यंत पोहचण्यासाठी त्यांनी अहिंसात्मक मार्गाचा अवलंब केला. हे अहिंसेचे साधन जपून वापरावे अशी सूचना गांधीजींनी दिली. एखादे शस्त्र सातत्याने वापरल्यास त्याची धार बोथट होते.जसे शस्त्र निरुपयोगी ठरते त्याचप्रमाणे सत्याग्रहाचे हे शस्त्र निरुपयोगी ठरू शकते अशी सूचना गांधीजींनी दिली. तसेच एखाद्या खडबडीत दगड सारखा घरंगळत असेत तर तो गुळगुळीत होतो.त्याचप्रमाणे ही सत्याग्रहाची साधने सातत्याने वापरल्यास तिची परिणामकारकता व प्रभाव क्षमता कमी होते, अशी सुचना देऊन गांधीजींनी सत्याग्रहाचे पुढील मार्ग सांगितले आहेत.

**१)　असहकार आंदोलन :-**

गांधीजींचा सनदशीर मार्गावर विश्वास होता.म्हणून त्यांनी १९२० पासून म्हणजेच आपल्या नेतृत्वापासून असहकार चळवळीला प्रारंभ केला.या चळवळीचा हेतू ब्रिटिशांना कोणत्याही प्रकारचे सहकार्य न करण्याचा होता.म्हणून त्यांनी स्वदेशी व बहिष्कार तंत्राचा अवलंब केला.

**२)　संप :-**

गांधीजींच्या मते, योग्य व न्यायपूर्ण मागण्या असतील तर संप करावयास हवा. हा संप एकदिवशीय किंवा बेमुदतही असू शकतो.अन्याय, अत्याचार, जुलूम, जबरदस्ती व पिळवणुकीविरुद्ध संप केला जातो.संप काळात काम न करणे म्हणजेच विरोध नोंदविणे होय.

**३)　हरताळ :-**

ऐच्छिक तसेच हिंसात्मक नसावा.कामगारांनी न्यायपूर्ण मागण्यांसाठी निषेध नोंदविण्याचा हा प्रकार आहे.यात काम न करता आपल्या मागण्या न्यायपूर्ण असल्याचे समाजाला पटवून देणे व समाजाचे नैतिक पाठबळ मिळविणे हा हरताळामागचा उद्देश असतो.

**४)　मोर्चा :-**

समान हितसंबंध असलेल्या उद्‌देश्य आपल्यावर होत असलेल्या अन्यायाची समाजाला जाणीव करून देणे. जेणेकरून समाजाचे पाठबळ प्राप्त करणे. व मोर्चाचे स्वरूप व्यापक बनविणे.

५)  **धरणे धरणे :-** आपल्या न्यायपूर्ण मागण्यांसाठी व्यक्ती, संस्था किंवा सरकार यांच्याकडून होत असलेल्या अन्यायाच्या विरुद्ध लढा देण्यास कार्यालयाच्या बाहेर धरणे धरणे. हे धरणे एकदिवशीय किंवा बहुदिवसीय असू शकतात. धरणे धरणाऱ्या व्यक्तींनी घेराव घालून आपल्या यथोचित मागण्यांसाठी सरकारला किंवा संस्थेला घेराव घालणे होय.

६)  **उपोषण :-** गांधींजींच्या मते, सत्याग्रहाच्या अनेक साधनांपैकी असलेले हे सर्वश्रेष्ठ साधन आहे. उपोषणामागचा हेतू आपण करत असलेले उपोषण योग्य आहे किंवा नाही हे तपासून त्यांचे चिंतन व मनन करणे. उपोषणाच्या काळात आत्मबल वाढवणे. हे उपोषण एकदिवशीय किंवा आमरण असावे, मात्र आजच्यासारखे साखळी उपोषण नसणे.

७)  **प्रदेश त्याग :-** एखाद्या प्रदेशात आपल्यावर सातत्याने अन्याय होत असेल तर त्याला अहिंसात्मक मार्गाने प्रतिकार करणे.हे शक्य नसल्यास त्या प्रदेशाचा त्याग करून स्थलांतर करणे असा विचार गांधींचा होता.

८)  **निरोधन :-** व्यक्ती किंवा गटास समाजविघातक कृती करण्यास प्रतिबंध करणे. विरोध करून मतपरिवर्तन करणे. शक्तीचा वापर न करता ,दारुबंदीच्या कार्यक्रमासाठी गांधीजींनी निरोधनाचा मार्ग अवलंबिला.

९)  **परकिय आक्रमणाविरुद्ध सत्याग्रह :-**

परकीयांनी आक्रमण केले तर त्यांना देशाचा ताबा घेवू द्यावा. राज्यकारभारात सहकार्य देऊ नाही. अहिंसात्मक मार्गाने प्रतिकार करून झुकवण्याऐवजी मरण्याची तयारी दाखवावी.

## ५.२.५ रामराज्यासंबंधीचे विचार :-

गांधीजींनी स्वराज्यानंतर ग्रामराज्याला प्राधान्य दिले.कारण भारतातील ७०% लोक ग्रामीण भागात राहत होते.जोपर्यंत ग्रामीण भागाचा विकास होत नाही तोपर्यंत देशाचा विकास शक्य नाही. म्हणून लघुउद्योग, कुटीरोद्योगांना त्यांनी प्राधान्य दिले.गाव स्वयंपूर्ण होवून गावाचा विकास झाला पाहिजे. म्हणजेच देशाचा विकास होणारच अशाप्रकारे गावाला केंद्रस्थानी मांडले.

या ग्रामराज्यातील 'ग' नष्ट करुन रामराज्य प्रस्थापित करावे हे गांधींचे स्वप्न होते 'ग' या शब्दाचा अर्थ गर्व, अहं, स्वार्थीपणा असा होतो. व्यक्तीच्या जीवनात गर्व, अहंपणा, संकुचितपणा नष्ट करुन आदर्श राज्य म्हणजेच रामराज्य निर्माण करणे हे त्यांच्या विचारातील मुख्य ध्येय होते.

या रामराज्यात लोकांच्या गरजा मर्यादित असतील, त्यामुळे या गरजांच्या पूर्तीसाठी आवश्यक तेवढा पैसा व्यक्तीने स्वत:कडे बाळगावा. तसेच जास्तीच्या संपत्तीचा उपयोग समाज कल्याणासाठी करावा.

रामराज्यात स्वहिताऐवजी समाजहिताला प्राधान्य असावे.

रामराज्यात सर्वसामान्य व्यक्तीलाही महत्व असेल.

या रामराज्यात कोणत्याही श्रीमंताकडून कोणत्याही गरिबांचे शोषण होणार नाही.

वरिष्ठाकडून कनिष्ठांवर अन्याय, अत्याचार होणार नाही.

जात, लिंग, वंश इ. च्या आधारावर भेदभाव होणार नाही.

रामराज्यात कुणीही श्रेष्ठ अथवा कनिष्ठ असणार नाही. सर्वांना समान मानले जाईल.

रामराज्यात व्यक्तीने स्वत:च स्वत:वर नियंत्रण ठेवावे.

रामराज्यातील व्यक्ती आदर्श व उदार असतील. त्यामुळे संघर्षाचा प्रश्न नसणार. म्हणून सैन्याची आवश्यकता असणार नाही.

सुरुवातीला रामराज्यात तुरुंगव्यवस्था असेल. परंतु तिचे स्वरूप सुधारगृहाच्या स्वरूपासारखे असेल.

या रामराज्यात नियंत्रण ठेवणाऱ्या साम, दाम, दंड, भेद नीतीचा अवलंब करणाऱ्या राज्याची आवश्यकता असणार नाही.

अशाप्रकारे गांधीजींनी रामराज्यासंबंधी विचार मांडले.या रामराज्यात कुणी कनिष्ठ असणार नाही किंवा कुणी कुणाचे शोषण करणार नाही असे स्वप्न गांधीजींचे होते.

## ५.२.६ गांधीजींचे आर्थिक विचार :-

महात्मा गांधींनी भारतीय परिस्थिती विचारात घेऊन आपले आर्थिक विचार मांडले. हे विचार त्यांनी लिहिलेल्या लेखांतून व भाषणांतून व्यक्त केले. गांधीजींच्या आर्थिक विचारांवर टॉलस्टॉय व रस्किन यांच्या विचारांचा प्रभाव पडलेला होता. देशाच्या आर्थिक विकासासाठी नैसर्गिक साधनसामग्री व मनुष्यबळ यांच्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न गांधीजींनी केला.

### . शारीरिक श्रम व बौद्धिक श्रमाला सारखे महत्त्व :-

गांधीजींच्या मते, मानवाला दैनंदिन जीवन जगतांना बौद्धिक श्रमांप्रमाणेच शारीरिक श्रमांची आवश्यकता असते. शारीरिक श्रमामुळे आरोग्य निरोगी राहते.म्हणून प्रत्येक व्यक्तीने श्रम केलेच पाहिजे. ' ना श्रम ,ना भोजन' या उक्तीप्रमाणे गांधीजींनी श्रम करणाऱ्यालाच भोजन करण्याचा अधिकार असावा असे विचार मांडले. तसेच श्रम करणाऱ्यालाच मतदानाचा अधिकार देण्यात यावा असे गांधीजींचे मत होते.

शारीरिक श्रम करणारा वर्ग समाजात नसेल तर सर्वत्र घाणीचे व दुर्गंधीचे साम्राज्य निर्माण होईल. त्याचा विपरित परिणाम आरोग्यावर होणार म्हणून शारीरिक श्रम करणाऱ्याला कमी लेखू नये, श्रम मग ते शारीरिक असो वा बौद्धिक त्यांना समान महत्त्व दिले पाहिजे.

तसेच समान कामासाठी समान वेतन द्यावयास हवे असा विचार गांधीजींनी मांडला.

**सर्वोदय :-**

सर्वोदय याचा अर्थ समाजातील सर्वांचा उदय आणि विकास होय.समाजातील केवळ कामगारांचे हित गांधीजींना मान्य नव्हते.मार्क्सने आपल्या साम्यवादी विचारात केवळ श्रमिकांच्या हिताचा विचार केला.त्यासाठी क्रांतिकारी मार्गांचा स्वीकार केला.हे विचार गांधीजींना अमान्य होते. गांधीजींच्या मते, व्यक्ती श्रीमंत असो अथवा गरीब. श्रेष्ठ असो अथवा कनिष्ठ, शिक्षित असो अथवा अशिक्षित , शहरी असो वा ग्रामीण तसेच स्त्री वा पुरुष असो या सर्वांचा विकास गांधीजींना अपेक्षित होता. हा विकास अहिंसेच्या मार्गाने अपेक्षित होता. म्हणून ज्या व्यक्तीकडे जास्त संपत्ती असेल ती संपत्ती काढून घेण्याचा प्रयत्न केल्यास ते निराश होऊन तिच्या मनात द्वेषभावना निर्माण होईल. ही एक प्रकारची हिंसा असेल म्हणून गांधींनी सर्वांच्या हिताचा विचार केला आहे.

समाजातील प्रत्येक व्यक्तीला दोन गोष्टी अतिप्रिय असतात. स्वत:चे जीवन व स्वत:ची संपत्ती. जेव्हा भांडवलदारांकडून संपत्ती काढून घेण्याचा प्रयत्न केला तर ती एक प्रकारची हिंसा असेल म्हणून श्रीमंतांचे मन:परिवर्तन किंवा हृदयपरिवर्तन करण्यात यावे. असे गांधीजींचे मत होते. त्यासाठी गांधीजींनी विश्वस्ताबाबतचा विचार मांडला.

**विश्वस्ताची संकल्पना :-**

महात्मा गांधींनी 'विश्वस्त' हा शब्द त्यांच्या 'हिंद-स्वराज्य' या पुस्तकात १९०९ साली हा प्रथम वापरला.त्यानंतर १९१३ साली बनारस हिंदू विश्वविद्यालयाच्या उद्घाटन समारंभ कार्यक्रमात विश्वस्ताचा विचार जनतेसमोर मांडला.

समाजातील जमीनदार, भांडवलदार अशा श्रीमंत वर्गाने शेतकरी, श्रमिक अशा गरीब जनतेची विश्वस्त म्हणून काम पाहावे.श्रीमंत लोकांनी आवश्यक तेवढीच संपत्ती बाळगावी. उरलेल्या संपत्तीचा विनियोग समाजहितासाठी करावा.मानवतावादी दृष्टिकोनातून गांधीजींनी विश्वस्ताची संकल्पना मांडली.

**संपत्तीचे समान वाटप :-**

गांधीजींच्या मते, संपत्तीच्या समान वाटपासाठी विश्वस्ताची संकल्पना उपयुक्त आहे.श्रीमंत भांडवलदारांनी आपल्या गरजा मर्यादित ठेवाव्यात. आवश्यक तेवढीच संपत्ती स्वत:कडे बाळगावी. जास्तीच्या संपत्तीचा विनियोग समाजाच्या हितासाठी करावा. विश्वस्त या नात्याने त्या संपत्तीचा विनीयोग कसा करावा, कोणते पीक केव्हा घ्यावे.संपत्तीचे वाटप कसे कराव, यासंबंधीचे निर्णय घ्यावे.मालक या नात्याने आपल्याकडील विशाल दृष्टिकोन बाळगावा अशी अपेक्षा गांधींनी व्यक्त केली होती.

**संपत्ती ही ईश्वराची :-**

गांधीजींच्या मते, जन्माला येताना प्रत्येक मनुष्य रिकाम्या हाती आला.त्यामुळे समाजातील सर्व संपत्ती ही परमेश्वराची देणगी आहे.म्हणून आवश्यकतेपेक्षा जास्त संपत्ती व्यक्तीने बाळगू नये. आपल्याकडील जास्तीच्या संपत्तीचा उपयोग गरीब दु:खी जनतेच्या

सेवेसाठी करावा. या संपत्तीचे विश्वस्त बनून समाजात सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करावा, असा विचार गांधींनी मांडला.

**अहिंसेच्या मार्गाने हृदयपरिवर्तन :-**

गांधीजींच्या मते, प्रत्येक व्यक्तीला दोन गोष्टी अतिप्रिय असतात. जीवन व संपत्ती. त्यामुळे श्रीमंत व्यक्ती आपल्या जास्तीच्या संपत्तीचा उपयोग समाजाच्या कल्याणासाठी करण्यास सहजासहजी तयार होणार नाही. म्हणून सातत्याने गरिबांचे दु:ख, त्यांना भोगाव्या लागणाऱ्या यातना याची जाणीव श्रीमंतांना करून द्यावी. श्रीमंत व्यक्ती मग ती जमीनदार असो वा भांडवलदार ती मनुष्यच असते.तिला मन व भावना असतात.तेव्हा सातत्याने परिरस्थितीची जाणीव करुन दिल्यास त्यांचे हृदयपरिरवर्तन होऊ शकेल. असे गांधीजींचे मत होते. या श्रीमंतांनी लाखो गरीब व असंतुष्ट लोकांच्या हितासाठी आपल्या संपत्तीचा वापर करावा.ही विश्वस्ताची संकल्पना स्वातंत्र्याची गुरुकिल्ली आहे.यामुळे समाजात समानता व सामाजिक न्याय प्रस्थापित होण्यास मदत होईल.

अशा प्रकारे गांधींनी संपूर्ण समाजाच्या विकासासाठी व सामाजिक न्यायासाठी विश्वस्ताची संकल्पना मांडली.

**लघुउद्योजकांना प्राधान्य :-**

गांधीजींनी भारताची लोकसंख्या विचारात घेऊन लघु उद्योगधंद्यांना प्राधान्य दिले.भारतीयांच्या हाताला काम मिळावे, त्यांचा विकास व्हावा, रिकामे डोके सैतानाचे घर बनू नये यासाठी त्यांनी घराघरातून व गावागावातून कुटीरोद्योग व ग्रामोद्योग चालावेत अशी अपेक्षा व्यक्त केली होती. कुटीरोद्योगामुळे कुटुंबातील प्रश्न सुटण्यास मदत होईल तर ग्रामोद्योगामुळे गाव स्वावलंबी व स्वयंपूर्ण बनू शकेल . अशी अपेक्षा गांधीजींनी व्यक्त केली होती.

**यांत्रिकीकरणाला विरोध :-**

महात्मा गांधीजींचा यांत्रिकीकरणाला विरोध होता. भारताची लोकसंख्या विचारात घेऊन गांधीजींनी यांत्रिकीकरणाला विरोध केला.कारण मोठमोठ्या यंत्रांच्या सहाय्याने उत्पादन केल्यास भारतीय जनतेच्या हाताला काम मिळणार नाही. निराश व हताश होणारी ही जनता नाराज असेल, बेकारी, दारिद्र्य, विद्रोह निर्माण होण्याची शक्यता त्यामुळे नाकारता येऊ शकत नाही. म्हणून गांधीजींनी यांत्रिकीकरणाला विरोध केला.

यंत्राला विरोध करण्यामागचा दुसरा उद्देश यंत्रामुळे व्यक्तीचे जीवन यंत्रमय बनते.मानवाच्या कलाकुसरीला व कौशल्याला महत्व उरत नाही.कौशल्यापासून तयार करण्यात आलेल्या वस्तूंपासून मिळणारे मानसिक समाधान यंत्रापासून तयार होणाऱ्या वस्तूतून मिळू शकत नाही.म्हणूनच गांधीजींनी मोठया यंत्राला विरोध केला होता. शिलाईमशिन, चरखा यांसारख्या छोट्या यंत्राला त्यांचा विरोध नव्हता.

**स्वदेशी :-**

गांधीजींच्या मते, जनतेने स्वदेशीचा म्हणजेच आपल्या गावात व देशात तयार

झालेल्या वस्तूंचा वापर करावा. त्यामुळे देशातील जनतेला काम मिळेल. बेकारी व दारिद्र्य ह्या समस्या नष्ट होण्यास मदत होईल.त्यामुळे गाव स्वावलंबी व स्वयंपूर्ण बनू शकेल.

तसेच स्वदेशी वस्तूंच्या वापरामुळे देशातील चलन किंवा पैसा हा देशातच राहील. त्यासाठी स्वदेशी वस्तू महाग असली तरी तिचाच वापर करावा. परदेशींवर बहिष्कार टाकावा, असा स्पष्ट आग्रह धरला. अशाप्रकारे भारतीय परिस्थितीचा विचार करून महात्मा गांधींनी आर्थिक विचार मांडले.

## ५.२.७ गांधीजींचे अराज्यवादी विचार :-

महात्मा गांधींना राज्य मान्य नव्हते. कारण राज्य हे दंडशक्तीयुक्त सामर्थ्याने परिपूर्ण असते.त्यामुळे राज्याचे व्यक्तीवर नियंत्रण असते.कधी कधी एखादी गोष्ट पूर्ण करण्यासाठी सक्तीही केली जाऊ शकते. त्यामुळे व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर मर्यादा येतात. राज्याच्या आदेशाचे उल्लंघन केल्यास शिक्षेची भीती असते. त्या भीतीपोटी जनता राज्यांच्या आदेशाचे पालन करते.ही राज्याची शक्ती किंवा सक्ती इतरांची मने दुखवू शकतात.ती एक प्रकारची हिंसाच आहे.म्हणून गांधींना राज्य मान्य नव्हते.

गांधीजींच्या मते राज्याची निर्मिती ही संघर्षातून झाली आहे . पूर्वी राज्य नव्हते त्यामुळे व्यक्ती मनात येईल तशी वागायची. व्यक्ती वर्तनावर नियंत्रण नसल्यामुळे समाजात अत्याचार, अन्याय, गोधळ , बेशिस्तीचे वातावरण निर्माण झाले. व्यक्तीला आपल्या जीवनाची व संपत्तीची हमी नव्हती, सुरक्षितता नसल्यामुळे व्यक्तीचे जीवन धोक्यात आले होते. या संघर्षमय परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी, शांततापूर्ण व सुखी जीवनासाठी व्यक्तीने आपापसात करार करून राज्याची निर्मिती केली. संघर्षातून निर्माण झालेले राज्य गांधींना मान्य नव्हते. म्हणून गांधीजींच्या मते, व्यक्तीने आपल्या गरजा मर्यादित ठेवाव्यात इतरांच्या हितातच स्वत:चे हित शोधावे. जेव्हा व्यक्ती स्वत:ऐवजी दुसऱ्यांसाठी जगेल, तिच्यातील अहम नष्ट होईल, तेव्हाच समाजात संघर्ष असणार नाही.संघर्ष नसेल तेव्हा नियंत्रण ठेवणाऱ्या राज्याची आवश्यकता असणार नाही.

मात्र जोपर्यंत व्यक्तीचे विचार उदात्त होत नाही.तोपर्यंत राज्याने मर्यादित स्वरूपाचे कार्य करावे.व्यक्तीच्या जीवनात राज्याने हस्तक्षेप करू नये.राज्यातील तुरुंग ही सुधारगृहे स्वरुपाची असावी. अशाप्रकारे व्यक्तीने उदात्त दृष्टीकोनाचा स्वीकार करावा. त्यामुळे राज्याची आवश्यकता भासणार नाही असे अराज्यवादी स्वरूपाचे विचार मांडले.

## ५.२.८ गांधीजींचे सामाजिक विचार :-

महात्मा गांधीजींनी सामाजिक विचार हे कोणत्याही पुस्तकात लिहून ठेवलेले नाहीत. देशसेवा करत असताना तसेच स्वातंत्र्याचे नेतृत्व करताना परिस्थितीनुरूप गांधीजींनी

आपल्या भाषणातून व लेखनातून सामाजिक विचार मांडले. ते पुढील प्रमाणे :-

१) **अस्पृश्यतानिवारण:-**महात्मा गांधींना जातीयव्यवस्था तसेचत्याकाळात असलेली अस्पृश्यता मान्य नव्हती. गांधीजींच्यामते, सर्वमानवजात ही परमेश्वराची लेकरे आहेत. त्यासाठी कुणालाही श्रेष्ठ व कनिष्ठ लेखणे योग्य नाही. सर्व मानवजातीच्या रक्ताचा रंग हा सारखाच आहे. भावना, मन, इच्छा इ. बाबी सारख्याच असतात. तेव्हा समाजातील काही व्यक्ती किंवा गटांना अधिकारांपासून वंचित ठेवणे योग्य ठरणार नाही. म्हणून गांधीजींनी अस्पृश्य वर्गासाठी 'हरिजन' हा शब्द वापरला. 'हरिजन' या शब्दाचा अर्थ परमेश्वराची लेकरे असा आहे. तेव्हा या समाजातील कोणत्याही व्यक्तीला व गटाला हीन लेखणे योग्य नाही, म्हणून गांधींनी अस्पृश्यता निवारण्याचे कार्य केले.

२)**आंतरजातीय विवाह:-** महात्मा गांधींनी समाजातील जातीभेद नष्ट करून समानतेवर व सामाजिक न्यायावर आधारित समाज निर्माण व्हावा यासाठी आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन दिले. एवढेच नव्हे तर त्यांनी स्वत: आंतरजातीय विवाह लावून दिले. मानवाने जात,धर्म, वंश, पंथ असा भेदभाव न करता एकमेकांना सहकार्य करावे. आपुलकीने वागावे, जेणेकरून एकात्मता व सलोख्याचे वातावरण निर्माण होऊ शकेल.

३) **गोहत्या बंदी:-** गांधीजींनी गो म्हणजे परमेश्वर असे मानले. गायीची सेवा करणे आपले कर्तव्य आहे. गाईपासून आपल्याला पौष्टीक आहार मिळतो. सेंद्रीय खताची निर्मिती होते. म्हणून हिंदू धर्मात गाईला पवित्र मानले आहे. तसेच गाईची हत्या करणे, त्यासाठी असलेले कत्तलखाने गांधींना मान्य नव्हते. पौष्टीक दूध देणाऱ्या गाईला मारणे म्हणजे माणूसकीला काळीमाच फासण्यासारखे आहे. म्हणून गाय दुध देते तोपर्यंत पाळणे व दूध देणे बंद केल्यास कत्तलखान्यात पाठविणे ही गोष्ट माणुसकीला लाजवणारी असल्याने गांधीजींना गोहत्या बंदीचा नारा लावला.

४) **दारुबंदी, सिगारेट व तंबाखुबंदी:-** गांधीजींना चरस, गांजा, तंबाखू, सिगारेट व दारु या मादक पदार्थांना विरोध केला. कारण या पदार्थांच्या सेवनाने व्यक्ती हातानेच आपला मृत्यू ओढावून घेते. सिगारेट सारखे पदार्थ चोरपावलाने मृत्यूला कारणीभूत ठरतात. म्हणून या मादक पदार्थांना विरोध करून जनजागृतीचे कार्य केले.

दारूबंदी करण्यासाठी गांधीजींनी स्त्रियांची मदत घेतली.कारण दारू पिऊन येणारा नवरा स्त्रियांची मारझोड करीत असे.दारुमुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाले.म्हणून गांधीजींनी स्त्रियांच्या मदतीने दारूच्या अडड्यावर धाडी टाकल्या. दारूच्या सेवनाने व्यक्ती आपल्या बहीण व पत्नीतील फरक विसरतो.अपकृत्य करण्यास प्रेरित होतो.त्याची नैतिकता ढासळते.समाजातील शांतता नष्ट होते.म्हणून गांधीजींनी मादक पदार्थांच्या सेवनाला विरोध केला.

याशिवाय गांधीजींनी बालविवाहाला विरोध केला. विधवा विवाहाला प्रोत्साहन दिले.केशवपनाची पद्धत बंद केली.हुंडा पद्धतीला विरोध केला.अशाप्रकारे गांधीजींनी व्यक्तीला केंद्रबिंदू मानून व्यक्ती विकासासाठी प्रयत्न केले. व्यक्तींना आपले हक्क व कर्तव्याचा उपभोग घेता यावा, हक्कावर अतिक्रमण झाल्यास दाद मागता यावी. समाजातील प्रत्येक व्यक्तीला न्याय मिळावा म्हणून गांधींनी कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान असतील

असा विचार मांडला.व्यक्तीचे स्वातंत्र्य व व्यक्तीचा विकास जोपासण्याचा प्रयत्न गांधीजींनी केला.सामान्य जनतेच्या कल्याणासाठी अन्न, वस्त्र आणि निवारा या किमान गरजा भागविता याव्यात यासाठी अहिंसेच्या मार्गाने समाज परिवर्तन घडवून आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.हीच त्यांची देशसेवा म्हणजेच मानवतेची सेवा होय.

## ५.२.९ गांधीजींचे शैक्षणिक विचार :-

महात्मागांधीजींच्या मते, आज भारतात दिले जाणारे पश्चात्य शिक्षण हे कारकुनी स्वरूपाचे आहे. या शिक्षणामुळे व्यक्तीचा केवळ बौद्धिक विकास होतो मात्र शारीरिक व मानसिक विकास होत नाही. गांधीजींनी राष्ट्रीय शिक्षणाला महत्त्व दिले.गांधीजींनी आपले शैक्षणिक विचार तत्त्वज्ञानाच्या स्वरूपात मांडलेले नाही. त्यांनी केवळ ते प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला.व्यक्तीच्या जीवनात जसे स्वातंत्र्याला महत्त्व आहे.तसेच महत्व शिक्षणालाही आहे. ड्युई या शिक्षणतज्ज्ञांच्या मते, गांधीजींनी कृतीद्वारे शिक्षण देण्यात यावे असा विचार मांडला.

गांधीजींच्या मते, प्रत्येक व्यक्तीला सुसंस्कृत व चारित्र्यसंपन्न बनविण्याचा सोपा मार्ग म्हणजे शिक्षण होये.शिक्षणातून व्यक्ती चारित्र्यसंपन्न व्हावयास हवी.शिक्षणातून माणसाला उद्योग चालविता यावेत म्हणजेच हाताला काम मिळावे.शिक्षण हे साध्य नसून चांगले जीवन जगण्याचे एक साधन आहे.या साधनामुळे आपल्याला अधिकार व कर्तव्याची जाणीव होते. आपल्या बुद्धिचा विकास होतो. शरीर, बुद्धी, हृदय यांचा समतोल विकास ~~साधणारे हे एक प्रभावी साधन आहे. म्हणून गांधीजींनी शिक्षणविषयक विचारात ३ एच~~ (३)ला महत्त्व देण्यात आले.( - , , )

### शिक्षणाची उद्दिष्ट्ये :-

गांधीजींनी शिक्षणाची पुढील उद्दष्ट्यिे सांगीतली -:-

१. शिक्षणामुळे व्यक्तीची स्वावलंबितता व स्वयंपूर्णता वाढते.

२.चारित्र्यसर्वधन करून व्यक्तीला शिक्षणाद्वारे सुसंस्कृत बनविणे.

३.स्वातंत्र्य, समता, सहिष्णुता, सहकार्य, त्याग या उदात्त गुणांची वाढ करणे.

४.शिक्षणाद्वारे व्यक्तीला आपल्या अधिकार व कर्तव्याची जाणीव करुन देणे.

५.शिक्षणामुळे व्यक्तीच्या हाताला काम मिळावे यासाठी औद्योगिक प्रशिक्षणाची सोय करावी. ही उद्दिष्ट्ये शिक्षणाद्वारे पूर्ण व्हावी अशी गांधींची अपेक्षा होती.

### शिक्षणाबद्दलच्या अपेक्षा :-

गांधीजींच्या मते, शिक्षण हे आदर्श, ज्ञानी व उत्साही असले पाहिजे.शिक्षकाने केवळ पोटासाठी कार्य करु नये.स्वयंसेवक कृतीने कार्य करणारा, तसेच चारित्र्यसंपन्न व विद्यार्थांच्या विकासाकडे लक्ष देणारा शिक्षक असावा अशी गांधींची अपेक्षा होती.

= नवी तालीम - नवीन शिक्षणव्यवस्था :- गांधीजींनी बालशिक्षणासंबंधी योजना तयार केली. वर्धा येथील शिक्षणतज्ज्ञांच्या समोर ती मांडली. ती अंमलात आणण्यासाठी प्रयत्न केले. यालाच 'नई तालिम' म्हणतात.

# घटक ६
## वि. दा. सावरकर


६.0 उद्दिष्ट्ये

६.१ प्रस्तावना

६.२ विषय विवेचन

६.२.१ जीवन परिचय

६.२.२ सावरकरांचे हिंदू राष्ट्रवादासंबंधीचे विचार

६.२.३ सावरकरांचे स्वातंत्र्यासंबंधी विचार

६.२.४ सावरकरांचे सैनिकीकरणाबाबतचे विचार

६.२.५ सावरकरांचे जाती विषयक विचार

६.२.६ सावरकरांची विज्ञाननिष्ठता आणि औद्योगिकीकरण

६.३ स्वंयअध्ययनासाठी प्रश्न

६.४ सारांश

६.५ सरावासाठी प्रश्न

६.६ अधिक वाचनासाठी पुस्तके


### ६.0 उद्दिष्टे :-

**या घटकाची उद्दिष्ट्ये आहेत-**

१) सावरकरांच्या राजकीय विचारांची ओळख करून घेणे.

२) सावरकरांची हिंदू राष्ट्रवादाची संकल्पना समजून घेणे.

३) सावरकरांचे आधुनिकीकरणासंबंधीचे विचार जाणून घेणे.

४) सावरकरांचे सैनिकीकरणाबाबतच्या विचारांचा अभ्यास करणे.

### ६.१ प्रस्तावना :-

भारताला स्वातंत्र्य मिळावे हे महत्त्वपूर्ण ध्येय बाळगणारे व भारताच्या स्वातंत्र्यलढयात महत्त्वपुर्ण भूमिका बजावणाऱ्या राजकीय विचारवंतात वि.दा.सावरकरांचा अभ्यास करणे

आवश्यक आहे. राष्ट्रप्रेमाने भारावलेले,देशासाठी काळ्या पाण्याची शिक्षा भोगणाऱ्या सावरकरांनी हिंदू राष्ट्रवादाला राजकीय विचारांच्या केंद्रस्थानी मानले. हिंदू राष्ट्रवाद म्हणजे काय? हिंदू कोण ? हिंदुस्थानाची निर्मिती कशी झाली ? हिंदू संघटित होण्याची आवश्यकता? हिंदुस्थान हिंदूचेच कसे ? अशा अनेक बाबींचा उलगडा सावरकरांनी आपल्या विचारात केला आहे. याच काळात देशाचे नेतृत्व अहिंसेचे पुजारी असलेले महात्मा गांधी करीत होते. सावरकरांच्या मते, शस्त्राविना स्वातंत्र्य मिळणे अशक्य आहे.त्यामुळे सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार करणाऱ्या सावरकरांनी सैनिकीकरणाबाबतचे विचार मांडले.तसेच जगाच्या स्पर्धेत टिकण्यासाठी व देशाचा जलद गतीने विकास करण्यासाठी सावरकरांनी विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन व औद्योगिकीकरणाचा स्वीकार केला.या विविध बाबींचा अभ्यास आपण या घटकात अभ्यासणार आहोत.

## ६.२ विषय विवेचन

### ६.२.१ जीवन परीचय

वि.दा. सावरकर यांचा जन्म नाशिक जिल्हयातील भगूर येथे २३ मे १८८३ रोजी व मृत्यू १६ फेब्रुवारी १९६६ रोजी झाला.त्यांच्यावर वडिलांच्या देशभक्तीचा प्रभाव होता. तसेच प्राचीन भारतीय इतिहासाचा, पुराणाचा,जोसेफ मॅझिनी, हिटलरच्या विचारांचाही प्रभाव होता. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणे हे ध्येय होते. सावरकरांनी 'अभिनव भारत' ही संघटना करुन या संघटनेच्या शाखा महाराष्ट्रात सर्वत्र स्थापन केल्या.सावरकर १९०६ मध्ये लंडनला गेले.तेथे त्यांनी '....' ची स्थापना केली. त्यामागचा हेतू होता की,

१) भारतीय विद्यार्थांना संघटित करणे

२) त्यांच्यात राष्ट्रभक्ती निर्माण करणे व त्यांना क्रांती साठी प्रवृत्त करणे.

त्यांना सहकार्य करणाऱ्यांत लाला हरदयाल, मदनलाल धिंग्रा, मॅडम मादाम कामा, सेनापती बापट इ. चा सहभाग होता.१९०९ ला लंडनला कर्झन वायलीचा खून झाला.हा खून मदनलाल धिंग्राने केला.पण याचा ठपका सावरकरांवर ठेवण्यात आला.ती केवळ सावरकरांची प्रेरणा होती अशी बातमी ब्रिटीश वर्तमानपत्राने प्रसिद्ध केली.त्यानंतर १९१० चा बॉम्ब खटला व याच काळात झालेला जॅक्सनचा खून खटला यामध्ये ब्रिटिशांनी १९१० मध्ये सावरकरांना अटक केली.या खटल्याच्या सुनावणीनंतर त्यांना दोन आरोपांखाली २५ व ५० वर्षांची (जन्मठेपेची) सक्तमजुरीची शिक्षा देण्यात आली.त्यासाठी अंदमान बेटावर त्यांची रवानगी करण्यात आली.चांगल्या वर्तणुकीमुळे १९२३ ला त्यांची सुटका झाली.नंतर त्यांना ७ वेळा हिंदू महासभेचे अध्यक्षपदासाठी निवडले गेले.हिंदूंनी संघटित व्हावे, सशस्त्र उठाव करावा, हे त्यांचे ध्येय होते.

सावरकर मुस्लीमविरोधी नव्हते.मात्र मुस्लिमांनी स्वतंत्र पाकिस्तानची मागणी केल्यामुळे ते मुस्लीम विरोधक बनले. ३० जाने.१९४८ ला गांधींची हत्या नथुराम गोडसे यांनी केली. पण सावरकरांना अटक झाली.गुन्हा सिद्ध न झाल्याने त्यांची निर्दोष सुटका झाली.मात्र या

घटनेने त्यांची मानहानी झाली.१९६२ ला भारतावर चीनने आक्रमण केले. तेव्हा भारताच्या विदेश नीतीवर व संरक्षण पद्धतीवर सावरकरांनी टीका केली. (भारतीय स्वातंत्र्याचा लढा) हा ग्रंथ त्यांनी लिहिला.

## ६.२.२ सावरकरांचे हिंदू राष्ट्रवादासंबंधीचे विचार :-

सावरकरांनी हिंदू राष्ट्रवादाला आपल्या राजकीय विचारात केंद्रस्थानी मानले.कारण हिंदू राष्ट्रवादाला बळकट करणे हा त्यांचा हेतू होता. त्याची हिंदू राष्ट्रवादासंधीची संकल्पना वैशिष्ट्य पूर्ण होती. ती पुढील प्रमाणे :-

**१.हिंदू कोण? :-**

सावरकरांनी हिंदू राष्ट्रवादाची संकल्पना मांडताना 'हिंदू कोण ? याचे स्पष्टीकरण केले. त्यांच्या मते, हिंदू शब्दाचा उगम अती प्राचीन आहे. त्यांचा संबंध कोणत्याही धर्मग्रंथाशी नाही.हा संदर्भ भौगोलिक व सांस्कृतिक घटकांशी निगडित आहे.विशिष्ट प्रदेशात जन्म घेतलेल्या आणि विशिष्ट धर्म व संस्कृतीशी बांधल्या गेलेल्या लोकांमध्ये हिंदुत्वाची भावना निर्माण होते.ही भावना व्यापक स्वरूपाची आहे.त्यात सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक बाबींचा समावेश होतो.

**२.हिंदुस्थान शब्दाची निर्मिती :-**

प्राचिन काळी आर्यलोक भारतात आले.ते सिंधु नदीच्या काठी राहू लागले. नंतरते इतरत्र पसरले. पर्शियन लोक त्यांना 'सिंधु' म्हणत काळातील ह्या ओघात 'स' चा 'ह'झाला. म्हणून सिंधुस्थानचा हिंदुस्थान बनला म्हणून सिंधुपासून समुद्रापर्यंत पसरलेल्या भारताला जे लोक आपली पितृभूमी किंवा पूर्वजांची भूमी किंवा पूण्यभूमी मानतात. तेच लोक हिंदू असू शकतात.तसेच या पूण्यभूमीत ज्या धर्माची निर्मिती झाली. किंवा धर्म संस्थापक येथे जन्माला आले, तेच केवळ हिंदू असू शकतात. असा विचार सावरकरांनी मांडला आहे.

**३.हिंदूत्व ही संकल्पना हिंदू धर्मापेक्षा व्यापक :-**

हिंदुत्व आणि धर्म हे दोन्ही शब्द वेगळे आहेत.हिंदुत्वात वंशाभिमान, पितृभूमीबद्दल प्रेम, पुण्यभूमीची भावना व सांस्कृतिक अभिमान असतो. हिंदुधर्मात जैन, बौद्ध, शिख यांचा समावेश होतो. मुस्लीम किंवा ख्रिस्ती धर्माचा हिंदू धर्मांत समावेश होऊ शकत नाही. कारण या धर्माचे धर्मसंस्थापक या भूमीत जन्माला आलेले नाही. त्यांची पितृभूमी किंवा पुण्यभूमी हिंदुस्थानात नाही.तसे ते मानतही नाही. तसेच त्यांची संस्कृतीही वेगळी आहे.म्हणून ते हिंदू होऊ शकत नाही. हिंदू लोकांना केवळ आपल्या प्रदेशावर निष्ठा आहे.कारण ही त्यांची पुण्यभूमी किंवा पितृभूमी आहे.मात्र मुस्लीम धर्मीयांची निष्ठा या प्रदेशावर नाही.कारण त्यांचे धर्म संस्थापक या भूमीत जन्माला आलेले नाहीत.म्हणून ते हज यात्रेसाठी हिंदुस्थानच्या बाहेर जातात.अशा या लोकांची निष्ठा हिंदुस्थानावर असूच शकत नाही.म्हणून स्वातंत्र्यासाठी मुस्लीम धर्मीयांची मदत घेणे आवश्यक नाही.असे सावरकरांचे मत होते.

सावरकरमुस्लीमविरोधी नव्हते. फक्त स्वातंत्र्यासाठी मुस्लीमांचे पाठिंबा घेणे त्यांना मान्य नव्हते. सावरकरांच्या मते राष्ट्रवादाचे चार मूलभूत घटक आहेत.ते १) भूप्रदेश २) संस्कृती ३) भाषा ४) समाजइतिहास व परंपरा होत.

### ➢ हिंदू राष्ट्रवादातील दोष :–

१) **सार्वत्रिक विचार नाही :–** सावरकरांनी पितृभूमी, पुण्यभूमी, वंश या आधारावर राष्ट्रीयत्वाचे निकष लावले. मात्र त्यांचा हा विचार सर्व देशांना सर्व काळात उपयोगी पडणारा नाही.

२) **संकुचित कल्पना:–** सावरकरांच्या हिंदु राष्ट्रवादाच्या कल्पनेमुळे हिंदुस्थानातील मुस्लीम, ख्रिश्चन, पारशी इ. धर्मांच्या अल्पसंख्याक व्यक्तीला राष्ट्रीय प्रवाहात आणणे, त्यांचे हित जोपासणे सावरकरांना मान्य नव्हते. कारण त्यांचे धर्म संस्थापक आणि पूर्वज या भूमीत जन्माला आलेले नाहीत. म्हणून ते हिंदुस्तानचे होऊ शकत नाही. हा सावरकरांचा संकुचित दृष्टीकोन होता.

३) **ताठर धोरण :–** सावरकर हे मुस्लीमविरोधी नव्हते कारण सावरकरांचे काही मुस्लीम मित्र होते. मात्र मुस्लीम धर्मीयांमध्ये सक्तीने धर्मांतर करण्याची पद्धत रूढ झाली होती. तसेच मुस्लिमांची लोकसंख्या वाढत होती. त्यामुळे मुस्लिमांची वाढती लोकसंख्या देशहिताच्या दृष्टीने धोक्याची आहे. म्हणून सावरकरांनी मुस्लीम धर्मीयांना विरोध केला. ते कट्टर हिंदुत्ववादी बनले. त्यांची ही कट्टरता म्हणजेच हिंदु धर्माविषयीचे ताठर धोरण अनेकांना न पटल्यामुळे त्यांच्यावर टीका केली गेली.

४) **भारतात एकात्मतेचा अभाव :–** भारतीय जनता ही विविधतेने नटलेली आहे. त्यामुळे त्यांच्यात एकात्मता साधणे कठीण आहे. म्हणून सावरकरांनी जनतेला संघटित करण्यासाठी हिंदुत्वाचा आधार घेतला. या त्याच्या विचारांमध्ये सांप्रदायिकतेचा असलेला भाव हा चुकीचा असल्याची टीका केली गेली.

५) **धार्मिक एकतेचा अभाव :–** सावरकरांच्या मते, सर्व हिंदू धर्मीयांनी एकत्र यावे. मात्र हेही शक्य नाही असे काही व्यक्तींचे मत होते. कारण हिंदू धर्मात अनेक पंथ, उपपंथ आहेत. त्यातही काही व्यक्ती आस्तिक तर काही नास्तिक आहेत. काही धर्मावर विश्वास ठेवणारे, तर काही धर्माला न मानणारे आहेत. अशा पार्श्वभूमीत हिंदू लोक संघटित होऊ शकणार नाहीत. म्हणून सावरकरांची हिंदुत्वाची संकल्पना योग्य नाही. अशी टीका केली गेली.

केवळ इंग्रजांच्या गुलामगिरीतून भारताला मुक्त करणे. या राजकीय आकांक्षेतून व्यक्ती धर्म, पंथ, संस्कृती, इतिहास इ. संबंधीचे भेद विसरून संघटित होऊ शकते. असे टीकाकारांनी आपले मत व्यक्त केले.

## ६.२.३ सावरकरांचे स्वातंत्र्यासंबंधी विचार :–

सावरकरांच्या मते, स्वातंत्र्य हा व्यक्तीचा नैसर्गिक घटक आहे. या स्वातंत्र्यामुळे

व्यक्ती आपला सर्वांगीण विकास करू शकते.यासाठी स्वातंत्र्याचे अपहरण करणाऱ्यास शिक्षा झाली पाहिजे.जसे व्यक्तीला स्वातंत्र्य आवश्यक आहे.तसे स्वातंत्र्य राष्ट्रासाठी आवश्यक आहे.कारण जोपर्यंत राष्ट्राला स्वातंत्र्य मिळत नाही. तोपर्यंत राष्ट्राचा विकास होणे शक्य नाही.

**स्वातंत्र्याची व्याख्या -:**

सावरकरांच्यामते, वंश, कुळ, जाती, प्रदेश व भाषेवर आधारित अभिमान न बाळगता संपूर्ण मानवजातीचे एकीकरण म्हणजे आदर्श स्वातंत्र्य.

स्वातंत्र्य हे मानवतेच्या कल्याणासाठी आवश्यक आहे. तसेच ते मानवतेच्या कल्याणाचे साधन आहे.राष्ट्रीय स्वातंत्र्यापर्यंत पोहचण्याची ही पहिली पायरी आहे.

सावरकरांच्या राष्ट्रवादी विचारात विशिष्ट भूप्रदेश असलेल्या लोकांमध्ये भाषा, संस्कृती, इतिहास परंपरा इ.च्या एकतेमुळे हे राष्ट्र निर्माण होऊ शकते. मात्र संस्कृती व इतिहास वेगळा झाल्यास ते एकत्र येणे शक्य नाही.म्हणून सावरकरांनी एकतेच्या बळावर स्वातंत्र्य मिळण्यावर भर दिला. स्वातंत्र्य हे मानवाच्या कल्याणाचे साधन आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्यापर्यंत पोहचण्याची ही पहिली पायरी आहे.असे सावरकरांचे मत होते.

सावरकरांच्या मते, स्वातंत्र्य मिळविणे सोपे असते. पण ते टिकविणे सोपे नसते.म्हणून स्वातंत्र्य प्राप्तीच्या काळात अराजकता निर्माण करणाऱ्या प्रवृत्तीला विरोध केला नाही.स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर लगेचच सुराज्य निर्माण होईल असे नाही.परंतु पोपटाला सोन्याचा पिंजऱ्यात ठेवून कितीही चांगले खाऊ घातले तरी तो आनंदी राहू शकत नाही. त्यांच प्रमाणे परकीय सत्ता कितीही चांगली असली तरी ती उपयोगाची नाही. म्हणूनच सावरकरांनी स्वातंत्र्यासाठी लढा दिला.

गांधीजी अहिंसावादी होते. गांधीजींच्या मते,साध्य जितके चांगले आहे तितके साधनही चांगले असावयास हवे.परंतु सावरकरांच्यामते, ध्येय किंवा साध्य चांगले असेल तर साधनाचा विचार करण्याची गरज नाही.भारतीय लोकांचे साध्य स्वातंत्र्य हे आहे. या साध्य प्राप्तीसाठी हिंसा, अहिंसा किंवा नैतिक अनैतिकतेचा विचार करणे योग्य नाही असे सावरकरांचे मत होते. कारण शांततेच्या मार्गाने मिळविलेले स्वातंत्र्य हे उपयोगाचे नसते. म्हणून समाजातील सर्व व्यक्तींनी लष्करी शिक्षण घ्यावे, ब्रिटिशांविरूद्ध लढावे.कारण स्वातंत्र्य हे भिक्षांदेहीच्या मार्गाने मिळत नसते. त्यासाठी कटकारस्थान,दहशत निर्माण करावी लागते असे सावरकरांचे मत होते.

**सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार -**

स्वातंत्र्यासाठी सावरकरांनी सशस्त्र क्रांतीवर भर दिला. निसर्गातील तीव्र स्पर्धेत टिकण्यासाठी, देशाच्या संरक्षणासाठी व आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आपले अस्तित्व टिकविण्यासाठी शस्त्राचा वापर करणे आवश्यक आहे असा विचार सावरकरांनी मांडला. त्यासाठी इतिहासाचे दाखले दिले.उदा.बौध्द तत्त्वज्ञानाच्या प्रभावामुळे 'हून' व 'शक' राजा आक्रमणाला

तोंड देऊ शकले नाही. मात्र शिवाजी महाराजांनी अफजलखानाचा वध केला. हिंसेचे उत्तर हिंसेने दिले.वास्तविक ही हिंसा देशाच्या स्वातंत्र्यासाठी म्हणजेच उदात्त ध्येयासाठी असेल तर ती हिंसा असूच शकत नाही असे सावरकरांचे मत होते.

मात्र स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाच्या संरक्षणासाठी सशस्त्र उठावाची गरज नाही असे विचार सावरकरांचे होते.कारण स्वातंत्र्यानंतर परिस्थिती बदलते.केवळ देशाच्या संरक्षणासाठी शस्त्र निर्माण करण्यात यावी.

**लोकशाहीला प्राधान्य –**

सावरकरांनी लोकशाहीला प्राधान्य दिले. सार्वजनिक पदाच्या बाबतीत जात,धर्म, वंश इ. आधारावर भेदभाव करू नये. तसेच सर्व प्रौढांना मतदानाचा अधिकार असावा. राष्ट्र उभारणीसाठी सावरकरांनी सांगीतलेली तत्त्वे पुढीलप्रमाणे :

१.कोणत्याही राज्याचा पाया सैन्यशक्ती असते. म्हणून राज्याने सैन्यात वाढ करावी.

२.सैन्य शक्तीप्रमाणेच धर्मसत्ता वाढविणे.

३.धर्मांधतेमुळे राष्ट्रीयत्वाचा नाश झाला म्हणून धर्म व राष्ट्र हे एकरुप असावे.

४.देशाच्या संरक्षणासाठी सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार करावा.

अशाप्रकारे सावरकरांनी आपल्या राष्ट्रवादी विचारात वरील बाबींना महत्त्व दिले होते.

## ६.२.४ सावरकरांचे सैनिकीकरणाबाबतचे विचार :–

सावरकर सशस्त्र क्रांतीचे पुरस्कर्ते होते. शस्त्राविना राज्य मिळणार नाही असे त्यांना वाटत होते. शस्त्रसंपन्न इंग्लंडशी नि:शस्त्रीकरणाच्या मार्गाने म्हणजेच गांधीजींच्या अहिंसेच्या मार्गाने लढा देणे शक्य नाही. म्हणून सावरकरांनी सैनिकीकरणाबाबतचे विचार मांडले. सावरकरांच्या मते, पुढील बाबींसाठी सैनिकीकरण आवश्यक आहे.

१) **देशाच्या स्थैर्यासाठी :–** सावरकरांच्या मते, देशाचे स्थैर्य हे सुरक्षिततेवर व एकात्मतेवर अवलंबून असते. देशाच्या संरक्षणासाठी सुनियोजित व सुसज्य अशी सैन्य व्यवस्था असावी असे सावरकरांचे मत होते.

२) **परकीय आक्रमणाचा धोका टाळण्यासाठी :–** सावरकरांच्या मते, ‘बळी तो कान पिळी’ किंवा ‘मत्स्य न्याय’ हा निसर्गाचा नियम आहे. याचा अर्थ जे बलशाली असतात तेच टिकू शकतात. हा निसर्गाचा नियम आहे. तेव्हा अहिंसेचा स्वीकार यासारखे मोठे आदर्श डोळ्यासमोर ठेवून चालत नाही. वास्तवतेचे भान ठेवायला हवे. म्हणून परकीय आक्रमणाला तोंड देण्यासाठी सैनिकीकरणाची आवश्यकता आहे असे सावरकरांचे मत होते.

३) **स्वातंत्र्य प्राप्तीसाठी :–** ब्रिटिश हे भारताचे शत्रू आहेत. त्यांना केवळ त्याचा स्वार्थ साधायचा आहे. अशावेळी भारताने मवाळ किंवा अहिंसेच्या मार्गावर

विश्वास ठेवणे योग्य नाही. त्यासाठी भारतातील जनतेने संघटित व्हावे. सैनिकीशिक्षण घ्यावे. सैन्यात प्रवेश करावा. युद्धाचे डावपेच शिकावे. अशाप्रकारे जास्तीत जास्त व्यक्तिंनी सैनिकीशिक्षण घेऊन देशाचे सैन्य वाढवावे व स्वातंत्र्य प्राप्तीसाठी ब्रिटीशांच्या विरूद्ध लढा दयावा.

४) **आतंरराष्ट्रीय क्षेत्रातील प्रतिष्ठा वाढविण्यासाठी :-** संपूर्ण जगात प्रतिष्ठा वाढविण्याचा दृष्टीने सैन्य शक्तीत वाढ करायला हवी. भारतात मोठ्या प्रमाणावर सैन्य असल्यास परकीय राष्ट्रांमध्ये भारताविषयी आदरयुक्त भीती असेल. त्यामुळे आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आपल्या राष्ट्राची प्रतिष्ठा उंचावू शकेल. यासाठी सैनिकीकरणाची आवश्यकता आहे हे सावरकरांनी सांगितले.

५) **सैनिकी शिक्षणाचा प्रचार :-** भारतीय तरुणांमध्ये नवचैतन्य निर्माण व्हावे यासाठी शाळा व महाविद्यालयांतून सैनिकी शिक्षण देण्यात यावे. असे सावरकरांचे मत होते. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणातून त्यांनी 'लेखण्या सोडा व तलवार घ्या' असा संदेश दिला. अशाप्रकारे भारतीय स्वातंत्र्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून सावरकरकांनी सैनिकीकरणास प्राधान्य दिले. तसेच मिळालेले स्वातंत्र्य टिकवून ठेवण्यासाठी सैनिकीकरणाची आवश्यकता स्पष्ट केली.

### ➢ सावरकरांच्या सैनिकीकरणावरील आक्षेप

१) **आक्रमक धोरणाचा स्वीकार :-** सावरकरांनी सैनिकीकरणावर भर दिला. मात्र सैन्याचे प्रमाण वाढल्यास देशात अराजकता निर्माण होऊ शकते. देशातील शांतता धोक्यात येऊ शकेल. अशी टीका सावरकरांच्या सैनिकीकरणासंबंधी विचारावर करण्यात आली.

२) **हिंदु-मुस्लिम तणाववाढीची शक्यता :-** सावरकरांनी हिंदू राष्ट्रवादाची कल्पना मांडली. हिंदूंनी सैन्यात प्रवेश करावा. लष्करी शिक्षण घ्यावे. असा आग्रह सावरकरांनी धरल्यामुळे हिंदू आणि मुस्लीम यांच्यात तणाव वाढण्याची भीती टिकाकारांनी व्यक्त केली.

सावरकरांचा हा विचार अहिंसेच्या विचाराचा पुरस्कार करणाऱ्या नेत्यांना मान्य नव्हता.देशहितासाठी देशाच्या स्वातंत्र्यासाठी, देशाचे सामर्थ्य वाढविण्यासाठी, देशाची सैन्यशक्ती वाढविण्यासाठी व आंतरराष्ट्रीय क्षेत्रात प्रतिष्ठा वाढवण्यासाठी देशाची सैन्यशक्ती वाढवण्याची गरज सावरकरांनी मांडली.त्यामुळे समाजामध्ये काही प्रतिक्रिया उमटल्या.

## ६.२.५ सावरकरांचे जातीविषयक विचार :-

जातीव्यवस्था हा हिंदुसमाजाचा अविभाज्य घटक आहे. जातीमुळे समाजाचे विभाजन झाले. जात ही जन्मावर आधारीत आहे कर्मावर नाही.

सावरकरांच्या मते, जातीव्यवस्था निर्माण झाल्यामुळे, श्रेष्ठ व कनिष्ठता निर्माण झाल्यामुळे समाजात अव्यवस्था निर्माण झाली आहे. जाती व्यवस्थेला धर्माचा आधार देण्यात आला. आंतरजातीय विवाह किंवा रोटी बेटी व्यवहार मान्य नव्हते. जातीव्यवस्थेचे खुळ लोकांच्या मनात कायम आहे. उच्च वर्गीयांकडून कनिष्ठ वर्गाचे होणारे शोषण तसेच कनिष्ठ म्हणून दिली जाणारी हीन वागणूक सावरकरांनी स्वत: पाहिली आहे.

**ट जातीव्यवस्थेचे परिणाम :-**

त्या काळात काही लोकांनी जातीत दिल्या जाणाऱ्या हीन वागणूकीमुळे धर्मांतर केले.पूर्वी हिंदूंनी मुस्लिमांसोबत जेवण केले, की त्याला जातीबाहेर काढले जाई.त्यातील अनेकांनी मुस्लीम धर्मात प्रवेश केला.त्यामुळे मुस्लिमांची संख्या वाढली.मात्र सावरकरांना ही जातीव्यवस्था व त्यातील रूढी, परंपरा मान्य नव्हत्या.

सावरकरांच्या मते, धर्म म्हणजे जातीव्यवस्था नाही.धर्म शाश्वत असतो.त्यात समाजाचे नियम असतात.मात्र जातीव्यवस्था धर्मावर आधारित नसते.ती जन्मावर आधारित आहे.सावरकरांच्या मते, व्यक्तीची जात जन्माच्या आधारावर न ठरविता कर्माच्या अधारावर ठरली जावी म्हणून सावरकरांनी जातीव्यवस्थेला विरोध केला. हिंदू धर्मात जातीच्या अनेक पोटजाती निर्माण झाल्या, म्हणून हिंदू समाज खंडित झाला.यासाठी सावरकरांनी जातीव्यवस्थेतील बंधने ओळखून त्यावर सात बंधने घातली.

१) रोटी बंदीला सक्त विरोध

२) आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन

३) व्यवसायावर कृत्रिम बंधने नको.

४) अस्पृश्यता नष्ट व्हावी.

५) जलप्रवास निषिद्ध मानू नये.

६) स्वधर्म स्वीकारणाऱ्यास मान्यता.

७) वेदांचा अभ्यास सर्वांसाठी असावा.

अशाप्रकारे हिंदू राष्ट्राच्या विकासासाठी सावरकरांनी जातीव्यवस्थेसंबंधी विचार मांडले. जातीव्यवस्था एक मानसिक रोग आहे. हा रोग नष्ट करून हिंदूंचे संघटन करावे. यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न पुढीलप्रमाणे :-

(१) अस्पृश्य मुलांना सर्व मुलांबरोबर एकत्र बसण्याची शिफारस केली.

(२) विविध जातीतील हळदी-कुंकवाचा कार्यक्रम नाकारू नये.

(३) रत्नागिरीला पतितपावन मंदिर बांधले.

(४) विविध जातीतील लोकांचे सहभोजन कार्यक्रम घडवून आणले.

अशाप्रकारे सावरकरांनी हिंदू राष्ट्रनिर्मितीसाठी जातीव्यवस्था नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

## ६.२.६ सावरकरांची विज्ञाननिष्ठता आणि औद्योगिकीकरण :–

हिंदू समाजातील अनिष्ट प्रथा नष्ट करून अखंड भारत निर्माण करण्यासाठी सावरकरांनी विज्ञाननिष्ठ दृष्टीकोनाचा स्वीकार केला.

भारतीय परंपरा :–

१) यंत्राला महत्त्व, २) निसर्गाची पूजा, ३) गाय हे हिंदुंचे पवित्र स्थान

अशा काही चांगल्या प्रथा सावरकरांना मान्य होत्या.मात्र समुद्र ओलांडणे म्हणजे पाप लागते.स्त्री यांसंबंधीचा दुय्यम लेखण्याचा दृष्टीकोन इ.बाबी सावरकरांना मान्य नव्हत्या.या अनिष्ट रूढी, परंपरा नष्ट करून विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन स्वीकारावा यासाठी प्रयत्न केले. विज्ञाननिष्ठ दृष्टीकोनामुळे भारताच्या प्रगतीसाठी यंत्रावर भर देण्याचा विचार त्यांनी स्पष्ट केला.

सावरकर सुधारणावादी होते. त्यांनी देशाच्या आर्थिक सुधारणेसाठी औद्योगिकीकरणाला प्राधान्य दिले. त्यांनी मांडलेला दृष्टीकोन पुढीलप्रमाणे :–

**१) शास्त्रीय दृष्टीकोनाचा स्वीकार :–** सावरकरांच्या मते, पाश्चात्त्य राष्ट्रांनी विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन स्वीकारल्यामुळे त्यांची प्रगती झाली. म्हणून भारतीयांनी अनिष्ट रूढी, परंपरेचा त्याग करून नवीन दृष्टीकोन स्वीकारावा असा त्यांचा आग्रह होता.

**२) यंत्रयुगाचे समर्थन :–** सावरकरांच्या मते, पाश्चात्य राष्ट्रांनी २०० वर्षापूर्वी यंत्राचे समर्थन केले. यंत्राच्या वापरामुळे वैज्ञानिक व व्यापारी क्षेत्रात भरीव प्रगती केली. मात्र भारत देश ब्रिटिशांपेक्षा २०० वर्षे मागे आहे. तेव्हा हिंदुस्थानाच्या प्रगतीसाठी आपणही यंत्राचा स्वीकार करावा. असे सावरकरांचे मत होईल.

**३) विज्ञानाचे नियंत्रण :–** सावरकरांच्या मते, धार्मिक क्षेत्रातील अंधश्रद्धा व सामाजिक व आर्थिक क्षेत्रातील अनिष्ट रूढी, परंपरा नष्ट करण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोनाचा स्वीकार करावा. त्याच प्रमाणे देशात औद्योगिकीकरण करण्यात यावे. मोठ्या कारखान्यांमुळे कमीत कमी वेळेत व कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त वस्तूंचे उत्पादन करावे, देशाच्या प्रगतीला हातभार लावावा. त्यामुळे मानव जातीचा विकास होईल, याचाच अर्थ 'यंत्र हे मानवजातीला शाप नसून एक प्रकारे वरदान आहेत.' असे विचार सावरकरांनी मांडले.

---

**= विश्वराज्याची संकल्पना :–**

---

सावरकर राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते होते.त्यांचे उद्दिष्ट केवळ हिंदू राष्ट्र नव्हते. संपूर्ण मानवजातीला एकत्र आणणे. विश्वराज्य निर्माण करणे हे त्यांचे ध्येय होते. त्यांच्या मते, जगातील सर्व मानव जात एक असून या मानवजातीचे संरक्षण करणे हे जागतिक सरकारचे ध्येय असावे. अशाप्रकारे सावरकरांनी आंतरराष्ट्रवादाचाही विचार केला. स्वत:चा बळी न देता आंतरराष्ट्रवादाचा स्वीकार केला. पारतंत्र्यात मरण आल्यापेक्षा स्वातंत्र्यासाठी मरण बरे असे विचार त्यांनी मांडले. अशाप्रकारे देशाच्या प्रगतीचा ध्यास घेतलेले सावरकर यांचे कार्य वाखाणजोगे आहे.

## ६.३ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न :-

१) सावरकरांच्या मते हिंदूकोण ?

२) सावरकरांनी स्थापन केलेली संघटना कोणती ?

३) सावरकरांनी स्वातंत्र्याची केलेली व्याख्या सांगा.

४) राष्ट्रउभारणीबाबत सावरकरांनी सांगितलेली तत्वे कोणती ?

५) सावरकरांनी सैनिकीकरणाचा स्वीकार का केला ?

६) जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी सावरकरांनी केलेले प्रयत्न सांगा.

७) औद्योगिकीकरणाला प्राधान्य देण्यामागील सावरकरांचा हेतू काय होता ?

## ६.४ सारांश :-

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या राष्ट्रवादी भावनेतून वि.दा. सावरकर यांनी क्रांतिकारी मार्गाचा स्वीकार केला.मुस्लिमांच्या स्वतंत्र्य पाकिस्तानच्या मागणीमुळे त्यांनी हिंदुत्ववादी विचार मांडले.त्यांच्या राजकीय विचाराच्या केंद्रस्थानी हिंदू राष्ट्रवादी विचार होता. यात हिंदू कोणाला म्हणावे ? हिंदुस्थान शब्दाची निर्मिती कशी झाली ? आदी विचार त्यांनी स्पष्ट केलेले आपण अभ्यासले. सावरकरांच्या मते , स्वातंत्र्य हा व्यक्तीचा नैसर्गिक हक्क आहे. त्याशिवाय व्यक्ती आपला सर्वांगीण विकास करू शकत नाही.स्वातंत्र मिळविण्यापेक्षा स्वातंत्र्य टिकविणे कठीण आहे.सावरकरांनी साध्याला साधनापेक्षा अधिक महत्त्व दिले.स्वातंत्र्यासाठी सशस्त्र उठावाची गरज असून स्वातंत्र्यानंतर परीस्थिती बदलल्याने सशस्त्र उठावाची गरज नाही.केवळ देशाच्या संरक्षणासाठी शस्त्र निर्माण करण्यात यावे असे त्यांनी सांगितले. लोकशाहीवर विश्वास असलेल्या सावरकरांनी जात,धर्म, वंश या आधारावर केल्या जाणाऱ्या भेदभावाला विरोध केला. सावरकरांच्या मते, शस्त्राविना राज्य मिळणार नाही.म्हणून त्यांनी सैनिकीबाबत विचार मांडले ते आपण यात अभ्यासले आहेत. स्वातंत्र्यासाठी व देशाचे सामर्थ्य वाढविण्यासाठी सैन्य शक्ती वाढवावी असे त्यांचे मत होते.

भारतीय समाजाचा अविभाज्य घटक असलेल्या जाती व्यवस्थेला विरोध केला. जात ही जन्मानुसार न ठरविता कर्मानुसार ठरवावी असे त्यांचे मत होते. तसेच भारतातील अनिष्ट रूढी, परंपरा नष्ट व्हाव्यात यासाठी त्यांनी विज्ञाननिष्ठ दृष्टी कोनाचा स्वीकार केला.सुधारणावादी असलेल्या सावरकरांनी औद्योगिकीकरणाला प्राधान्य दिले.

## ६.५ सरावासाठी प्रश्न :-

(१) वि.दा.सावरकर यांचे हिंदू राष्ट्रवादासंबंधीचे विचार स्पष्ट करा.

(२)सावरकरांचे स्वातंत्र्यासंबंधीचे विचार सांगा.

(३)सावरकरांनी सशस्त्र क्रांतीचा मार्ग का स्वीकारला ?



(४)सावरकरांचे सैनिकीकरणाबाबतचे विचार विशद करा.

(५)सावरकरांच्या जातीविषयक विचारांचा आढावा घ्या.

# घटक ७

## डॉ.आंबेडकर

७.० उद्दिष्टे

७.१ प्रास्ताविक

७.२ विषय विवेचन

    ७.२.१ परिचय

    ७.२.२ जातीविषयक डॉ. आंबेडकरांचे विचार

        १) भारतातील जातींचे स्वरूप

        २) डॉ. आंबेडकरांच्या मते जातीनिर्मूलनाचे मार्ग

    ७.२.३ डॉ. आंबेडकरांचे सामाजिक लोकशाही विषयक विचार

        १) डॉ. आंबेडकरांची लोकशाहीबाबत मते

        २) डॉ. आंबेडकरांचा सामाजिक लोकशाहीविषयक दृष्टिकोन

        ३) सामाजिक लोकशाहीची वैशिष्ट्ये

    ७.२.४ डॉ. आंबेडकरांचे राज्य समाजवाद विषयी विचार

        १) राज्य समाजवादाची वैशिष्ट्ये

    ७.२.५ डॉ. आंबेडकरांचे मानसवादासंबंधी विचार

        १) डॉ. आंबेडकर आणि कार्ल मार्क्स यांचे विचारातील फरक

        २) डॉ. आंबेडकर आणि कार्ल मार्क्स यांचे विचारातील साम्य

        ३) मानसवादास पर्याय– डॉ. आंबेडकरांची सामाजिक लोकशाही

    ७.२.६ डॉ. आंबेडकरांचा घटनावाद

        १) घटनावादाचा अर्थ

        २) घटनावादाची वैशिष्ट्ये

७.३ महत्त्वाचे शब्द/संज्ञा

७.४ सारांश

७.५ संदर्भ सूची

## ७.00 उद्दिष्ट :-

या घटकामध्ये आपण डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचे राजकीय विचार कोणत्या स्वरूपाचे आहेत याचा अभ्यास करणार आहोत. या घटकात डॉ. आंबेडकरांची विचार शैली ही संपूर्ण भारताच्या समाजव्यवस्थेच्या उन्नती करता किती उपयुक्त होती आणि आहे हे अभ्यासल्यानंतर काही बाबींचे महत्त्व समजून येते. ती पुढीलप्रमाणे-

१) भारतातील जातीय व्यवस्था ही सामाजिक पायावर उभी आहे का, राजधानीद्वारा तिचे निर्मूलन कितपत झाले आहे याबाबत त्यांचे विचार समजून घेता येईल.

२) सामाजिक लोकशाहीत सामाजिक बंधनापासून मुक्त अशा सामाजिक रचना निर्माण करणे, माणसे निसर्गतः विषम असतात का? जातीकडे निर्मूलनातून संबंधित लोकशाही उभारतांना सामाजिक लोकशाहीची भारतीय समाजव्यवस्थेस गरज का ? याचा बोध घेणे शक्य होईल.

३) संसदीय लोकशाहीचा राज्य समाजवादाशी मेळ घातला तर त्या परस्परपूरक कशा ठरू शकतात ह्या विषयी रोजगार, भिती, टंचाई इ. सारख्या समस्यांवर शासनास उपाय शोधता येतो का याचे अवलोकन करता येईल.

४) मावळवादात व्यक्ती स्वातंत्र्याचा लोप होऊ शकतो मात्र राज्यघटना निर्मितींना व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी लोकशाही व्यवस्थाच संधी देऊ शकते याबाबत आंबेडकरांची मते लक्षात घेता येतील.

५) स्वातंत्र्य, समता व बंधुता यांवर आधारित राजघटनेची मूल्ये घटनावादातून स्पष्ट करता येईल.

## ७.१ प्रास्ताविक :-

डॉ. भीमराव आंबेडर यांनी मांडलेले भारतीय जातीसंस्थ बाबतचे स्वरूप, सामाजिक लोकशाही बाबतची मते, भारताचा विकास हा सर्वांगीण होण्यासाठी जाती निर्मूलनासाठी राज्यसमाजवाद, दारिद्र्य, भीती, विषमता नाहीशी करावयाची असेल तर कार्ल मार्क्सचा समाजवाद न घेता लोकशाहीचा स्वीकार करण्यासाठी मार्क्सवादावरील टीका, तसेच राज्यकारभार करण्यासाठी स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या तीन तत्त्वांना महत्त्व देणारे संकल्पनांची ओळख करून देण्याचा या घटकात प्रयत्न आहे. विशिष्ट थोर महा पुरूषांचा राजकीय विचार समजावून घेताना तत्कालीन परिस्थितीसाठी जीवनपरिचय देऊन त्यांच्या संकल्पना लक्षात येतात. फुले, शाहू, आंबेडकर यांनी केलेले सामाजिक, राजकीय कार्य पाहता आंबेडकरांना जाती निर्मूलनाबाबत घटनेद्वारे राज्यसमाजवाद त्यांना आणता आला नाही. मात्र यात नवीन विचार समाविष्ट होऊ शकतील याबाबत मते निर्माण झाली पाहिजे.

नागरिकांमध्ये याबाबत राजकीय जनजागृती निर्माण झाली पाहिजे. भारतीय राजकीय विचारात राष्ट्रवाद, आधुनिकता, धर्मनिरपेक्षता, उदारमतवाद इ.संकल्पनांचा समावेश होत असताना यात अडसर ठरणाऱ्या जात, वर्ग, अस्पृश्यता, चातुर्वण्यव्यवस्था या घटकांचा विचार डॉ. आंबेडकरांनी कोणत्या प्रकारे मांडला याची ओळख या घटकातून आढळते. समस्त मानवी हक्कांची होऊ नये यांसाठी घटनावादातून संसदीय लोकशाहीच्या मार्गाबरोबर सामाजिक लोकशाही महत्त्वपुर्ण आहे हे राजकीय संकल्पनेतून दिसते. प्रस्तुत घटकात अल्पसंख्यांकांचे अधिकार, अस्पृश्यांच्या संरक्षण विषयक बाबतची मते मांडताना डॉ. आंबेडकरांचे पूर्ण स्वप्न साकार झालेले दिसत नाही. त्यांच्या मते तत्कालीन अस्पृश्यांची सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक अवस्था अन्य अल्पसंख्यांक व सामान्य नागरिकांपेक्षा इतकी निकृष्ट आहे की अन्य नागरिकांना मिळणारे संरक्षण तर त्यांना मिळायलाच हवे शिवाय बहुसंख्याकांच्या अन्याय व अत्याचारांपासून संरक्षण मिळविण्याकरिता त्यांना खास तरतुदीची आवश्यकता आहे. डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेली सामाजिक लोकशाही सामान्य जनतेच्या हाती गेली आहे का? दलित समाजावरील अत्याचाराचे प्रश्न कमी झाले आहेत का? संपूर्ण वंचित, उपेक्षित, दलित, स्त्री-पुरुष यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी समतेवर आधारित राजकीय व्यवस्था निर्माण होण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी मांडलेल्या या घटकात दिलेल्या संकल्पनातून प्रस्तुत घटकाचा उपयोग होऊन यावर समता -बंधुभाव प्रमिते तयार झाली पाहिजे.

## ७.२ विषय विवेचन :-

### ७.२.१ परिचय :-

भारत हा थोर पुरुषांचा देश आहे. भारतात अनेक थोर विचारवंत, महान विभूतींचा जन्म झाला आहे. अशा अनेक महापुरुषांपैकी ज्यांनी पुढे भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून ओळख संपूर्ण भारतीयांनी बाळगली त्यात डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचे नाव घेता येते. त्यांनी आयुष्यभर उत्तम समाजरचनेसाठी उत्तम मानवी मूल्यांची जी गरज असते तसे झाल्यास जातीची उतरंड आपोआप नष्ट होईल. हे सत्य जाणल्यामुळे विषमता नष्ट करून समाजजागृतीसाठी अविरत प्रयत्न केले. बाबासाहेब यांचे वडील रामजीबाबा लष्करात सुभेदार होते. मध्य प्रदेशच्या महू येथील ते लष्करी फलटणीत असताना बाबासाहेबांचा जन्म झाला ते साल होते १४ एप्रिल १९९१ होय. प्रत्येक फलटणीत सैनिकांच्या मुलामुलींसाठी दिवसाच्या शाळा व प्रौढांसाठी रात्र शाळा चालविल्या जात. शिक्षणाचे महत्त्व माहीत असलेल्या वडिलांनी मुलांच्या शिक्षणाबाबत कोणतीही तडजोड स्वीकारली नाही. बाबासाहेबांचे प्राथमिक शिक्षण दापोली येथे झाले. माध्यमिक शिक्षण साताऱ्याला झाले. १९०७ मध्ये मॅट्रिक परीक्षा,१९१० मध्ये इंटरमिजिएट परीक्षा व १९१२ मध्ये बी.ए. परीक्षा ते उत्तीर्ण झाले. रमाबाईंशी त्यांचा विवाह याच काळात झाला.

भीमराव म्हणजेच बाबासाहेब यांच्या जीवनात जी कलाटणी मिळाली ती मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर मुंबईत जो सत्कार करण्यात आला त्यात मुख्याध्यापक श्री. कृष्णाजी अर्जुनराव केळसकर यांनी भिमरावांना दिलेले 'बुद्धचरित्र' हे बक्षीस म्हणून दिलेले

पुस्तक होय. तसेच रमाबाई व घरातील इतरांच्या पाठिंब्याने ज्ञानप्राप्तीची आकांक्षा पूर्ण करण्यासाठी त्यांनी खडतर मार्ग स्वीकारले. शिक्षणाप्रति त्यांची आवड पाहून बडोदा संस्थानचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी बाबासाहेबांना अध्ययनासाठी शिष्यवृत्ती दिली. या शिष्यवृत्तीच्या प्राप्तीमुळे न्यूयॉर्क (अमेरिका) येथील विद्यापीठात 'अॅन्शंट इंडियन कॉमर्स' या विषयावर संशोधन करून प्रबंध सादर केला. १९१५ मध्ये त्यांनी एम.ए. केले. कोलंबिया विद्यापीठात 'नॅशनल डिविडंड ऑफ इंडियाः ए हिस्टॉरिक अॅण्ड अॅनॅलिटिकल स्टडी' हा प्रबंध त्यांनी सादर केला. १९१६ मध्ये कोलंबिया विद्यापीठाने बाबासाहेबांना पीएच.डी. पदवी प्रदान केली.

भारतात परतल्यावर मुंबईच्या सिडनेहॅम कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून सेवा केली. १९२२ मध्ये त्यांनी कायद्याचा अभ्यास करीत बॅरिस्टरची परीक्षा उत्तीर्ण केली. १९२३ मध्ये 'डॉक्टर ऑफ सायन्स' या पदवीने त्यांना भूषविण्यात आले. १९५२ मध्ये त्यांना समाज व शिक्षण क्षेत्रातील कार्यामुळे त्यांना कोलंबिया विद्यापीठाने 'डॉक्टर ऑफ लॉ' या पदवीने सन्मानित करण्यात आले. तसेच हैद्राबादच्या उस्मानिया विद्यापीठाने 'डॉक्टर ऑफ लिटरेचर' ही पदवी त्यांना बहाल केली. बहुश्रुत चिंतक असलेल्या बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचा हा सन्मान होय.

मराठी वर्तमानपत्रांच्या सृष्टीत एका विशिष्ठ वर्गातील मक्तेदारी होती. तेथे इतरांना प्रवेश नव्हता. मात्र समाजपरिवर्तनाच्या विचाराने काम करण्याच्या वृत्तीच्या डॉ. आंबेडकरांनी समाजजागृतीसाठी पत्रकारितेचे माध्यम निवडले. मूकनायक(१९२०), बहिष्कृत भारत (१९२८), जनता (१९३०) आणि प्रबुद्ध भारत (१९५६) ही आपली वृत्तपत्रे उभारली. मुकनायकसारख्या अंकात ते म्हणत 'आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायांवर उपाययोजना सुचविण्यात, त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वृत्तपत्रांसारखी अन्य भूमीच नाही. (मुकनायक) ३१ जानेवारी १९२०) अस्पृश्यांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडणे, त्यांच्या हक्कांची जाणीव देणे, हिंदुस्थानच्या राजकीय आर्थिक धोरणांवर सडेतोड विवेचन करणे, तत्कालीन स्त्री स्थिती यांसाठी परखड, तर्कनिष्ठ पत्रकारितेचे खरे विशेष स्वरूप होत.

वंचित, दुर्लक्षित, उपेक्षित माणूस एकत्रित आला तर नवी क्रांती घडणार याच विश्वासाने डॉ. आंबेडकरांनी 'बहिष्कृत हितकारिणी सभा', 'समाज समता संघ' यांची स्थापना केली. या माध्यमातून जनमानसापर्यंत मनुष्याचे आत्मभान त्यांनी निर्माण केले. अमरावतीचा अंबादेवी मंदिर सत्यागृह (१९२७) महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह (१९२७), मनुस्मृतीचे दहन व नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह (१९३०) ही सर्व आंदोलने त्यांची प्रभावी ठरली. अस्पृश्यता निर्मूलन, जातीय विषमता निर्मूलनासाठी त्यांचा लंडन येथील गोलमेज परिषदेमधील (१९३०,१९३१) सहभाग पाहता त्यांचे कार्य जोरकस ठरले. गांधी-आंबेडकर यांतील पुणे करार (१९३०), १९३६ मधील धर्मांतराची घोषणा हे त्यांचे राजकीय व सामाजिक पैलू स्पष्ट झाले.

शिक्षणाच्या आग्रहाबरोबर 'शिका-संघटित व्हा आणि संघर्ष करा' ही शिकवण डॉ. आंबेडकरांनी प्रत्येक जनआंदोलनात रूजविली. मुंबई येथे १९४६ मध्ये सिद्धार्थ महाविद्यालय,

औरंगाबादमध्ये मिलिंद महाविद्यालयाची स्थापना १९५० मध्ये केली. राजकीय क्षेत्रात वावरताना स्वतंत्र मजुर पक्ष (१९३६), अस्पृश्य रेल्वे कामगार परिषद, अखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशन (१९४२ ) या पक्षाच्या माध्यमातून नवी राजकीय धोरणे दूरदृष्टीने नियोजित केली. मुंबई असेंब्लीत निवडून गेल्यानंतर डॉ. आंबेडकरांनी मजूर मंत्री, भारताचे पहिले कायदेमंत्री, खाणकामगार मंत्री ही पदे भूषविली. औद्योगिक कलह विधेयक, हिंदू कोड बिल, आरक्षण विधेयक, रोजगारसंबंधी विधेयक त्यांनी तयार केले. कायदा मंत्री म्हणून काम पहात असताना राज्यघटना समितीच्या 'मसुदा समितीचे' अध्यक्ष म्हणून त्यांनी केलेले कार्य यात संविधानाचा प्रदीर्घ मसुदा, धर्मनिरपेक्ष कलमांची मांडणी, कामाची पारदर्शकता यासारख्या वैशिष्ट्यपूर्ण राज्यघटना निर्मितीचे कार्य पाहता ते संविधानाचे शिल्पकार ठरले.

संत कबीर, तथागत गौतमबुद्ध व म.फुले यांना गुरुस्थानी मानून त्यांच्या विचारांचा वारसा आपल्या कार्यात आणला. या पार्श्वभूमीवर मानव कल्याण करणारा बौद्ध धम्म सखोल अभ्यासाअंती बाबांनी निवडक थॉट्स ऑन पाकिस्तान, शूद्र पूर्वी कोण होते, दि अनटचेबल, 'बुद्ध अॅण्ड हिज धम्मा' या ग्रंथांचे लेखन केले. 'हिंदू स्त्रियांची उन्नती व अवनती' या ग्रंथात स्त्री हक्काची जाणीव मांडली. त्यासाठी 'हिंदू कोड बील' तयार करून स्त्री मुक्तीचा आग्रह धरला. मानव कल्याण केंद्रस्थानी मानणारा प्राज्ञा-करुणा-समतेची शिकवण देणारा बुद्धीवादी 'बुध्द धम्म' त्यांनी स्वीकारण्याची इच्छा व्यक्त केली. १४ ऑक्टोबर १९५६ मध्ये नागपूर येथे ऐतिहासिक धम्मचक्र प्रवर्तन समारंभात लाखो अनुयायासोबत बौध्द धम्माचा त्यांनी स्वीकार केला.

समाजपरिवर्तन, आर्थिक विकास, सामाजिक न्याय व समानसंधी तसेच देशाचे उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान अपूर्व असे आहे. सतत १८ तास वाचन, चिंतन व लेखन करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले आयुष्य वेचले. शेवटच्या माणसापर्यंत न्याय पोहोचविण्यासाठी ते अविरत संघर्ष करीत राहिले. मात्र डॉ. आंबेडकरांचे धर्मांतरानंतर दोनच महिन्यांनी ६ डिसेंबर १९५६ रोजी महापरिनिर्वाण झाले. निर्भय पत्रकार, वंचितांचा मुक्तिदाता, उत्कृष्ट कायदेतज्ज्ञ, संवेदनशील समाजचिंतक, प्रगल्भ राजकरणी, संविधानाचे शिल्पकार, गाढे विद्वान, राजकारण धुरंधर अशी अनेक बिरुदे लावली जातात.

## डॉ. आंबेडकरांचे ग्रंथ :-

१. कास्ट इन इंडिया (१९५६)

२. स्मॉल होल्डिंग्ज इन इंडिया अॅण्ड देअर रेमेडिज

३. द प्रॉब्लेम ऑफ रूपी (१९२३)

४. ॲनिहिलेशन ऑफ कास्ट (१९३५)

५. हू वेअर शुद्राज

६. फेडरेशन व्हर्सेस फ्रिडम

७. रानडे, गांधी अ‍ॅण्ड जीना (१९४३)

८. व्हॉट काँग्रेस अ‍ॅण्ड गांधी हॅड डन टू अनटचेबल्स ? (१९४५)

९. थॉट्स ऑन पाकिस्तान (१९४५)

१०.स्टेट्स अ‍ॅण्ड मायनॉरिटीज (१९४७)

## ७.२.२ जातीविषयक डॉ. आंबेडकरांचे विचार :-

**जाती संस्था उत्पत्तीविषयी सिद्धांत-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील जाती संस्थेतील अनेक दोषांवर टिका करून हिंदू धर्मशास्त्राने स्वतःचा स्वार्थ साध्य करण्यासाठी ही जातीव्यवस्था निर्माण केली असे प्रतिपादन केले. यासाठी त्यांनी आपल्या 'कास्ट इन इंडिया' , हू वेअर शुद्राज, अस्पृश्यता, राज्य आणि अल्पसंख्याक, द रिडल्स इन हिंदू इजम या ग्रंथांमध्ये तसेच वृत्तपत्रांतून जाती संस्थेविषयी विवेचन केले आहे. जाती व्यवस्था आणि अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी भारतातील जातीसंस्थेचे सखोल चिंतन केले. त्यांच्या मते भारतातील जातीसंस्था निर्माण झाली ती विषमतेवर आधारित असून मानव निर्मित आहे. चातुर्वर्ण्य व्यवस्थेनुसार ज्या जाती वरिष्ठ ठरल्या त्यांनी आपला स्वार्थ साध्य करण्यासाठी श्रेष्ठ कनिष्ठ असा भेदभाव निर्माण केला. त्यांच्या मते आर्यांचा समाज ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य ह्या तीन वर्गातच विभागलेला होता. शुद्रांचा वेगळा वर्ण नव्हता. तोही क्षत्रिय वर्गातच समाविष्ट होता. डॉ. आंबेडकरांनी याचे विश्लेषण केले आहे. त्यांच्या मते राजा सुदाम आणि ब्राह्मण ऋषी वशिष्ट यांच्यातील संघर्षामुळे ब्राह्मणांनी शूद्रांना क्षत्रिय वर्णातून चौथ्या वर्णात ढकलले व त्यांना ज्ञान व संपत्ती मिळविण्यापासून अलिप्त ठेवले. त्यांचे सामाजिक हक्क नष्ट केले गेले. तसेच अस्पृश्य मानले गेले. ह्या हलक्या वागणुकीमुळे या वर्गास इतर वर्णांचा आश्रय घेणे भाग पडले. या कामांच्या वाटणीमुळे अस्पृश्य अत्यंत कनिष्ठ कामे करू लागला. त्यातून समाजातील विषमतेची दरी रुंदावत गेली. या चातुर्वर्ण्य व्यवस्थेनुसार कामांची विभागणी चार वर्णांत झाली. क्षत्रिय राज्यकारभार पाहू लागले. वैश्य व्यापार तर शूद्रांच्या वाट्याला समाजाची हलकी व दुर्लक्षित कामे आली. यानुसार व्यवस्थेत श्रमविभागणी निर्माण करण्यात आली. या सर्व गोष्टींचा परिणाम भारतातील जाती व्यवस्था विषमतेच्या अधारावर तिची चौकट अधिक भक्कम झाली. या श्रमविभागणीला पुढे आनुवंशिकतेचा आधार देण्यात आला. यामुळेच जातीसंस्थेचा उदय झाला.

डॉ. आंबेडकरांनी जातीची उत्पत्ती ईश्वरनिर्मित मानली नाही तर मानव निर्मित मानली. त्यांच्यामते पूर्वीच्या काळी दोन टोळ्या होत्या. त्यांच्यात सतत संघर्ष होत असे. त्यात पराभूत टोळीने स्थिर असलेल्या टोळ्यांकडे आश्रय मागितला. स्थिर असलेल्या टोळ्यांवरही इतरांकडून नेहमी हल्ले होत. म्हणून स्वयंरक्षणाच्या उद्देशाने आश्रय मागणाऱ्यांना आश्रय देऊन त्यांना गावाच्या पहाऱ्यासाठी नेमले. त्यांची गावाच्याबाहेर स्वतंत्र वस्ती देऊन गावाच्या संरक्षणाची व इतर हलके कामे करण्याची जबाबदारी देण्यात आली. त्या बदल्यात अन्न देण्यात येऊ लागले. वरच्या या गावाबाहेरील घटकांशी संबंध न ठेवता त्यांना

अस्पृश्य ठरविले. त्यातून अस्पृश्यतेचा उदय झाला. कालांतराने त्यांना शूद्र समजण्यात येऊन त्यांची पिळवणूक होऊ लागली. पुढे हे शूद्र आनुवांशिकतेच्या आधारावर कनिष्ठ जातीत रूपांतरित झाले. डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यता व जातीवर आधारीत विषमता ही चातुर्वर्ण्य व्यवस्थेतील ब्राह्मण वर्गाने निर्माण केली असून त्यांस दैवी आधार नाही हे स्पष्ट केले.

**१. भारतातील जातींचे स्वरूप व डॉ. आंबेडकरांची टिका :-**

डॉ. आंबेडकरांनी भारतातील जातीसंस्थेच्या उगमास शेकडो वर्षाची परंपरा लाभली असे म्हटले. त्यांच्या मते येथील जातीसंस्थेच्या उत्पत्तीचे मूळ भारतीय इतिहासात सापडते. भारतात जातीचे हिंदू धर्मानुसार चार विभाग डॉ. आंबेडकरांनी सांगितले.

पुरोहित वर्ग म्हणजे ब्राह्मण, योद्धा व संरक्षण करणारा वर्ग म्हणजे क्षत्रिय, व्यापार करणारा वैश्य तर समाजातिल कनिष्ठ कामे करणारा घटक म्हणजे क्षुद्र. सुरवातीस हे चार घटक होते. नंतर त्यातून हजारो जाती, पोट जाती निर्माण झाल्या. सध्याची भारतातील जाती व्यवस्था प्राचीन वर्ग व्यवस्थेची उत्क्रांती असून ती हिंदू श्रद्धा, विवाह, भोजन व्यवसाय या घटकातून पुढे आली. जातीभेद हा हिंदू धर्मशास्त्रातील मोठा दोष मानला. जात ही अमूर्त संकल्पना असून ती माणसाच्या मनात निर्माण होते. म्हणजेच ती मानसिक कल्पना आहे. ती मानवाच्या मनात रुजविण्याचे काम हिंदू धर्मातील नियमांनी केले म्हणून डॉ. आंबेडकरांनी भारतातील जाती व्यवस्थेचे पुढील स्वरूप स्पष्ट कले.

१. व्यवसाय - जातीची चौकट होण्याचे कारण म्हणजे स्वतःच्या जातीचा जो पिढीजात धंदा आहे तोच व्यवसाय त्या व्यक्तीने केला पाहिजे ह्या व्यवसायाच्या बाबतीत असलेल्या नियमामुळे जाती निर्माण झाल्या.

२. अन्न - याबाबत असा नियम आढळतो की दुसऱ्या जातीमधील व्यक्तीबरोबर एखादी व्यक्ती भोजन करू शकत नव्हती याचा अर्थ असा की सजातीय विवाह करू शकतात तेच सहभोजन करू शकतात.

३. विवाह - लग्नाबाबत तर असे दिसते की दुसऱ्या जातीमधील व्यक्तीबरोबर आंतरजातीय विवाह होऊ शकत नाही. लग्नाच्या बाबतीत प्रत्येक जातीने घालून दिलेल्या नियमांचे पालन होणे अत्यंत आवश्यक मानण्यात येत असे.

४. वंश - व्यक्तीच्या प्रतिष्ठेबाबत असा नियम आहे की वंश परंपरेने त्याला असलेली प्रतिष्ठा हीच कायम असते. ज्या जातीत जन्म झाला तो वंश कोणता यावरून व्यक्तीचा दर्जा ठरत असे. हिंदू व्यक्ती ज्या जातीत जन्मतात त्याच जातीत मृत्यू होतो. प्रत्येक जातीस आपआपल्या जातीचा अभिमान वाटतो.

विशेष बाब म्हणजे ज्या जातीची व्यक्ती आहे, त्या त्या जातीचे नियम तिला लागू होतात. जात हे एक नियमबद्ध संघठन असून त्यावर श्रद्धा विवाह, भोजन, व्यवसाय, आणि सामाजिक गट अशी बंधने असतात. रोटी, बेटी व्यवहार, आचार संस्कार इ. बाबतींत जातीवर कडक बंधने घातल्याने हे विभाग कायमचे विभक्त राहिले. या जातीसंस्थेच्या

चौकटीने आंतरजातीय विवाहास विरोध केला तसेच एकाच जातीत विवाह करत असताना सगोत्र व सपिंड विवाहाला बंदी घातल्यामुळे जाती व्यवस्था बळकट झाली. याचबरोबर सतीची चाल, विधवा विवाह बंदी, बाल विवाह यासारख्या अनिष्ट प्रथा रूढ झाल्या म्हणून डॉ. आंबेडकर म्हणतात, हिंदू जाती व्यवस्थेस धर्माचा आधार असला तरी बुद्धीचा व तर्काचा कोणताही आधार नाही. तसेच श्रमविभाजनाच्या तज्ज्ञानुसार निर्मिती नसून श्रमिकांचे निरनिराळ्या जातीत विभाजन हे जाती व्यवस्थेमुळे झाले आहे. हे अनैसर्गिक आहे, येथे गुणांना स्थान नाही. जातींनी ठरविलेली बंधने तोडल्याने तसेच जातबाह्य ठरविण्यात आल्याने नव्या जाती निर्माण झाल्या. त्यामुळे जातींची संख्या वाढली. व्यक्तीचा दर्जा जन्माने ठरेल. परिणाती भेदभाव वाढून विषमतेत वाढ होते.

जातीव्यवस्था ही हिंदू धर्माने स्वतःचा हेतू साध्य करण्यासाठी निर्माण केलेली व्यवस्था आहे. जात ही एक मानसिक स्थिती असून त्यामधुन उच्च-निचतेची भावना निर्माण होते. असे डॉ. आंबेडकरांनी आपल्या विविध लिखाणातून स्पष्ट केले आहे. याचा परिणाम त्यांच्या मते व्यक्ती ज्या जातीत जन्माला येते त्या जातीतच तिला राहावे लागते. जातीव्यवस्थेमुळे व्यक्तीच्या कर्तबगारीतील मर्यादा येतात. समाजाचे निरनिराळ्या जातीत विभाजन झाल्यामुळे समाजातील एकात्मता नष्ट होते.बलुतेदार निर्मितीला संकल्पना यातून निर्माण झाल्याचे दिसते. डॉ. आंबेडकरांच्या मते भारतातील जातीव्यवस्था ही पूर्वजांशी जोडण्यात आली आहे. पूर्वी केलेल्या पाप पुण्यानूसार मनुष्याला विशिष्ट जातीत जन्म प्राप्ती होते असे मानले जाते या मताला कोणताही शास्त्रीय आधार नाही. म्हणून येथील जातीय व्यवस्था ही कृत्रिम स्वरूपाची आहे. व्यक्तीचा दर्जा जन्माने ठरत असल्याने त्यांना समान संधी आणि स्वातंत्र्य मिळत नाही. भारतीय समाज व्यवस्थेत 'माणूस' हा केंद्रबिंदू मानलेला नाही. समाजव्यवस्थेतील जातीयता नष्ट करून नवीन मूल्यांवर आधारलेला समता, बंधुता व स्वातंत्र्य या तत्त्वावर आधारलेला नवसमाज निर्माण करावयाचा नव्हता त्यामुळेच हिंदू समाजात जातीयता टिकून राहिली आणि समाजाच्या दैनंदिन व्यवहारात आपल्या भयानक स्वरूपाने थैमान घातले असे आंबेडकरांनी प्रतिपादन केले आहे.

जाती व्यवस्थेच्या उगमाचा आणि विकासाचा शोध डॉ. आंबेडकरांनी संशोधक या नात्याने मांडला. 'भारतातील जातीव्यवस्था' या शोधनिबंधात त्यांनी जातीच्या उगमाविषयीची कारणे स्पष्ट केली आहेत. याचबरोबर लाहोर येथील जात पात तोडक मंडळाने बाबासाहेबांचे भाषण ठेवले होते. त्यासाठी त्यांनी तयार केलेले तेथे होऊ शकले नाही. त्या भाषणाचे रूपांतर 'जातीप्रथा निर्मूलन' या ग्रंथात झाले. त्यात ते म्हणतात, भारताचे राजकीय आणि सामाजिक परिस्थिती बदलावयाची असेल तर जातीव्यवस्था समूळ नष्ट केल्याशिवाय पर्याय नाही. जातीभेद समाजाला घातक ठरली आहे. ही व्यवस्था मनुष्याला ज्ञान प्राप्ती करू देत नाही.

## २. डॉ आंबेडकरांच्या मते जातीभेद निर्मूलनाचे मार्ग :-

हिंदू समाजातील जातीय पद्धतीचे व अस्पृश्यतेचे हे मूळ समाजघातकी व राष्ट्राला

मारक ठरणारे स्वरूप पाहून त्यावर चिंतन करून जातीयता व अस्पृश्यता याविरुद्ध मुक्तिलढा सातत्याने चालविला. यात त्यांचे महाडचा सत्याग्रह असेल, काळाराम मंदिर प्रवेशाचा लढा असेल अशा विविध आंदोलनाच्या भूमिकेतून, लिखाणातून, वृत्तपत्रातून आपल्यां कृतिशील भूमिका मांडलेले दिसते.

भारतीय व्यक्तीचा सर्वांगीण विकास जर करावयाचा असेल तर स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या तत्त्वांना महत्त्व द्यावे लागेल. याशिवाय राष्ट्र उभारणीचे कार्य भारतीय समाजात होऊच शकणार नाही. त्यासाठी सामाजिक-आर्थिक भेद नष्ट करणे गरजेचे आहे. तसेच समाजातील उच्चनीचता आहे तोपर्यंत भारत एकसंघ स्वरूपाचा निर्माण होणे शक्य नाही हे डॉ.आंबेडकरांचे ध्येय होते. हा उद्देश साध्य करण्यासाठी जातीभेदाच्या ज्या अडचणी आहेत त्या दूर करणे आवश्यक आहे. त्यांच्यामते हजारो जाती या समाजात आहे. अशा विभागलेल्या जातींवर आधारित राष्ट्रीय ऐक्याच्या जोरावर राष्ट्र कस निर्माण होईल? हा प्रश्न सोडविण्यासाठी जाती उच्चाटनाचे कार्यक्रम हाती घेतल्याशिवाय समतेचे तत्व प्रस्थापणे शक्य नाही. म्हणूनच संपूर्ण भारतीय व्यक्तींना स्वातंत्र्य व समता ही तत्त्वे स्थापणे हे ध्येय प्रत्येक व्यक्तीचे असले पाहिजे. हेच ध्येय डॉ. आंबेडकरांचे होते. याचबरोबर डॉ. आंबेडकरांच्या मते पुढील मार्गांचा वापर केला तर जाती निर्मूलनाला हा लागू शकेल.

१. शिक्षण प्रसार - डॉ. आंबेडकरांच्या मते ज्या अस्पृश्य वर्गाला कित्येक वर्षापासून उच्च वर्गाने शिक्षणापासून हेतुपूर्वक वंचित ठेवले, त्या वर्गाला शिक्षणाचा प्रसार करून त्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिले पाहिजे. या वर्गाचे मानसिक, सांस्कृतिक व आर्थिक परिवर्तन घडवून त्यांचा सर्वांगीण विकास झाल्याशिवाय जाती निर्मूलन शक्य नाही.

२. लोकांचा दृष्टिकोन बदलविणे - जाती व्यवस्था ही भारतीयांची मानसिकता आहे. ती बदलविणे अत्यंत गरजेचे आहे. परस्परांच्या मनात जाती जातीमध्ये आदर व प्रेम निर्माण केले पाहिजे. त्यामुळे सामाजिक ऐक्य प्रस्थापित होईल.

३. राजकीय सहभाग वाढविणे - भारतातील जातीव्यवस्थेची तीव्रता कमी करण्याबरोबर दलित वर्गाच्या हितसंबंधाची जपणूक करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रथम मजूर पक्ष व त्यानंतर शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना केली. दलित वर्गास पिळवणुकीपासून मुक्त करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक मानले .

४. संघर्ष - आपल्या बांधवांना शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा. असा सल्ला देऊन अस्पृश्यांना संघर्षाशिवाय आपले हक्क परत मिळणार नसल्याने साध्यापेक्षा साधन महत्त्वाचे मानून स्वतःच्या हिकमतीवर स्वातंत्र्य, समता व न्याय खेचून आणा असे सांगितले.

५. अंधश्रद्धा व परंपरा नष्ट कराव्यात - भारतातील जातीसंस्थेस व विषमतेस भारतातील अंधश्रद्धा, रूढी, परंपरा पोषक आहेत. त्यामुळे समाज पोखरला असून समाजाची फसगत झाली आहे. दुष्ट रूढी, परंपरा निर्माण झाल्यामुळे विषमता निर्माण झाली आहे. म्हणून अंधश्रद्धा दूर करून समता निर्माण होईल यावर डॉ. आंबेडकर यांना विश्वास होता.

याचबरोबर त्यांनी जातीच्या चौकटी मोडीत काढण्यासाठी आंतरजातीय विवाह रूढ करण्यावर भर दिला. मात्र त्यासाठी कोणासही सक्ती न करता प्रत्येक स्त्री पुरूष

## ७.२.३ डॉ. आंबेडकरांचे सामाजिक लोकशाहीविषयक विचार :–

डॉ. आंबेडकरांच्या मते इंग्रज भारतातून गेल्यावर आपण राजकीयदृष्ट्या स्वतंत्र्य होऊ, मात्र गरिब, अस्पृश्य, दलित वंचित समाज येथील चातुर्वर्ण्य व्यवस्थेतील वरिष्ठ जातीच्या गुलामगिरीतच राहतील. म्हणून स्वतंत्र राष्ट्र निर्मितीबरोबर सर्व समाजास स्वातंत्र देणारी समाजिक लोकशाही येथे प्रस्थापणे गरजेचे आहे. त्यांनी रक्तपाताशिवाय लोकांचे सामाजिक, आर्थिक व राजकीय परिवर्तन घडवून आणता येईल. असा स्थितीला सामाजिक लोकशाही म्हटले. ते लोकशाहीचे कट्टर पुरस्कर्ते होते. समाजाच्या सर्वांगीण विकासालाही त्यांनी लोकशाहीचा पर्याय स्वीकारला. कारण त्यांच्यामते फॅसिस्ट, समाजवाद, जातीवाद यांनी स्वातंत्र्य, समता, न्याय या तत्त्वांची गळचेपी केली आणि सर्वंकष राजवटी प्रस्थापित केल्या. म्हणून डॉ. आंबेडकर म्हणतात ,'' सामान्यातल्या सामान्य माणसाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यास सामाजिक लोकशाहीच बांधील आहे.''

### १. डॉ. आंबेडकरांची लोकशाहीबाबत मते –

डॉ. आंबेडकरांची लोकशाही विषयीची ठाम मते दिसतात. त्यांच्या मते 'स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांवर आधारित जो समाज आहे, त्यात बंधुतेचा विकास होण्याची संधी आहे' आणि या तीन तत्त्वांचा परस्पीरक संबंधावर जी व्यवस्था असते ती लोकशाही होय. तसेच लोकशाही म्हणजे केवळ सरकारचे स्वरूप नव्हे तर ती म्हणजे इतरांबद्दल आदर व सम्मान राखणे होय. त्यांच्यामते लोकशाहीत जनसंमतीला खूप महत्त्व आहे. जनता स्वतंत्र असावी. समाज हा माणसांचा नव्हे, तर वर्गांचा बनलेला असतो आणि म्हणूनच शासनात सार्‍या वर्गांना प्रतिनिधीत्व असावे, जेणेकरून स्वातंत्र्य, समता व बंधुता प्रत्यक्षात आणणे शक्य होईल. याविषयी त्यांनी प्रतिपादन केले होते. समाजाचे परिवर्तन घडवून आणण्यासाठी लोकशाही शासनपद्धती डॉ. आंबेडकरांना सर्वात चांगली वाटते. व्यक्ती स्वातंत्र्याला लोकशाहीशिवाय तर नाही. भारतीय समाजव्यवस्थेतील जातीभेदाची कल्पना पाहता विषमतेवर प्रहार करण्यासाठी, अस्पृश्य, शोषित, दलित, पीडीतांच्या समस्येला उत्तर देण्यासाठी लोकशाहीच उपयोगी ठरते याविषयी त्यांचे ठाम मत होते.

**धर्मशास्त्रांच्या मानसिक गुलामगिरीतून मुक्त केले पाहिजे.**

भारतातील जातीसंस्था नष्ट करण्यासाठी हिंदू धर्मात परिवर्तन करण्याची गरज आहे असे डॉ. आंबेडकरांनी प्रतिपादन केले. त्यांच्यामते सर्व धर्मियांना मान्य होईल असा एक पवित्र धर्मग्रंथ स्वीकारण्यात यावा. त्याचप्रमाणे जन्मावर आधारित पौरोहित्याचा अधिकार नष्ट करून शासनाने परीक्षा घेऊन पौरोहित्याचे प्रमाणपत्र द्यावे. यास कायदेशीर स्वरूप द्यावे. डॉ. आंबेडकरांना याची जाणीव होती की व्यक्तीच्या जीवनात समाजाची खरी आवश्यकता असली तरी समाजाची धारणा हे धर्माचे अंतिम ध्येय असते. म्हणून त्यांनी तत्त्वांचा समुच्चय या अर्थाने धर्माला महत्त्वपूर्ण मानले. यासाठी दलित व अस्पृश्य समाजाने

बौद्ध धर्माचा स्वीकार करावा म्हणून स्वतः बौद्ध धम्माचा स्वीकार करून धर्मांतर केले. स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाचा पुरस्कार करणारा, कर्मकांडाला महत्त्व न देता सदसदविवेकबुद्धी व प्रेमभावना या आधारावर सामाजिक जीवन निर्माण करू पाहणारा असा बौध्द धर्म असून त्याचा स्वीकार केल्यास जातीसंस्थेचे वर्चस्व कमी करता येईल. याचबरोबर त्यांनी प्रतिपादन केले, अस्पृश्यांनी जातीव्यवस्थेची बंधने तोडून खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य, समता प्राप्त करावयाची असेल तर त्यासाठी त्यांनी उच्चशिक्षण घेऊन स्वतःचे व संपूर्ण दलितांचे सांस्कृतिक परिवर्तन घडवून आणले पाहिजे. भारतातील जातीव्यवस्था आणि धार्मिक अंधश्रद्धा यामधून भारतीय समाजाला मुक्त बुद्धीवादावर त्याची बुद्धीवादावर उभारणी करण्यात यावी असे डॉ. आंबेडकरांचे ठाम मत होते.

डॉ. आंबेडकरांनी राजकीय लोकशाहीचा फक्त विचार केला नाही तर त्याबरोबर आर्थिक -सामाजिक लोकशाहीचा व्यापक स्वरूपात आग्रह धरला. याविषयी त्यांची मते पुढील प्रमाणे-

१. सनदशीर मार्गाने सत्तांतर - भारतीय समाजाची राजकीय, सामाजिक, आर्थिक स्थिती पाहता समाजात जर परिवर्तन घडवून आणावयाचे असेल तर लोकशाही हाच एकमेव मार्ग आहे. लोकांच्या हाती सत्ता देण्यासाठी लोकांच्या संमतीचे शासन लोकशाही शासनात शक्य आहे. सत्ता प्राप्तीचा कोणताही हिंसात्मक मार्ग न वापरता शांततामय व सनदशीर मार्गाने रूपांतर होऊ शकते.

**२. जास्तीत जास्त लोकांचे हित –** लोकशाहीतच लोकांचे जास्तीत जास्त कल्याण होते. सर्वांगीण हिताचा विचार हाच लोकशाहीचा उद्देश असतो. म्हणूनच लोकशाही हा शासनप्रकार चांगला आहे.

**३. समान संधी –** कोणत्याही स्वरूपाच्या नागरिकांमध्ये भेद न राहता आपण सर्वांगीण विकास करण्यासाठी लोकांना समान संधी सर्व क्षेत्रांत मिळू शकते. सुरक्षितता, विकास आणि प्रतिष्ठा जात, वर्ग, वर्ण, यांत भेद न राहता सर्व नागरिकांना आपला उद्देश संधीच्या साहाय्याने साध्य करता येतो.

डॉ. आंबेडकरांनी घटना समितीच्या मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने राज्यघटनेत संसदीय लोकशाहीचा चांगला पर्याय म्हणून समावेश केला. मात्र त्यांचा सामाजिक लोकशाहीचा आग्रह होता. प्रौढ मतदानाच्या अधिकारातून राजकीय लोकशाही निर्माण होऊ शकते. मात्र राजकीय लोकशाहीचा विकास सामाजिक लोकशाहीशिवाय होऊ शकत नाही. त्यांच्या मते सामाजिक समतेनेच लोकांच्या हक्कांना सार्वत्रिकता आणि सुरक्षितता मिळू शकते. संसदीय पद्धतीत आनुवांशिकतेतील सत्तांतराची प्रक्रिया राहात नाही. संसदेचे सभासद निवडणुकांच्या सहाय्याने जनतेतून निवडून येतात. निर्णय, धोरणे खुले असतात जनतेला त्याची माहिती होते. बहुमताने राज्यकारभार चालत असतो. राजकीय पक्षामध्ये बहुमत पक्षांच्या किंवा गटाच्या हाती सत्ता येते. विरोधी पक्षात स्थान असते. ह्या सर्व गोष्टींचा डॉ. आंबेडकरांना इंग्लंडच्या संसदीय लोकशाही प्रमाणे भारताच्या संसदीय लोकशाहीचे स्वरूप अभिप्रेत होते. त्यातून त्यांचा संसदीय शासनपध्दतीवर विश्वास होता.

त्यामुळे त्यांनी भारतासाठी संसदीय लोकशाहीचे स्वरूप आणण्याचा आग्रह केला. त्याची कारणे त्यांनी पुढीलप्रमाणे स्पष्ट केली. -

**१. प्रातिनिधिक शासन –** संसदीय लोकशाहीत प्रतिनिधींचे शासन असते. जनतेच्या इच्छा, आकांक्षा, मागण्या चर्चेने संसदेच्या सभागृहात प्रतिनिधींच्या संमतीने सोडणे शक्य असते आपली मते व्यक्त करणे हे सदस्यांना शक्य होते. संसदेचे स्वरूप हे जनतेच्या इच्छांचे प्रतिबिंबित स्वरूपात राहते. विधेयके-कायदे सर्व संमतीने निर्माण करणे शक्य असते.

**२. जबाबदार शासननिर्मिती –** समाज माणसाची प्रतिष्ठा जपणारी त्यासाठी केवळ राजकीय नव्हे तर आर्थिक व सामाजिक समतेचा ध्यास घेणारी आणि सत्तेचा एकाधिकार संपवून सर्वांना सत्तेमध्ये, निर्णय प्रक्रियेमध्ये, निर्णयाच्या अंमलबजावणीमध्ये समान संधी उपलब्ध करून देणारी व्यवस्था म्हणजे लोकशाही व्यवस्था होय. आणि यातूनच कार्यकारी मंडळ हे संसदेत जबाबदारी असण्याची प्रक्रिया संसदीय शासन पद्धतीतच असते.

**३. सामान्य माणसाच्या हाती सत्ता –** लोकशाही शासन व्यवस्थेत अधिकारांचा कायदा सामान्य जनतेवर होत असतो. आणि अधिकार निर्मितीचे केंद्र प्रौढ मताधिकाराने जनतेत असते. जनता ही सार्वभौम असते. संसदीय शासनाचे कार्यकारी मंडळ आणि विधिमंडळ निर्मितीचे अधिकारी स्थान हे जनतेच्या हाती असते. सरकारी निवड ही लोकमताच्या आधारावर करण्यात येते. हे सव परिवर्तन करण्याचा मार्ग संसदीय केंद्रशाहीतच शक्य आहे. या विषयावर डॉ. आंबेडकरांनी मत व्यक्त केले होते.

मात्र भारतीय लोकशाहीपुढील अडचणी आणि उणिवा याविषयी त्यांना भान होते. त्यांच्या मते केंद्रशाहीमुळे राजकीय समता येईल मात्र सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात समता येणार नाही. भारतीय समाजात विषमता, निरक्षरता, जातीयता, अनेकविविध आव्हाने भारतीय केंद्रशाहीपुढे आहे. प्रत्येक व्यक्तीस समान मताबरोबर समान मूल्य मिळावे याविषयी डॉ. आंबेडकर आग्रही होते. देशाचे स्वातंत्र्य यात ते फरक करीत होते. देशातील सर्वात खालच्या वर्गात जो, पर्यंत अधिकार, स्वातंत्र्य खऱ्या अर्थाने मिळत नाही तो पर्यंत केद्रशाही तेथे यशस्वी होऊ शकत नाही. ही त्यांची ठाम धारणा होती. तेव्हा डॉ. आंबेडकरांच्या मते जाती उच्चाटनाशिवाय येथे लोकशाहीची मोट यशस्वी होणे शक्यच नाही म्हणून डॉ. आंबेडकर केंद्रशाहीचे काही दावे सांगतात. ती पुढीलप्रमाणे..

भारतातील चातुर्वर्ण्य व्यवस्थेतील स्वरूप, जातीयता अस्पृश्यांच्या वाट्याला येणारी वागणूक यांचा परिणाम समाजाच्या विषमता निर्माण करण्यावर झालेला आढळतो. निवडणुकांसारख्या काळात मतदारवर्तन, प्रतिनिधी निवडण्याचे जाती आधार ह्या सर्वांची भीती डॉ. आंबेडकरांना कड हा लोकशाहीचा मोठा दोष त्यांना दिसत होता. याचबरोबर निरक्षरतेचे प्रमाण प्रचंड असल्यामुळे अत्यल्पसंख्यांना, अस्पृश्यांना शिक्षणापासून दूर ठेवण्याचे प्रमाण हे निकष जातींवर आधारित असल्यामुळे लोकशाही प्रस्थापिण्यात डॉ. आंबेडकरांना मोठ्या उणिवा व दोष दिसत होता. तसेच बहुसंख्यांकांची अत्यल्पसंख्यांकावर वर्चस्वतेची भुमिका दिवसेंदिवस वाढवण्याची शक्यता असते. संवसदेतील बहुमत हे ज्या जातीच्या

लोकांची संख्या अधिक, त्या जातीचे प्रतिनिधी जास्त, तेव्हा प्रतिनिधिक शासन मतम सर्व समुदीच्या प्रति जी समानता व्यापक हवी त्या येणार नाही हा डॉ. आंबेडकरांना संसदीय लोकशाहीचा मोठा दोष वाटत होता. भारतातील जनमानसात असलेले अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, या गोष्टींमुळे सामान्य जनतेच्या हितासाठी असलेले त्यांची अंमलबजावणी होत असतांना बहुसंख्याकांची मानसिकता ही कितपत अल्पसंख्या केंद्रासाठी फायदेशीर ठरेल हा विचार डॉ. आंबेडकर मांडत होते.

'संसदीय केंद्रशाही' ह्या ग्रंथात डॉ. आंबेडकरांनी म्हटले आहे की, संसदीय शासन हे जनतेच्या हिताची शासन पर्यंती आहे. लोकसंमती हा मोठा गूढ ह्या शासनपर्यंतीची आहे. सामाजिक आणि आर्थिक क्षेत्राात परिवर्तन करावयंचे असेल तर ह्या शासनपद्धतीसारखी व्यवस्था दुसरी नाही. मात्र त्यासाठी लोकांमध्ये राजकीय जागृततेचे प्रमाण अधिक हवे. जात-धर्म-वंश-भाषा-रूढी-परंपरा ह्या गोष्टींनी युक्त अशा विषमतेने भरलेल्या भारतीय समाजासाठी संसदीय लोकशाही फारशी यशस्वी ठरू शकणार नाही. यासाठी संसदीय केंद्रशाहीचे प्रामुख्याने दोषांचा विचार पाहता डॉ. आंबेडकरांना भारतीयांसाठी सामाजिक लोकशाहीचा प्रामुख्याने प्रस्थापण्याचा आग्रह धरून

## २. डॉ. आंबेडकरांचा सामाजिक लोकशाहीविषयी दृष्टिकोन :-

डॉ. आंबेडकरांच्या मते लोकशाही ही जनतेच्या सर्वांगीण विकासाचे साधन बनले पाहिजे. ती नुसती शासनपद्धती नसून जीवन पद्धती आहे. म्हणून जनतेच्या पायाभूत विकासास सामाजिक लोकशाही आवश्यक आहे. सर्वप्रथम भारतातील विषमता नष्ट करून सामाजिक लोकशाही प्रस्थापणे त्यांच्यामते ब्रिटीश भारत सोडून गेले तर फक्त राजकीय स्वातंत्र्य मिळेल. येथील गरीब जनता मात्र वरिष्ठ जातींच्या गुलामगिरीतच राहील. म्हणून समाजिक स्वातंत्र्यासाठी समतेची स्थापना करून मगच राजकीय स्वातंत्र्य मिळावे अशी त्यांची धारणा होती. याचा अर्थ समता व बंधुभावावर आधारीत समाज होय. या समाजात सर्वसामान्यांना समान संधी देण्यात येते. त्यांच्या मते राजकीय क्षेत्रात व्यक्तीवर जितका अन्याय होतो त्यापेक्षा अधिक अन्याय सामाजिक क्षेत्रात होतो. व्यक्तीच्या पिळवणुकीसाठी शासनाजवळ असलेल्या साधनांपेक्षा जास्त साधने आणि मार्ग समाजाजवळ असतात. समाजाकडून व्यक्तीची होणारी पिळवणूक खूप दूरगामी व परिणामकारक असते, यासाठी अशा पिळवणूक करणाऱ्या अन्यायी शासनाला, बहुसंख्याक अन्यायी समाजाचा प्रत्येक समाजातील घटकाने विचार करणे गरजेचे आहे. कारण चातुर्वर्ण्य हा समाजाचा आधार होता. मनस्मृतीने सामाजिक न्याय नष्ट केलेला होता. डॉ. आंबेडकरांनी सामाजिक लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठी जे विविध आंदोलने केली त्यात अस्पृश्यांवरील अन्यायाचा प्रतिकात्मक विरोध म्हणून २५ डिसेंबर १९२७ मध्ये मनुस्मृतीचे जाहीर दहन केले. मार्च १९३० मध्ये नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेशाचे आंदोलन केले. जातीची बंधने तोडण्यासाठी पुनर्विवाह, आंतरजातीय विवाह यांवर भर दिला. दलित मुक्ती हे बाबासाहेबांचे ध्येय होते. यासाठीच सामाजिक चिंतन त्यांनी वृत्तपत्रे, ग्रंथे, मासिके, यातून सुरूच ठेवले. वर्णव्यवस्था व जाती व्यवस्था ह्यावर कठोर टीका केली. यांत त्यांनी सुरुवातीला 'मूकनायक'

‘बहिष्कृत भारत’ ‘जनता’ ‘प्रबुध्द भारत’ ह्या वृत्तपात्रातून परिस्थितीनुसार लेख प्रसिध्द केले. मुकनायक ह्या वृत्तपत्रात तर म्हणतात, ‘ हिंदुस्थान हा देश म्हणजे केवळ विषमतेचे माहेरघर आहे. हिंदू समाज हा एक मनोरा आहे व एक जात म्हणजे त्यांचा एक मजला आहे पण ह्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे ह्या मनोऱ्यास शिडी नाही. एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यास तेथे मार्ग नाही. ज्या मजल्यात ज्यांनी जन्म घेतला त्यांनी त्याच मजल्यात मरावे. खालच्या मजल्यावरील इसम मग तो कितीही पात्र असो त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही व वरच्या मजल्यातील माणूस मग तो कितीही अपात्र असो त्याला खालच्या मजल्यावर लोटून देण्याची कुणाचीही हिंमत नाही. ह्यात परिवर्तन करणे डॉ. आंबेडकरांना आवश्यक वाटत होते. यांसाठी समतेवर आधारित लोकशाही त्यांना हवी होती. ह्यासाठी त्यांनी निश्चयाने व जाणीवपूर्वक परिवर्तन करण्यावर भर दिला. यासाठी शिका, संघटित व्हा. आणि संघर्ष करा विचारमंत्र त्यांनी आपल्या अनुयायांना दिला. आत्मसन्मानासाठी हक्क लढवूनच मिळवावे लागेल ही डॉ. आंबेडकरांची धारणा होती. याचबरोबर त्यांनी म्हटले होते की, लोकशाहीच्या यशस्वी साठी समाजात विषमतापूर्ण आधारित वर्गात रचना नको, प्रभावी विरोधी पक्ष असावा. समतेवर आधारित न्यायप्रणाली असावी. घटनेतील नियमांचे काटेकोर पालन व्हावे यासाठी नागरिकांमध्ये राजकीय जागृकता असावी. ही सामाजिक लोकशाही प्रस्थापण्यासाठी महत्त्वपूर्ण आधारस्तंभ आहेत. आपण सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टे प्राप्त करून घ्यावयाची असतील तर घटनात्मक सनदशीर मार्गानेच ते साध्य केले पाहिजे. कारण राजकीय लोकशाही ही सामाजिक लोकशाहीवर अवलंबून असते. यासाठी समता, स्वातंत्र्य, बंधुता या तीन तत्त्वांमध्ये समतेवर आधारित समाजरचना असल्याशिवाय सामाजिक लोकशाही प्रस्थापित होऊ शकत नाही. प्रत्येक व्यक्तीस विकासाची संधी मिळाली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीस त्याची पूर्ण क्षमता वापरण्याची संधी मिळाली पाहिजे. अस्पृश्यतेचा विचार संपविण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी धर्मशास्त्रांना विरोध केला, अस्पृश्यतेची मानसिकता समाप्त करण्यासाठी अस्वच्छ कामे करू नयेत असे आवाहन केले. डॉ. आंबेडकरांची वृत्तपत्रे ही विचारपत्रे होती. अस्पृश्यांच्या विविध समस्यांबरोबर हिंदू समाजाच्या समाजिक, भौतिक आणि धार्मिक अधोगतीची कठोर मीमांसाही या लेखातून होत असे. महार वतन नष्ट करणे किती आवश्यक आहे याविषयी ‘बहिष्कृत भारत’ मध्ये लिहितात, ‘वतनदारीने महारांचे मानसिक शोषण झाले असून त्यातून स्वाभिमान शून्यता, स्वशुन्यता आणि निष्क्रियता निर्माण झाली आहे. त्यामुळे मानवी प्रतिष्ठेच्या दृष्टीने ही वतने नष्ट झाली पाहिजेत. असा त्यांचा आग्रह होता. याचप्रमाणे डॉ. आंबेडकरांनी स्त्री, पुरुष समानतेच्या दृष्टिकोनातून स्त्रियांना गुलामीतून मुक्त करण्यासाठी इ.स. १९४८ मध्ये ‘हिंदू कोड बील’ संसदेत मांडले. केवळ एका जातीसाठी नव्हे तर समस्त हिंदू स्त्रियांच्या हक्कांसाठी, उन्नतीसाठी, विकासासाठी अत्यंत परिश्रमपूर्वक बील मांडले. ह्या बिलाच्या रूपाने प्रथमच स्त्रीला घटस्फोट देण्याचा अधिकार, पोटगीचा अधिकार, एक पत्नी हयात असताना पतीला दुसऱ्या विवाहास बंदी, स्त्रियांना दत्तक घेण्याचा, मुलीला दत्तक घेण्याचा, स्त्रीला स्वतःच्या मिळकतीवरचा अधिकार, वडिलांच्या मिळकतीवर मुलीचा हिस्सा, मुलीस वारस होण्याचा अधिकार, आंतरजातीय विवाहास मान्यता, स्त्रीला स्वतःचा वारस निश्चित करण्याचा अधिकार इ. हे बील संसदेत

मंजूर होणे ही काळाची गरज आहे हे डॉ. आंबेडकरांनी संसदेत पटवून दिले मात्र या बीलास संसदेत विरोध झाला. या कारणामुळे त्यांनी आपल्या कायदा मंत्रिपदाचा राजीनामा दिला. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणामुळे, राजकीय हक्कांमुळे स्त्रीची पारंपरिक प्रतिमा बदलल्याची दिसते. ह्या सर्व हक्कांची जाणीव डॉ. आंबेडकरांमुळे झाली हे मान्य करावे लागेल.

डॉ. आंबेडकरांना संविधान सभेत पं. जवाहरलाल नेहरूंनी जी उद्दिष्टांचा मांडला होता. त्यात अपेक्षा अशी होती की राज्यांना आर्थिक, सामाजिक आणि राजकीय न्यायाची तत्त्वे व संकल्पना वास्तवात आणता यावीत यासाठी तसा प्रस्ताव हवा होता. या देशात सामाजिक आणि आर्थिक न्यायाच्या प्रस्तावनेसाठी शेती आणि उद्योगांचे राष्ट्रीयीकरण केले जाईल असे स्पष्टपणे प्रस्तावात तरतूद हवी होती. भावी शासन या देशात सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाची स्थापना करू शकते परंतु या चित्र स्पष्ट न झाल्याने डॉ. आंबेडकरांना जी सामाजिक लोकशाही प्रस्थापवयाची होती ते या उद्दिष्टांवरून लक्षात येते.

एक व्यक्ती, एक मूल या तत्त्वांवर आधारित डॉ. आंबेडकरांना राजकीय व्यवस्था अपेक्षित होती. त्यांच्या मते, सर्वांच्या किमान गरजा पूर्ण झाल्या पाहिजे. आपल्या गरजांचा सुरक्षितता प्रत्येक व्यक्तीला मिळाली पाहिजे. प्रत्येकाच्या प्राथमिक गरजा पूर्ण होणे यासाठी प्रत्येक व्यक्तीचे मत हे मुल्यप्रधान मानले पाहिजे तरच लोकशाहीचे महत्त्व प्रत्येक व्यक्तीला वाटेल. प्रत्येकाचा राजकीय सहभाग मुल्यप्रधान पाहिजे. मात्र येथे जन्मधारित दर्जा हाच राजकारणातील सहभाग निर्णायक जेव्हा ठरतो तेव्हा लोकशाहीच्या यशस्वीतेतील एक मोठा अडसर ठरतो.

## ३. डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक लोकशाहीची वैशिष्ट्ये :-

समाजातील एखादा वर्ग शोषित अस्पृश्य म्हणून दडपला गेला तर खरी लोकशाही निर्माण होऊ शकत नाही. डॉ. आंबेडकरांनी सामाजिक परिवर्तनाचे काही मार्ग स्पष्ट केले. त्यातच सामाजिक लोकशाहीची वैशिष्ट्ये आढळतात. ती पुढीलप्रमाणे :-

१. शिक्षणाचा प्रसार - प्राचीन काळापासून उच्चवर्णीय वर्ग हा शिक्षणाच्या कक्षेत आला आहे. अस्पृश्य वर्गाला शिक्षणापासून वंचित केले आहे. त्यांना सुशिक्षित केले तर त्यांचे मानसिक व आर्थिक परिवर्तन होईल. ह्या परिवर्तनासाठी घटनेचे सहाय्य महत्त्वपूर्ण ठरेल. घटनेतील हक्कांना न्यायालयीन संरक्षण दिले जावे.

२. अल्पसंख्यांकांना योग्य स्थान - बहुसंख्याकांचे मत, अल्पसंख्यांकांचे मत यात भेद होऊ नये यासाठी डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र राखीव मतदार संघाच्या रचनेचा आग्रह धरला होता. त्यामुळे खऱ्या अर्थाने सामाजिक लोकशाही प्रस्थापण्यास मदत होईल.

३. आर्थिक व सामाजिक समता - सर्व वर्गांचे समान हितसंबंध जोपासले जावेत. आर्थिकदृष्ट्या कोणत्याही वर्गाची पिळवणूक होणार नाही याची काळजी राजकीय व्यवस्थेने घेतली पाहिजे. भेदाच्या भिंती मोडून हिंदू समाज मुक्त झाला पाहिजे.

४. आर्थिक विकास - भारतात मोठी आर्थिक विषमता आहे. थोड्या लोकांकडे

संपत्ती केंद्रित झाली म्हणून बहुसंख्य लोक गरीब आहेत. विशेषतः दलित व अस्पृश्य अधिक गरीब आहेत. त्यांना रोजगार मिळविण्यात जातीय व्यवस्था आडवी येते. हे गुलामीचे शोषण थांबविण्यासाठी सामाजिक लोकशाही प्रस्थापणे गरजेचे आहे.

या सर्व कारणांचा उपायांचा चिंतनशील विचार करून कृतिशील सामाजिक परिवर्तनाचा मार्गाचा वापर आणि घटनेतील समताधिष्ठित असलेल्या कलमांचा कृतिशिल वापर केल्याशिवाय जनतेत मानसिक परिवर्तन होणे शक्य नाही. सामाजिक समता स्थापण्यासाठी सामाजिक लोकशाहीची गरज डॉ. आंबेडकरांना महत्त्वपूर्ण वाटत होती असे दिसते.

## ७.२.४ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राज्य समाजवादाविषयी विचार :-

डॉ. आंबेडकरांनी भारतातील आर्थिक, सामाजिक विषमतेमुळे राज्य समाजवादाचा विचार केला. समतेवर आधारित समाजाच्या निर्मितीसाठी राज्य समाजवाद हाच एकमेव पर्याय आहे असे त्यांचे मत होते. त्यांनी आपल्या राज्य आणि अल्पसंख्याक  या ग्रंथात राज्य समाजवादाविषयी विचार प्रतिपादीत केले. त्यांनी विषमतेवर आणि अन्यायावर आधारित भांडवलशाहीचा विरोध केला. तसेच मार्क्सवादाचाही विरोध केला. कारण मार्क्सवाद हिंसात्मक विचाराला मान्यता देतो. तरीही मार्क्सच्या ऐतिहासिक संघर्षाचा सिद्धांताने डॉ. आंबेडकर प्रभावित झाले. त्यांच्या मते भारतात लोकशाही प्रस्थापित झाल्यास फक्त स्वातंत्र्यालाच जास्त वाव मिळेल म्हणून त्यांनी समतेच्या स्थापनेसाठी समाजवादी विचारसरणीचा पुरस्कार केला होता. भारतातील गरीब व दलित जनतेची आर्थिक व सामाजिक स्थिती व दारिद्र्य त्यांनी जवळून पाहिले होते. ही आर्थिक व सामाजिक विषमता दूरविण्यासाठी राज्यसमाजवादाचा पर्याय त्यांनी स्वीकारला. त्यांच्या राज्यसमाजवादालाच राज्यशासित समाजवाद असे काही विचारवंत संबोधतात.

भारतातील विषमतेविरूध्द, गरिबी कमी करण्यासाठी सर्वांना सर्वांगीण विकासाची समानसंधी प्राप्त व्हावी यासाठी डॉ. आंबेडकरांनी १९४७ मध्ये घटनासमितीत राज्य समाजवादासंबंधी एक आराखडा सादर केला व तो आराखडा राज्यघटना अंमलबजावणीनंतर दहा वर्षांच्या आत अंमलात आणावा असे मत व्यक्त केले. मात्र तसे झाले नाही. पण त्या आराखड्यातील अनेक बाबी, मार्गदर्शक तत्त्वे घटनेत घेण्यात आल्या. त्यामुळे समता प्रस्थापित होण्यास मदत झाली.

डॉ. आंबेडकरांचा राज्यसमाजवाद व्यक्तीस दारिद्र्य, बेकारी, भीती, टंचाई, यापासून व्यक्तीची मुक्तता मांडणारी ही विचारप्रणाली आहे. सामाजिक न्यायालय आधार अत्यंत ओतप्रोत आहे. मात्र ही विचारप्रणाली मांडताना आर्थिक - दुर्बळ वंचित घटकांना प्राधान्य आणि संपत्तीचे केंद्रीकर आणि खाजगी मालमत्तेमुळे होणारे नुकसान, त्यांना राज्याने निमंत्रक आणले पाहिजे. औद्योगिकीकरणात भर पडली पाहिजे यासाठी त्यांना राज्यसमाजवाद आवश्यक वाटतो. त्यांच्या मते राज्यसमाजवादाचा उद्देश राज्याने सनदशीर मार्गाने कायद्याच्या आधारे विषमता नाहीशी करावी, वंचित वर्गांना आर्थिक सामाजिक क्षेत्रात सवलती

द्याव्यात.

राज्यसंस्था ही कल्याणकारी असल्याने राज्याने आपल्या नागरिकांच्या सामुदायिक हितासाठी कार्यरत राहिले पाहिजे ही राज्यसमाजवादी विचारप्रणाली आहे. १९ व्या शतकात उदयास आलेली विचार प्रणाली व्यक्तिच्या स्वातंत्र्याचा अतिरेकपणा आणि मार्क्सवाद यांतील मधील विचार मध्ये राज्यसमाजवाद असे मानले जाते. वर्गसंघर्ष ठेवली वर्गांमध्ये सहकार्य म्हणजे श्रीमंत-गरीब, कामगार, भांडवलदार, मजूर, मालक, श्रीमंत-कारखानदार यांत संघर्ष न आणता सहकार्यांची बिजे रोवली. बंधनाचा अभावातील स्वैराचार न आणता बंधनयुक्त अधिकारांचा वापर, राज्याचे नियंत्रण या उद्देशांना महत्त्व दिले. न्याय आणि हक्क यांना महत्त्व देऊन स्पर्धेत सहकार्याच्या भावनेत महत्त्व दिले. राजकीय समता आणावयाची असेल तर आर्थिक समांतर निर्माण होणे गरजेचे आहे. प्राक्षियाच लोकशाही शासनव्यवस्थेत राज्य समाजवाद निर्माण होते. अशक्य हे वेगवेगळ्या विचारवंताच्या लिखाणातून स्पष्ट झाल्याचे दिसते. संसदीय लोकशाही समाजवादाची जोड देऊन त्यावर आधारित नवी समाजरचना निर्माण झाली पाहिजे हे राज्य समाजवादायाचा राज्य समाजवादी आपली विचारप्रणाली मांडतात.

डॉ. आंबेडकर यांनी घटना समितीला सादर केलेल्या निवेदनामध्ये राज्यघटनेत पुढील बाबींची नोंद झाली पाहिजे अशी मागणी केली. या दृष्टीने आंबेडकर यांच्या योजनेत खालील स्पष्ट तरतुदी आढळतात.

१. सार्वजनिक हिताच्या दृष्टीने जे महत्त्वपूर्ण उद्योगधंदे असतात अशा उद्योगधंद्यांची मालकी व नियंत्रण राज्याचे असले पाहिजे. मध्यम हितकारी उद्योगधंदे असतील त्याचे संपन्न राज्यात निर्माण केलेल्या महामंडळातर्फे केले जावे.

२. प्रत्येक नागरिकाची तिच्या कुवतीनुसार, तिच्या आर्थिक दर्जानुसार राज्याने सक्तीने जीवनविमा करून घेतला पाहिजे.

३. व्यक्तीच्या मालकीची जमीन सार्वजनिक कार्यासाठी वापरावयाची असेल अशावेळी राज्याने संबंधित व्यक्तीला तिचा योग्य तो मोबदला दिला पाहिजे.

४. सर्व शेतजमिनीचे राष्ट्राची मुख्य करून शेतजमीन राज्याचा उद्योगधंदा व्यवसाय झाला पाहिजे. उद्योगधंदे, विमा व शेतजमीन यांवरील खाजगी मालकी राज्याने काढून घेतले पाहिजे. राज्य जेव्हा जमीन संपादीत करेल तेव्हा ती जमीन व्यक्तीला परत घेता येणार नाही. तो तिचा हक्क नसेल.

५. शेतीच्या संदर्भात खेड्यातील कुटुंबांना कूळ म्हणून राज्याच्या मालकीची शेती करण्यास दिली जाईल. मात्र शेती ही सामुदायिकरित्या कसली जावी, शासनाच्या नियमानुसार तिचे कसण्याचे स्वरूप असेल, कुळांना आपल्या श्रमाचा नियमानुसार हिस्सा दिला जाईल, शेती कसणाऱ्यास कोणताही भेदभाव ठेवला जाणार नाही. यात जात, वर्ग, वंश, मालक, मजूर असा कोणताच भेदभाव राहणार नाही. शेती करण्यासाठी शासनाकडून सर्वतोपरी आर्थिक सहाय्य राहील, याचबरोबर त्यांतील नियमांचे उल्लंघन झाले तर संबंधित व्यक्तीला शिक्षा देईल.

६. या सर्व तरतुदी अंमलात आणण्यासाठी राज्यघटनेची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर दहा वर्षांच्या आत ती लागू करण्याविषयी नियोजन करण्यात येईल.

हे सर्व नियोजन करण्याचा मूळ उद्देश डॉ. आंबेडकरांचा असा होता की प्रत्येक व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्याचा वापर करता यावा. अधिकारांचा वापर करताना व्यक्तीला कोणतीही भीती राहता कामा नये. त्याच्या संपूर्ण गरजा पूर्ण झाल्या पाहिजेत. राज्यघटनेत या गोष्टींचा समावेश केला तर राज्यसमाजवादाची अंमलबजावणी करता येईल असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. मात्र तसे होऊ शकले नाही. राज्यघटनेत समाजवाद ह्या शब्दाचा स्वीकार करण्याबाबत घटनासमितीत मतांतरे होती. आर्थिक प्रणाली म्हणून पं. नेहरू यांचा विरोध होता. याबाबत डॉ. आंबेडकरांनी यास पुष्टी देऊन मत मांडले की राज्याचे धोरण कोणते असावे, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या समाज कसा संघटित करावा हे कालमान व परिस्थितीनुसार जनतेला तो अधिकार असावा. राज्यघटनेत ही बाब येऊ शकणार नाही कारण त्यामुळे लोकशाहीस धोका पोहचू शकेल. परिस्थितीनुसार निर्णय बदलण्याचा अधिकार जनतेला राहील तर विकासाचे विविध मार्ग आणता येईल. तसेच मार्गदर्शक तज्ज्ञांमध्ये समाजवादाच्या दिशेने नेणाऱ्या या बाबींचा समावेश आहे. यांबाबतही घटनासमितीच्या सदस्यांमध्ये मतांतरे होती.

डॉ. आंबेडकरांनी शेड्यूल कास्ट्स फेडरेशनच्या वतीने घटनासमितीस सादर केलेल्या अहवालात त्यांची योजना समाजवादी अर्थव्यवस्था आणि संसदीय राज्यव्यवस्था यांतील अडचणी लक्षात घेऊन भारताची अर्थव्यवस्था राज्यसमाजवादाकडे वाटचाल करणारी असावी यांबाबत योजना मांडलेली होती. यांत मूलभूत हक्कांचे महत्त्व लक्षात घेऊन ही विचारप्रणाली मांडली आहे.

## १. डॉ. आंबेडकरांच्या राज्यसमाजवादाची वैशिष्ट्ये :–

१. शेतीचे राष्ट्रीयीकरण – शेतीचे राष्ट्रीयीकरण करून शेतीस राज्यव्यवसायाचा दर्जा द्यावा. शेतीची मालकी राज्याकडे देण्यात यावी. भारत हा शेतीप्रधान देश असून मागासलेल्या अवस्थेत शेतीची अवस्था आहे. तरच सावकार व मोठ्या जमीनदारांकडून शेतकऱ्यांची पिळवणूक होते त्यामुळे अधिक कष्ट करूनही दारिद्र्यात वाढ होत जाते. असे मत डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले होते. त्यांच्या मते परिणामी उत्पादन क्षमता घटते यांवर उपाय म्हणून सामूहिकरित्या जमीन कसली जावी व उत्पन्न सर्वांना समान देण्यात यावे. यांत कोणत्याही प्रकारचा भेदभाव, विषमता येणार नाही याची जबाबदारी राज्याने बाळगावी.

२. उत्पादन व वितरणावर राज्याचे वितरण – समतेवर आधारित समाज जर निर्माण करावयाचा असेल तर समाजाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी उत्पादन व वितरण पद्धतीवर राज्याने नियंत्रण ठेवावे. त्यामुळे राज्यातील प्रत्येक व्यक्तीस योग्य तऱ्हेने आपल्या गरजा पूर्ण करता येतील. कोणाचीही पिळवणूक होणार नाही. अर्थव्यवस्था ही समतोलावर आधारीत राहील. शिवाय भांडवलशाहीच्या निर्मितीस लगाम बसेल. यांचबरोबर उत्पादन व वितरण व्यवस्थेवर सार्वजनिक नियंत्रण राहिल्यामुळे पिळवणुकीपासून सर्व समान्य जनतेचे रक्षण होईल.

३. उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण – डॉ. आंबेडकरांनी उद्योगधंद्यातील मालकी विशिष्ट घटकांकडे असण्याचा विरोध केला यांत पिळवणूक ही सर्वसामान्य जनतेची, श्रमिकाची जी मालकवर्गाकडून होते, तो मालक वर्ग सर्वसामान्य गरीब जनतेच्या सोयी–सुविधा पुरविण्याबाबत उदासीन असतो. यावर उपाय म्हणून उद्योगधंद्यावर राज्याची मालकी असावी असे ते म्हणतात. राज्याच्या मालकीचे उद्योग झाल्यास नफा हा उद्योगधंद्याचा उद्देश राहणार नाही.

४. जातीभेद समाप्ती – प्रत्येक व्यक्तीस त्याच्या गुणांनुसार काम हा नियम डॉ. आंबेडकर सांगतात. भारतातील समाजात व्यक्तीचा व्यवसाय हा गुणाऐवजी जन्म व जातीनुसार ठरतो. यामुळे जातीतील रचना जास्त भक्कम होते. यांवर उपाय म्हणजे व्यक्तीच्या गुणवत्तेनुसार काम उपलब्ध करून घेण्यासाठी उद्योगधंद्यावर राज्याचे नियंत्रण असावे विशिष्ट घटकांकडे संपत्ती केंद्रित होऊन विषमता वाढीला लागते. डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या 'स्टेट ॲण्ड मायनॉरिटीज' या ग्रंथात भारतातील केंद्रीयकरणाच्या प्रवृत्तीमुळे दारिद्र्यात कशी वाढ झाली याचा आढावा घेतला. म्हणून राज्यातील विकेंद्रीमुळे साध्य होईल असे त्यांचे मत होते.

डॉ. आंबेडकरांचा स्वातंत्र, समता आणि बंधुता यांवर विश्वास होता. त्यांनी भारतीय समाजाचे सर्वांगीण परिवर्तन घडवून आणण्यासाठी राज्य समाजवादाचा पुरस्कार केला. राज्याने लोकांच्या आर्थिक जीवनाचे नियंत्रण करावे, त्यालाही उत्पादन व वितरणावर राज्याने नियंत्रण ठेवून संपत्तीचे विकेंद्रीकरण साध्य करावे तसेच आर्थिक व सामाजिक विषमतादेखील नष्ट करावी. राज्यातील सर्व संपत्तीवर राज्याची मालकी प्रस्थापित झाल्याने समतेची निर्मिती होईल. गरीब व दलित जनतेस विकासाची समानसंधी प्राप्त होऊन जातीव्यवस्था व सामाजिक विषमतेला पायबंद घातला जातो.

त्यांच्या मते राज्य समाजवादाची रूपरेषा राज्यघटनेत समाविष्ट करावी. यात राजकीय बहुमतामुळे बदल होऊ शकणार नाही. सत्तारूढ पक्ष जे असतील त्यांना बंधनकारक असुदे याच मार्गांनी व्यक्तीचे हक्क सुरक्षित ठेवता येतील असे त्यांना वाटते. कारण त्यांच्या मते समाजाचा आर्थिक ढाचा यावरच व्यक्तिस्वातंत्र्य अवलंबून असते.

अशारितीने डॉ. आंबेडकरांचा राजकीय मार्ग हा समन्वयाचा मार्ग आहे. उदारमतवादाचा समाजवादाशी, राजकीय लोकशाहीचा आर्थिक, सामाजिक लोकशाहीशी व्यक्ती स्वातंत्र्याचा नियोजनपूर्वक अर्थव्यवस्थेशी समन्वय घालण्याचा प्रयत्न राज्यसमाजवादातून मांडण्याचा प्रयत्न होता.

## ७.२.५ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मार्क्सवादाविषयी विचार :–

डॉ. आंबेडकरांनी मार्क्सवादाचे परीक्षण करताना विरोधी मते मांडलेली दिसतात. भारतातील दलित समाज हजारो वर्षापासून शोषित जीवन जगत होता. बौद्ध धर्मात प्रवेश करण्यापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अस्पृश्य समाजाला निश्चित दिशा द्यावयाची होती. कारण शोषित समाजास कोणत्याही टोकाच्या विचारसरणीचे भक्षक होऊ द्यायचे

नव्हते. मार्क्सवादाविषयी त्यांचा विरोध वैचारिक पातळीवर होता. डॉ. आंबेडकरांच्या मते साम्यवाद भांडवलशाहीच्या विरोधातून निर्माण झाला. समाजवादाने रशियात आर्थिक समता निर्माण करण्यात यश मिळविले असले तरी डॉ. आंबेडकरांनी त्यास विरोध केला.

डॉ. आंबेडकरांच्या मते भारतातील विषमतेचे मूळ चातुर्वर्ण्य व्यवस्थेत आहे. हजारो वर्षांपासून अस्पृश्यांवर होत असलेल्या अन्याय, शोषण, हक्क इ. पिळवणुकीच्या परिणामामुळे त्याविरुध्द बंड करण्याविषयीची जनजागृती त्यांच्यात हळूहळू निर्माण होत आहे. अशा प्रकारच्या समाज साम्यवादी विचारसरणीस अनुकूल असतो म्हणून तो साम्यवादाचा भक्षक बनू नये म्हणून डॉ. आंबेडकरांनी साम्यवादाचा प्रखर विरोध केला. कार्ल मार्क्सच्या विचारांना त्यांनी पुढील कारणांमुळे विरोध केल्याचे दिसते.

१. व्यक्तीच्या हक्क व स्वातंत्र्याची गळचेपी – साम्यवादात व्यक्तीला स्वातंत्र्य राहात नाही. व्यक्तीचे स्वअस्तित्व राज्यात विलीन होते. व्यक्तीला यंत्रवत काम करावे लागते. साम्यवादी तत्त्वज्ञान भांडवलशाहीच्या कचाट्यातून व्यक्तीची सुटका करण्यासाठी निर्माण झाले मात्र साम्यवादी व्यवस्थेत भांडवलदारांऐवजी पक्षाची पकड एवढी जबरदस्त होती की, ज्या कारणांसाठी भांडवलशाहीला विरोध केला ती कारणे नष्ट न होता रूप बदलते. मात्र व्यक्तीला हा अधिकार राहात नाही.

डॉ. आंबेडकर लोकशाही व्यवस्थेचे पुरस्कर्ते होते. व्यक्तिस्वातंत्र्य त्यांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ाहोते. त्यामुळे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाची संधी केवळ लोकशाही शासनात मिळते. यासाठी त्यांनी साम्यवादाचा विरोध केला. यासाठी डॉ. आंबेडकरांनी कामगार संघटनांना मार्गदर्शन करताना कम्युनिस्टांच्या कोणत्याही थापेबाजीस बळी पडू नका, विशेषतः गोदी कामगारांमधील अस्पृश्य कामगारांच्या संघटनेस ते म्हणतात कामगार संघाचा प्रमुख लोकांच्या मार्गदर्शनाखाली लढा, यशस्वी करा. कारण त्यांच्यामते साम्यवादाचा पुरस्कार केल्यास अस्पृश्य समाजात एका गुलामगिरीतून काढून दुसऱ्या गुलामगिरीत ढकलल्यासारखे होईल त्यामुळे त्यांनी सर्व प्रकारे विचार करून साम्यवादाचा विरोध केला.

२. साम्यवादात धर्माला स्थान नाही – कारण साम्यवादाच्या मते धर्म हे शोषणाचे मूळ आहे. धर्मामुळे माणूस पराधीन बनतो. सामर्थ्य हरवून बसतो. जसे आहे त्यात समाधान मानण्याची प्रवृत्ती वाढते. परिणामतः त्याचा भौतिक विकास होत नाही. त्यामुळे साम्यवाद धर्माला अफूची गोळी मानतो. धर्मामुळे व्यक्तीस एक नशा येते. डॉ. आंबेडकर यांना हे तत्त्वज्ञान मान्य नव्हते. त्यांची धर्मावर श्रद्धा होती. म्हणूनच त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. ते म्हणतात साम्यवादी तत्त्वज्ञानाला चोख उत्तरे देणारा बौध्द धर्म आहे. जसे साम्यवाद शोषणाच्या विरुद्ध आहे. तसाच बौद्ध धर्म शोषणविरहित समाजाच्या स्थापनेचा पुरस्कर्ता आहे. संपत्तीचे केंद्रीकरण जसे साम्यवादाला मान्य नाही तसेच संपत्ती संग्रहाच्या विरुद्ध बौद्ध धर्म आहे. साम्यवाद हिंसेच्या मार्गाने समाजपरिवर्तन घडवून आणू इच्छितो. याउलट बौद्ध धर्म प्रेमभावनेने समाज परिवर्तन घडवू इच्छितो. अशाप्रकारे बौद्धधर्म साम्यवादाला पर्यायी तत्त्वज्ञान देणारा आहे, असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.

**३. साम्यवादी तत्त्वज्ञान हिंसेला नाकारत नाही –**

~~वर्ग संघर्षाच्या सिद्धांतात विकासासाठी संघर्षाला मानते. मानवी इतिहास हा वर्गसंघर्षावर~~

आधारित आहे असे समाजवादी तत्त्वज्ञान मानते. मानवी इतिहासात केवळ भौतिक आणि आर्थिक गोष्टींना महत्त्व असते. हे साम्यवादी तत्त्वज्ञान डॉ. आंबेडकरांना मान्य नव्हते. त्यांच्यामते मानवीजीवन केवळ आर्थिक गोष्टींनीच नियंत्रित होत असते. आर्थिक घटक त्यांपैकी एक आहे. पण साम्यवादाने केवळ त्यात एकमेव घटकास महत्त्व देऊन इतर महत्त्वाच्या घटकांकडे दुर्लक्ष केल्यामुळे त्यांना साम्यवादी तत्त्वज्ञान मान्य नव्हते. समाजाच्या विघटन प्रक्रियेत साम्यवादी तत्त्वज्ञानामुळे भर पडेल असे त्यांचे मत होते.

**४. प्रभावी व्यक्तींच्या हाती सत्ता केंद्रीत होत –**

साम्यवादात एका पक्षाची हुकूमशाही निर्माण होते. डॉ. आंबेडकरांना लोकशाही व्यवस्थेबद्दल आकर्षण होते. एका पक्षाची हुकूशाही प्रस्थापित झाल्यास लोकशाहीची पाळेमुळेच नष्ट होतात. त्यामुळे त्यांनी समाजवादाला विरोध केला. साम्यवादात एका पक्षाची हुकूमशाही निर्माण होते. कारण पक्षातील सामान्य कार्यकर्त्यांना विश्वासात घेत नाही. राजकीय सत्ता केवळ मूठभर प्रभावी व्यक्तींच्या हाती केंद्रीत होते. त्यामुळे कामगारांच्या हुकूमशाहीचे केवळ स्वप्नच राहाते. डॉ. आंबेडकरांना सामान्यातल्या सामान्य माणसाला राजकीय सत्तेची दरवाजे मोकळे पाहिजे होते. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी साम्यवादाला विरोध करून लोकशाहीची निवड केली.

**१. डॉ. आंबेडकर आणि कार्ल मार्क्स यांच्या विचारांतील फरक :–**

१. राज्यसंस्था – डॉ. आंबेडकरांनी राज्याच्या उपयुक्ततेवर भर दिला आहे. राज्य आवश्यक असले तरी ते समाजापेक्षा श्रेष्ठ नाही. असे त्यांचे मत होते. मनुष्याच्या आवश्यकतेमुळे राज्याची निर्मिती झाली. यावर त्यांचा विश्वास होता. त्यामुळे त्यांनी राज्याच्या दैवी उत्पत्ती सिद्धांताचा विरोध केला. व्यक्तीचा विकास साध्य करण्याचे राज्य हे साधन आहे. असे त्यांचे मत होते. त्यामुळे त्यांनी राज्याला आवश्यक संस्था मानले. राज्याचे कार्य शांतता आणि सुव्यवस्था स्थापित करण्यापर्यंतच मर्यादित असू नये तर राज्याने लोककल्याणकारी भूमिकाही घ्यावी असे डॉ. आंबेडकरांना वाटते.

कार्ल मार्क्स राज्य हे वर्गसंघर्षाच्या उत्पत्तीचे ठिकाण मानून राज्यसंस्थेचे अस्तित्व नाकारले. राज्य हे शोषिक वर्गाचा आधार असून राज्य हे एका अर्थाने दुसऱ्या वर्गाचे शोषण करण्याचे साधन आहे. श्रीमंत वर्गाने आपले वर्चस्व इतरांवर कायम ठेवण्यासाठी राज्याची निर्मिती केली. राज्य म्हणजे विशिष्ट वर्गाचे हितसंबंध जोपासणारे आहे. राज्य हे भांडवलदारांच्या रक्षणाचे साधन आहे. असे मार्क्स मानतो. म्हणजेच राज्यसंस्थेच्या अस्तित्वाविषयी डॉ. आंबेडकर व मार्क्स यांच्या विचारात मोठी तफावत आहे.

२. लोकशाही विचारसरणी – डॉ. आंबेडकरांना लोकशाही ही राजकीय बरोबर सामाजिक व आर्थिक अभिप्रेत होती. लोकशाही शासनाचा पुरस्कार करताना समाजाचे परिवर्तन घडून आणण्यासाठी लोकशाही शासनपद्धती सर्वोत्तम आहे. व्यक्ती स्वातंत्र्यासाठी केवळ लोकशाही एकमेव मार्ग आहे. असे त्यांचे मत होते. याउलट कार्ल मार्क्सने लोकशाहीचा विरोध करून समतेवर आधारित राज्यवादी विचारसरणी प्रतिपादन केली. मार्क्स म्हणतो, लोकशाही व्यक्ती स्वातंत्र्यामुळे विषमत निर्माण होते. म्हणून मार्क्सने

लोकशाहीला विरोध केला.

३. राष्ट्रवाद – डॉ. आंबेडकरांच्या विचारसरणीत राष्ट्रवादाला महत्त्व आहे. या विचारास सामाजिक आधार आहे. मानव हिताची विचारांबरोबर राष्ट्रहिताचा विचार डॉ. आंबेडकरांच्या विचारसरणीत प्रत्येक पैलूत आहे. सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक मूल्यांची विचारसरणी राष्ट्रवादात ते महत्त्व देतात. तर राष्ट्रवाद ही भावनिक बाब असून मार्क्सवादात कुठेही स्थान राष्ट्रवादाला नाही.

४. धर्म – माणसाच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी धर्म डॉ. आंबेडकरांना आवश्यक वाटतो. मात्र धर्मात उच्च निचता नसावी. स्वातंत्र्य व समानतेला स्थान असावे. धर्माने सर्व माणसांना समान न्याय द्यावा. हा त्यांचा धर्माकडे पाहण्याचा दृष्टिकोन होता. डॉ. आंबेडकरांची बौद्ध धर्मावर नितांत श्रद्धा होती. साम्यवादाला चोख उत्तर शकेल असा धर्म म्हणजे बौद्ध धर्म असे त्यांना वाटे. धर्म माणसाच्या आत्मीक समाधानासाठी अत्यंत आवश्यक आहे.

कार्ल मार्क्सचे धर्माबाबतचे मत डॉ. आंबेडकरांना मान्य नव्हते. मार्क्सच्या मते धर्म हा सर्व शोषणाचे व विषमतेचे मूळ आहे. धर्म माणसाला विवेकाची ग्लानी आणतो. तसेच धर्म माणसाला स्थितिशील बनवितो. हे मार्क्सचे विचार डॉ. आंबेडकरांना मान्य नव्हते.

५. क्रांतीचे तत्त्वज्ञान – डॉ. आंबेडकरांनी सामाजिक व आर्थिक परिवर्तनास क्रांती मानून त्यासाठी शांततेच्या मार्गाचा अवलंब केला. मात्र मार्क्सने क्रांतीस मानवी इतिहासाचे गतितत्त्व मानले. मार्क्सने श्रमिकांचे शोषण थांबविण्यासाठी क्रांती आवश्यक मानली. परिवर्तनासाठी हिंसेस महत्त्वाचे मानले.अशाप्रकारच्या हिंसेस डॉ. आंबेडकरांचा विरोध होता.

**२) डॉ. आंबेडकर आणि कार्लमार्क्स यांच्या विचारातील साम्य :–**

१. शोषणाविरुद्धलढा – कार्ल मार्क्सने इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यात मानवाचे आर्थिक शोषण होते, असे सांगितले. श्रीमंत वर्ग गरीब वर्गाचे शोषण करतो असे स्पष्ट करून आपले संपूर्ण साम्यवादी तत्त्वज्ञान शोषणा विरुद्ध मांडले तर डॉ. आंबेडकरांनी भारतातील पीडित, शोषीत समाजास न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष उभा केला. म्हणून दोघेही राजकीय विचारवंताचे उद्दिष्ट एकच होते. ते म्हणजे शोषणाविरुद्ध लढा होय.

२. समतेवर भर – डॉ. आंबेडकरांनी भारतातील विषमतेवर आधारित चातुर्वर्ण्य व्यवस्थेविरुद्ध लढा उभारून सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी भर दिला. त्यांनी भारतीय समाजातील विशेषतः हिंदू धर्मातील ब्राह्मणशाहीमुळे समाजात निर्माण झालेली उच्च निचता संपविण्यासाठी संघर्ष उभारला तर कार्ल मार्क्सने आपले संपूर्ण साम्यवादी तत्त्वज्ञानच समतेवर आधारित मांडले. साम्यवादी अवस्थेत कोठेही श्रेष्ठ कनिष्ठ असणार नाही. समाजविरहित, राज्यविरहीत, समताधिष्ठित अशा साम्यवादी अवस्थेची मार्क्स कल्पना मांडतो.

३. संघर्षावर भर – अन्याय, अत्याचार या विरुद्ध दोघेही राजकीय विचारवंतानी संघर्ष मानला. मार्क्सने तर वर्ग संघर्षातून साम्यवादी अवस्था प्रस्थापित केली असे म्हटले. या संघर्षासाठी मार्क्सने हिंसेचा आधार घेतला. तर डॉ. आंबेडकरांनी आपल्या शोषित बांधवांना

आपले हक्क मिळविण्यासाठी व समाजातील विषमता कमी करण्यासाठी संघर्ष आवश्यक मानला.

साम्यवादी तत्त्वज्ञान संघर्षावर भर देते. संघर्षाचे कारण आर्थिक मानते. मार्क्सवादी तत्त्वज्ञान अटळ आर्थिक वर्ग संघर्ष आणि कामगारांची वर्गीय हुकूमशाही मात्र डॉ. आंबेडकरांना मान्य नव्हती. कामगारांच्या आर्थिक शोषणाची कल्पना त्यांना मान्य होती. मात्र हिंसाचाराचा मार्ग मान्य नव्हता.

**३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मार्क्सवादावरील टीका :-**

१. धर्माचे स्थान नाकारणे हे चुकीचे - मार्क्स धर्माला अफूची गोळी मानतो. धर्म म्हणजे एक प्रकारची नशा आहे. नशा साधारणतः दुःख व चिंता विसरण्यासाठी केली जाते. दुःखाला विसरण्यासाठी धर्माचा आसराही घेतला जातो. मनुष्याच्या धार्मिक भावनेचा गैरफायदा भांडवलदार घेतात व शोषण करून दुःख कमी करण्याऐवजी वाढविले जाते. लोक धर्माच्या नशेतच राहतात व सुखी होण्याचे केवळ स्वप्नच पाहतात. यातच भांडवलदारांचे हित असल्याने ते धर्मास महत्त्व देतात त्यामुळेच मार्क्स धर्माला स्थान देत नाही. मात्र डॉ. आंबेडकर धर्मासंबंधी आपली वेगळी विचारसरणी मानतात. त्यांच्यामते धर्म माणसाच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी आवश्यक आहे. धर्मामुळे आत्मसमाधान मिळते. यासाठी त्यांनी धर्माची आवश्यकता मानली मात्र त्यासाठी धर्मात उच्च निचता नसावी. विषम रचना नसावी समाजाचा विकास होण्यासाठी समतेवर आधारित अशा डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धर्माची निवड केली.

२. राज्यसंस्थेचे अस्तित्व मानणे चुकीचे - राज्य हे श्रमिक शोषण करण्याचे भांडवलदार ~~वर्गाचे एक साधन आहे असे मानून मार्क्सने राज्यसंस्थेचे अस्तित्व नाकारले. श्रीमंत वर्गाने~~ आपले इतरांवरील वर्चस्व कायम ठेवण्यासाठी राज्याची निर्मिती केली. राज्य म्हणजे विशिष्ट वर्गाचे हितसंबंध जोपासणारे व भांडवलदारांच्या रक्षणाचे साधन आहे. यावर डॉ. आंबेडकरांनी टीका केली. ते म्हणतात, राज्य मनुष्याच्या गरजा पूर्ण करणारी एक उपयुक्त संस्था आहे. राज्ये जनतेच्या आवश्यकतेतून निर्माण झाली आहे. राज्याचे कार्य शांतता व सुव्यवस्था स्थापित करण्याबरोबरच लोककल्याण साध्य करणेसुद्धा महत्त्वाचे कार्य आहे.

३. परिवर्तनासाठी हिंसा करणे योग्य नाही - इतिहासाची भौतिकवादी मीमांसा मांडताना मार्क्स इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यात परिवर्तनाचे विचार मांडतो. यात आर्थिक निकष मांडतो. मात्र या परिवर्तनासाठी हिंसेचा आधार घेतला. या हिंसात्मक मार्गाने होणाऱ्या परिवर्तनाच्या विचारावर डॉ. आंबेडकरांनी टीका केली. डॉ. आंबेडकरांचा घटनात्मक मार्गावर विश्वास होता. सामाजिक लोकशाही प्रस्थापण्याचा आग्रह धरून राज्यात शांततेच्या मार्गाने व निवडणुकीच्या मार्गाने लोक शासनात परिवर्तन करू शकतात. संसदीय पद्धतीच्या यशालाही घटनात्मक आणि शांततामय मार्गाच्या उपयोगावर डॉ. आंबेडकरांनी भर दिला आहे. सत्तेमधील परिवर्तनदेखील घटनात्मक आणि शांततेच्या मार्गाने झाले पाहिजे म्हणून मार्क्सचा हिंसेचा मार्ग डॉ. आंबेडकरांना अमान्य आहे.

४. मार्क्सचा शोषणाबाबत एकांगी विचार - मार्क्समते जगात पिळवणूक चाललेली

आहे. भांडवलदारांकडून श्रमिकांची पिळवणूक होत आहे. यातून जनसमुदायाला गुलाम बनविले जाते. गुलामगिरी ही शेवटी यातना, दुःख व गरीबी यांच्या निर्मितीस कारणीभूत ठरते. यासाठी पिळवणूक करणारा त्याला प्रतिबंध करण्यासाठी वैयक्तिक मालमत्तेवर प्रतिबंध हवा. कारण उत्पादनातील अतिरिक्त संपत्ती श्रीमंत, भांडवलदार, मालकवर्ग घेतो. जी अतिरिक्त धनसंपत्ती मजुरामुळे, श्रमिकामुळे जी मिळते त्यात मजुराला वाटा नसतो. हे थांबविण्यासाठी श्रमिकाचे, कामगारांचे, गरीब वर्गाचे जे शोषण होत आहे, हे थांबविण्यासाठी ~~श्रमिकांची हुकूमशाही सत्तेचे केंद्र त्यांच्या हाती यावे हे मार्क्सचे सिद्धांत डॉ. आंबेडकर~~ नाकारतात. हे तत्त्वज्ञान बुद्धाने २५०० वर्षांपूर्वीच सांगितले आहे. जगात दुःख आहे हे बुद्धाने प्रथम सांगितले. मार्क्सने हेच पिळवणुकीच्या रूपाने मांडले. बुद्धाने वैयक्तिक मालमत्ता मर्यादित मानली. बौद्धाने वैयक्तिक मालमत्ता नाकारली यात मार्क्स व बुद्ध यात साम्य आहे. मात्र डॉ. आंबेडकरांच्या मते काळ, परिस्थिती व मानवी जीवनाचा विकास यांचा विचार करता वैयक्तिक मालमत्ता अधिकार सामान्य व्यक्तीस असावी. आवश्यक गरजा भागविण्यासाठी मालमत्ता असावी म्हणून मार्क्सचा शोषणाचा विचार एकांगी ठरतो. मार्क्स हुकूमशाही पद्धतीने कामगाराचे राज्य मागतो. त्याशिवाय भांडवलशाही नष्ट होणार नाही हे मार्क्स हे उत्तर देताना यांस किती कालावधीपर्यंत असावा यात निश्चीत उत्तरे मिळत नाही.

**४) मार्क्सवादास पर्याय डॉ. आंबेडकरांची घटनात्मक लोकशाही :-**

डॉ. आंबेडकरांनी घटनात्मक राज्यसमाजवाद, संसदीय लोकशाही मार्गाचा स्वीकार केला. देशातील राजकीय स्थित्यंतर संसदीय मार्गाने व्हावे या मध्यम मार्गातून नागरिकांना आर्थिक अधिकार व सरकारकडून मागण्या पूर्ण करण्याचे हक्क प्राप्त होते. त्यांच्यामते बुद्ध आणि मार्क्स यांचे साम्य एकवेळ एक मानता येईल. मात्र साध्य करण्याचे मार्ग मात्र वेगळे होते. डॉ. आंबेडकरांच्या मते बुद्धाचा मार्ग चांगला म्हणून त्यांनी आपले तत्त्वज्ञान मांडताना बुद्धाची तत्त्वे समावेश केली. डॉ. आंबेडकरांनी मार्क्सने राज्यसंस्था नाकारून जी वर्ग विरहित समाजरचना मांडली त्यावर कठोर टीका केली. त्याचबरोबर नागरिकांच्या हाती असलेल्या आर्थिक व सामाजिक अधिकार एकवटलेली सामाजिक लोकशाहीचा सिद्धांत मांडला कारण त्यात फक्त राजकीय स्वातंत्र्य अभिप्रेत नाही. तर समाज व आर्थिक सामाजिक दृष्टीने स्वतंत्र्य व्हावा हे अभिप्रेत आहे. कारण भारतीय समाज हजारो वर्षांपासून स्वराज्यवटीच्या गुलामगिरीत होता. तो मुक्त व्हावा म्हणून त्यांनी सामाजिक लोकशाहीवर भर दिला. मार्क्स येथे फक्त परिवर्तनात आर्थिक बाबींनाच महत्त्व देतो. भारताच्या संदर्भात मार्क्सचा साम्यवाद लागू होऊच शकत नाही. भारताच्या रचनेत विषमतेमुळे चातुर्वर्ण्य व्यवस्थेत आहे. साम्यवादात एकवेळ समता आढळेल मात्र स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या तीन तत्त्वांचा वापर भारतीय समाजासाठी बुद्धाच्या तत्त्वांनुसार मिळेल असा डॉ. आंबेडकरांचा विश्वास होता.

## ७.२.६ डॉ. आंबेडकरांचा घटनावाद :-

राज्यघटना म्हणजे नियमांचा संग्रह तर घटनावाद म्हणजे नियमांच्या आधारावर राज्यकारभार चालणे. तसेच सरकारचे अधिकारांचे स्वरूप हे मर्यादित व नियंत्रित सरकार होय. डॉ. आंबेडकरांनी भारतीय राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीनुसार घटनावाद स्वीकारला त्यांनी राजकीय सामाजीक श्रेष्ठीजन तसेच भारतीय राजकीय विषमता याविरुद्ध नागरीकांचा हक्क व स्वातंत्र्य यांची जपवणूक समता प्रस्थापित करण्यासाठी मर्यादित शासनाचा पुरस्कार केला.

**१. डॉ. आंबेडकरांचा घटनावादाचा अर्थ :-**

समाजातील विषमता कमी करण्यासाठी जनहितासाठी शासनाच्या सत्तेवर प्रतिबंध व नियंत्रण आणणे तसेच संविधानातील नियमांच्या आधारे राज्यकारभार करणे म्हणजे घटनावाद होय. एकूणच मर्यादित सरकार आणि लोकांच्या निष्ठा यांनी मिळून बनलेल्या शक्तीने शासन नियंत्रित करणे म्हणजे घटनावाद होय.

डॉ. आंबेडकरांनी समतेची प्रस्थापना व अल्पसंख्याकांच्या हितरक्षणासाठी घटनावाद स्वीकारला. भारतीयसमाज चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर आधारित होता. ज्या व्यवस्थेचा पाया विषमतेने भरलेला होता. म्हणून डॉ. आंबेडकरांना माहीत होते की, इंग्रज गेल्यानंतर जे शासन प्रस्थापित होईल त्यात बहुजन समाजाला न्याय मिळाला पाहिजे. म्हणून त्यांनी कायद्यासमोर सर्व समान असले पाहिजे यावर भर दिला. संविधान मंजुरीच्या काळात जे प्रश्न समस्या, ज्या चर्चा उपस्थित झाल्या त्यावर उत्तर देताना. तसेच त्या आधी डॉ. आंबेडकरांनी भारतीय संविधानाचा जो दृष्टिकोन स्पष्ट केला आहे जो प्रामुख्याने घटनावाद म्हणून ओळखला जातो. त्यांनी जगातील विविध घटनांचा अभ्यास करून घटनासमितीत चर्चेच्या वेळी केलेले युक्तिवाद येथे महत्त्वाचे आहे.

घटना निर्मिती करताना मनुष्यातील प्रत्येक तरतूद करताना त्यांनी मर्यादित शासनाचा पुरस्कार केला होता. कारण त्यांना दलित, गरीब समाजाचे हितसंबंध रक्षण करणे, आर्थिक व सामाजिक विषमता कमी करणे, शोषण थांबविणे, कायद्यासमोर समता आणणे, सर्वांना संधी देणे, अस्पृश्यता रोखणे, भेदभाव समाप्त करणे, जातीयता नष्ट करणे, जातीय सहिष्णुता राखणे, मूलभूत हक्कांचे रक्षण करणे, न्याय प्रस्थापणे इ. बाबींसाठी त्यांनी घटनावादाचा पुरस्कार केला.

डॉ. आंबेडकर सामाजिक लोकशाहीचे पुरस्कर्ते असल्याने त्यांना व्यक्ती स्वातंत्र्यवादी म्हटले जाते. परंतु त्यांनी समतेलाही तेवढेच महत्त्व दिले. कारण शासनाचे कोणतेही अंग जनतेचे शोषण करणार नाही. याची जबाबदारी त्यांना घ्यावयाची होती. तत्पूर्वी हजारो वर्षे भारतातील गरीब समाज देशी-विदेशी राजवटींच्या अन्याय, अत्याचाराला बळी पडलेला होता. भारतात लोकशाहीची हजारो वर्षांची परंपरा लाभलेली होती. म्हणूनच डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्यानंतर येणारे शासन नियंत्रण आणि कायद्यास जबाबदार असणारे असावे. तसेच त्यावर घटनेने नियंत्रण आणावे असे स्पष्ट केले.

**२. डॉ. आंबेडकरांच्या घटनावादाची वैशिष्ट्ये-**

१) आर्थिक व सामाजिक विषमता नष्ट करणे - भारतातील विषमतेचे मूळ येथील

समाजाच्या चौकटीत आहे. हजारो वर्षे पारतंत्र्यात राहून समाज विकास झालेला नव्हता. म्हणून घटनेच्या मसुदा समितीत डॉ. आंबेडकरांनी अशा अनेक तरतुदींचा स्वीकार केला ज्यामुळे आर्थिक व सामाजिक विषमता नष्ट होईल. घटनेच्या तरतुदींच्या अधारे शासनावर नियंत्रण राहील. मूलभूत हक्कांचा घटनेत समावेश करून भारताच्या नागरिकांना समतेचा हक्क देण्यात आला. परिणामी सर्वांना कायद्यासमोर समान स्थान मिळाले. भेदभाव नष्ट होण्याचे मार्ग मोकळे झाले. सर्वांना समान संधी देण्यात येऊ लागली, अस्पृश्यता बंदी करण्यात आली, त्याचबरोबर स्वातंत्र्याचा हक्क देऊन प्रत्येक स्वधर्माचे पालन प्रचार-प्रसार करण्याचा हक्क देण्यात आला. म्हणजेच वरील बाबींचा घटनेत समावेश करून विषमता नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

२) अल्पसंख्याकांचे हितरक्षण – भारतीय राज्यघटनेत धार्मिक तसेच जातीय अल्पसंख्याकांचे रक्षण करण्यासाठी तरतुदी करण्यात आल्या. त्याचबरोबर अल्पसंख्याक समाजाचे शोषण थांबविण्यासाठी समतेचा व स्वातंत्र्याचा हक्क देण्यात आला. सर्व अल्पसंख्यांकाना विकासाचा समान दर्जा मिळावा. धर्म, वंश, जात, लिंग, जन्म या आधारे व्यक्ती व्यक्तीत भेद न राहता सामाजिक मागासलेल्या व दुबळ्या घटकांच्या विकासाची जबाबदारी राज्यावर सोपविण्यात आली. अल्पसंख्याकांना आपल्या धर्माचे रक्षण करणे, धर्मानुसार आचार, विचार, प्रचार व प्रकार करण्याचे तसेच स्वतःची संस्कृती भाषा यांचे संरक्षण करण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले. डॉ. आंबेडकरांनी या तरतुदींचे जोरदार समर्थन केले. त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी न्यायालयावर सोपविणे म्हणजेच कार्यकारी मंडळ व कायदे मंडळ जनहिताकडे दुर्लक्ष केल्यास न्यायालय त्यांच्या कारभारावर ताशेरे ओढू शकते. म्हणजेच मर्यादित शासनाचा स्वीकार करून डॉ. आंबेडकरांनी घटनावाद प्रस्थापित केला.

३) प्रौढ मताधिकार – भारताच्या घटनाकारांनी नागरिकांना प्रौढ मताधिकार देऊन मोठे धाडस केले. मात्र त्याद्वारे सर्व भारतीयांना विनाअट राजकीय सहभागाची समावेशाची संधी मिळणार होती. एखादे शासन जनतेच्या इच्छा आकांक्षांकडे दुर्लक्ष करीत असेल तर सर्वात्रिक निवडणुकीच्या वेळी प्रौढ मताधिकारामुळे शासन बदलण्याची शक्ती जनतेकडे देण्यात आली. म्हणजेच हा धाक सत्ताधाऱ्यांना असल्याने ते हुकूमशाही पद्धतीने शासन करू शकणार नाही. या मर्यादेमुळे शासन नियंत्रित बनले. शासनास घटनेतील नियम व तत्त्वांच्या आधारे राज्यकारभार करावा लागल्याने खऱ्या अर्थाने डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेला घटनावाद प्रस्थापित झाला.

४) कायद्याचे अधिराज्य – व्यक्तीचे स्वातंत्र्य टिकवून ठेवण्यासाठी कायद्याच्या अधिराज्यावर डॉ. आंबेडकरांनी भर दिला. व्यक्ती कोणत्याही धर्माची, जातीची, वंश, लिंगाची असो त्याआधारे भेदभाव केला जाणार नाही. सर्व व्यक्तींसाठी समान कायदा असेल तसेच सर्वांना कायद्याने समान संरक्षण मिळेल. तसेच लोकांनी सुद्धा कायद्यास विरोध करू नये. म्हणूनच डॉ. आंबेडकरांनी सविनय कायदेभंग आंदोलनास विरोध केला होता. कायद्याच्या अधिराज्यामुळे नियमांच्या अंधारे शासन चालते. सर्व जनता कायद्यावाटे समान असते शासनावर नियंत्रण प्रस्थापित होते. म्हणूनच डॉ. आंबेडकर कायद्याच्या अधिराज्यावर भर देतात.



५) जातीभेद नष्ट करणे – भारतातील जातीसंस्था डॉ. आंबेडकरांनी अनैसर्गिक मानली. विशिष्ट जातीसमूहाने स्वार्थ साध्य करण्यासाठी जातीयता निर्माण केली. विशिष्ट जातींना कर्माच्या आधारावर कनिष्ठ लेखले. उच्चनिचता निर्माण करून विषमता वाढविली.

# घटक ८
## पंडीत जवाहरलाल नेहरू


**८.० उद्दिष्टे**

**८.१ प्रस्तावना**

**८.२ विषय विवेचन**

**८.२.१ पं. नेहरूंचा जीवन परीचय**

**८.२.२ पं. नेहरूंचे लोकशाहीसंबंधी विचार**

**८.२.३ लोकशाही समाजवादासंबंधी पं.नेहरूंचे विचार**

**८.२.४ पं.नेहरूंचे नियोजनाबाबत विचार**

**८.२.५ नेहरुंचे परराष्ट्र धोरणासंबंधी विचार**

**८.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न**

**८.४ सारांश**

**८.५ सरावासाठी प्रश्न**

**८.६ अधिक वाचनासाठी पुस्तके**


### ८.० उद्दिष्ट्ये :-

१) पं. नेहरूंच्या राजकीय विचारांचा अभ्यास करणे.

२) भारताचे पहिले पंतप्रधान असलेल्या पं.नेहरूंचे लोकशाहीसंबंधी असलेले विचार जाणून घेणे.

३) पं. नेहरूंचा लोकशाही समाजवादी विचार अभ्यासणे

४) भारताच्या आर्थिक विकासासाठी स्वीकारलेल्या नियोजनाचा आशय जाणून घेणे.

५) देशाचे पंतप्रधान या नात्याने पं. नेहरूंनी ठरविलेल्या परराष्ट्रीय धोरणाच्या तत्त्वांचा अभ्यास करणे

६) आधुनिक भारताचे शिल्पकार या नात्याने त्यांची देश विकासातील भूमिका जाणून घेणे

## ८.१ प्रस्तावना :-

भारताचे पहिले पंतप्रधान, आधुनिक भारताचे शिल्पकार व शांतिदूत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पं.नेहरू यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. स्वातंत्र्योत्तर काळात भारतात लोकशाही शासनप्रणाली निर्माण करून सत्तेचे विकेंद्रीकरण, सामाजिक व आर्थिक समानता प्रस्थापित केली.नियंत्रण व संतुलनाच्या दृष्टीने त्यांनी संसदीय लोकशाहीचा पुरस्कार केला.भारताची सामाजिक व आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन पं.नेहरूंनी लोकशाही समाजवादाचा स्वीकार केला.मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार करण्यावर त्यांनी भर दिला.भारताचे पंतप्रधान या नात्याने त्यांनी लोकशाही समाजवाद ही विचारसरणी प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला.सोव्हिएट रशियाच्या नवीन आर्थिक धोरणाने प्रभावित झालेल्या पं.नेहरूंनी देशाचा जलद गतीने आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी नियोजनाचा स्वीकार केला.देशांतर्गत धोरणाप्रमाणेच त्यांनी परराष्ट्र धोरणाला महत्त्व दिले. जागतिक शांततेच्या दृष्टीने पं.नेहरूंनी जगासमोर पंचशील तत्त्वे मांडली., अलिप्ततावादी धोरणाचा स्वीकार केला. राष्ट्रहितापेक्षा मानवी हिताला त्यांनी प्राधान्य दिले. शांतिदूत म्हणून त्यांना गौरविण्यात आले. आपण या घटकात पं. नेहरूंचे लोकशाही, लोकशाही समाजवाद, नियोजन, परराष्ट्र धोरण आदी बाबींचा अभ्यास करणार आहोत.

## ८.२ विषय विवेचन -

### ८.२.१ पंडित नेहरूंचा जीवनपरिचय :-

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्म १४ नोव्हेंबर १८८९ रोजी झाला. त्यांचा जन्मदिवस बालदिन म्हणून साजरा केला जातो.सुसंस्कृत व संपन्न अशा काश्मिरी ब्राह्मण कुटुंबात त्यांचा जन्म झाला.आई स्वरूपाराणी धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या. त्यांचे वडील मोतीलाल नेहरू होत. त्यांनी अंधश्रद्धेच्या विरूद्ध उठाव केले.पंडित नेहरू यांच्या विचारावर महात्मा गांधींच्या विचारांचा प्रभाव होता.त्यांचे प्राथमिक शिक्षण कुटुंबातच झाले. शिक्षण घेताना विज्ञानाची आवड व वाचनाची आवड त्यांना होती.त्यांचे माध्यमिक शिक्षण इंग्लंडला (१९०५) झाले.१९०७ मध्ये उच्च शिक्षण केंब्रिज विद्यापिठात झाले.१९१० मध्ये ते पदवीधर झाले.१९१२ ला त्यांना 'बॅरिस्टर' ही पदवी प्राप्त झाली.वयाच्या १३ व्या वर्षी त्यांनी ॲनी बेझंट यांच्याकडून दीक्षा घेतली व थिऑसॉफिकल सोसायटीचे त्यांनी सदस्यत्व स्वीकारले.

### राजकीय प्रवास :-

पंडित नेहरूंचे वकिली व्यवसायात मन लागले नाही. म्हणून ते स्वातंत्र्य लढयात सहभागी झाले. सुरूवातीला त्यांनी मवाळ विचारसरणीच्या लोकांबरोबर कार्य केले. मात्र मन न लागण्याने टिळकांच्या होमरूल लीग चळवळीत त्यांनी सहभाग घेतला. १९१६ च्या लखनौ अधिवेशनात त्यांची प्रथमत: गांधीजींशी भेट झाली व त्यांच्या विचारांचा प्रभाव पडला. १९२० मध्ये नेहरूंनी गांधीजींच्या सत्याग्रहात सहभाग घेतला. त्यामुळे

त्यांना अटक झाली. एकूण ८ वेळा तुरुंगवास भोगावा लागला.१९२३ मध्ये ते काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस बनले व अलाहाबाद नगरपालिकेत नगराध्यक्ष बनले.१९२७ मध्ये ते साम्यवादी क्रांतीच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त मॉस्कोला गेले व साम्यवादी विचारांनी प्रभावित झाले.१९२९ मध्ये लाहोर काँग्रेसचे अध्यक्ष बनले.त्यावेळी त्यांनी भारताचा ठराव तयार केला. १९३६ -३७ व १९३९-४० या वर्षांत पुन्हा काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. १९४६ मध्ये पं. नेहरूंच्या नेतृत्वाखाली हंगामी सरकार स्थापन करण्यात आले.बॅरिस्टर जीनांनी स्वतंत्र पाकिस्तानची मागणी केली.त्याला सुरुवातीला नेहरुंनी विरोध केला.मात्र लॉर्ड बॅटनची फाळणीची योजना विचारात घेऊन मान्यता दिली.पं.नेहरू १९४७ ते १९६४ पर्यंत भारताचे पंतप्रधान होते. दुसऱ्या महायुद्धांनंतर अलिप्ततावादी (-) धोरणाचा स्वीकार केला. तसेच पंच शिल तत्वे स्वीकाली म्हणून नेहरूंना धक्का बसला. दगदग वाढून व त्यातून स्वत:ला सावरू न शकल्याने २७ मे १९६४ रोजी त्यांचे निधन झाले.

### ग्रंथसंपदा :-

पं.नेहरू यांनी खालील ग्रंथ लिहीले.

१) ( इंदिरा गांधींना लिहिलेल्या पत्राचा संग्रह)

२) (१९२९)

३) : (१९३६)

४) (१९४५)

५) , (१९५८)

प्रभाव :- पं. नेहरू यांच्या विचारांवर ॲनी बेझंट, महात्मा गांधी, मार्क्स, बर्नार्ड शॉ, सिडने वेब, मानवेंद्रनाथ रॉय इ. विचारवंतांचा प्रभाव पडलेला होता.

## ८.२.२ पंडति नेहरूंचे लोकशाहीसंबंधी विचार :-

पंडित नेहरू हे लोकशाहीचे कटट्र पुरस्कर्ते होते. इंग्लंडमध्ये असताना जॉन स्टुअर्ट मिल, ग्लॅडस्टंट या विचारवंतांच्या उदारमतवादी विचारसरणीने ते प्रभावित झाले व त्यांनी लोकशाहीचा स्वीकार केला. नेहरूंचा मानवता व त्यावरील विश्वास दृढ असल्यामुळे त्यांनी लोकशाही शासनप्रणालीचे समर्थन केले.नेहरूंना संसदीय लोकशाही अपेक्षित होती.कारण ब्रिटिशांच्या विचारसरणीचा प्रभाव त्यांच्यावर पडलेला होता.भारतात ब्रिटिशांचे राज्य होते.ब्रिटिशांच्या एकछत्री राज्यकारभारामुळे भारतातील सत्ता व संपत्तीचे केंद्रीकरण झाले. आर्थिक विषमता निर्माण झाली, त्यातूनच सामाजिक उच्च-निच्च भावना निर्माण होऊन लोकांमधील अन्याय व अत्याचार वाढले. या दयनीय परिस्थितीवर मात करण्यासाठी लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार करणे आवश्यक असल्याचे मत पं. नेहरूंनी व्यक्त केले.

### लोकशाहीचे स्वरुप :-

१) **व्यक्तिस्वातंत्र्य :-** लोकशाहीत व्यक्ती ही केंद्रस्थानी असेल. व्यक्तीचा विकास म्हणजे कुटुंबाचा समाजाचा व देशाचा विकास होय. व्यक्ति स्वातंत्र्यास पं.नेहरूंनी लोकशाहीचा आत्मा म्हटले आहे. त्यादृष्टीने व्यक्ती, स्वातंत्र्याला महत्त्व दिले.

२) **विचारविनिमय व शिस्तीला महत्त्व :-** पंडित नेहरूंनी परमत सहिष्णूतेला लोकशाहीत महत्त्व असल्याचे स्पष्ट केले. परमतसहिष्णूता याचा अर्थ इतरांच्या मताची कदर करणे होय. म्हणून लोकशाहीत इतरांची मते जाणून घ्यावयास हवी. कोणताही निर्णय घेतांना चर्चा करूनच निर्णय घ्यावेत. लोकशाही म्हणजे लोकांचेच सरकार असल्यामुळे त्यात विचार विनिमयाप्रमाणेच शिस्तीचे भान असावयास हवे.

३) **मूलभूत हक्कांना प्राधान्य :-** हक्काशिवाय व्यक्तीचा विकास होणे शक्य नाही. हक्क आणि कर्तव्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी नागरिकांचा सर्वांगिण विकास आवश्यक आहे. हा विकास हक्कांशिवाय शक्य नाही. म्हणूनच भारताच्या राज्यघटनेत मूलभूत हक्कांचा समावेश करण्यात आला.

४) **लोकशाही व समता :-** नेहरूंच्या मते, लोकशाहीचा मुख्य आधार सामाजिक व आर्थिक समानता आहे. ही समानता निर्माण करण्यासाठी विषमता नष्ट करण्याचा प्रयत्न करावयास हवा. अन्यथा पैसा घेऊन मतदान झाल्यास झुंडशाही निर्माण होईल. त्यात काहीच व्यक्तींचा विकास होईल. राज्याचा उद्देश मानवाला सुखी व शांततामय जीवनाची प्राप्ती करून देणे हा आहे. त्या दृष्टीने मानवाच्या जीविताचे व संपत्तीचे रक्षण करणे हे राज्याचे कर्तव्य आहे. त्यासाठी समानता आवश्यक आहे.

५) **संसदीय लोकशाहीचा स्वीकार :-** पंडित नेहरूंच्या मते, लोकशाही हा केवळ शासनाचा प्रकार नसून तो जीवन जगण्याचा एक मार्ग बनलेला आहे. म्हणून नियंत्रण व संतुलन या दृष्टीकोनातून त्यांनी संसदीय लोकशाहीचा पुरस्कार केला. संसदीय लोकशाहीत कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ हे एकमेकांशी निगडित असल्यामुळे त्यांच्यावर नियंत्रण असते व समतोल साधला जातो. संसदीय लोकशाहीत संसदेचे सर्वश्रेष्ठत्व व सार्वभौमत्व मान्य असते. त्यामुळे परिस्थितीनुसार नियमात बदल करणे शक्य असते.

६) **लोकशाही आणि समाजवाद यांचा समन्वय :-** पं. नेहरुंना भांडवलशाहीतील एकाधिकारशाही समाजरचनेत सत्ता व संपत्तीचे केंद्रीकरण, काही ठरावीक व्यक्तींच्याच हाती होते. याउलट साम्यवादी विचारसरणीत श्रमिकांची हुकूमशाही असते. त्यामुळे संपूर्ण समाजाच्या विकासाला प्राधान्य असते. मात्र सार्वजनीक स्वरूपात काम करताना माणसातील कामचुकार प्रवृत्ती विचारात घेऊन पं. नेहरूंनी या दोन विचारसरणींत सुवर्णमध्य साधण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी लोकशाही व समाजवाद यांचे एकत्रीकरण करून मोठे उदयोगधंदे राष्ट्राच्या मालकीचे केले तर लहान उद्योगधंदे खाजगी मालकीचे ठेवले. अशा प्रकारे व्यक्ती विकास व राष्ट्राविकासाचे उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून पं. नेहरूंनी लोकशाही विचारसरणीचा स्वीकार केला.

## ८.२.३ लोकशाही समाजवादासंबंधी पं.नेहरूंचे विचार :-

पं.नेहरूंच्या मते, भारतात लोकशाही समाजवादाचा स्वीकार करावा. त्यामागचा उद्देश १) सामाजिक व आर्थिक विषमता नष्ट करणे, २) गरिबांची होणारी आर्थिक पिळवणूक

थांबविणे. ३) समाजातील जास्तीत जास्त लोकांचा विकास घडवून आणणे. ४) सामाजिक न्याय प्रस्थापित करणे, हा होता.

वरील उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवून पं.नेहरूंनी लोकशाही समाजवादाचा स्वीकार केला.

भारतातील लोकशाही समाजवादाचे पुरस्कर्ते पंडित नेहरु होत. पंडीत नेहरूंनी १९५८ मध्ये लिहिलेल्या ' , ' या ग्रंथात लोकशाही समाजवादासंबंधी विचार मांडले. भारतातील सामाजिक व आर्थिक समस्या सोडविणे आवश्यक आहे.या समस्या सोडविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे समाजवाद होय.म्हणून पं.नेहरूंनी लोकशाही समाजवादाचा पुरस्कार केला.

• **समाजवादाची घोषणा :-**

१९२९ मध्ये लाहोर येथे काँग्रेसचे अधिवेशन झाले. या अधिवेशनाचे अध्यक्ष पंडित नेहरु होते.अध्यक्षपदावरून बोलताना त्यांनी समाजवादी विचारसरणीची घोषणा केली.

• समाजवादाचे स्वरूप :- नेहरूंच्या समाजवादाचे स्वरूप केवळ आर्थिक नव्हते. त्याला नैतिकतेची व मानवतेची जोड होती. भांडवलशाही व समाजवाद या दोन्ही विचारसरणींचा हेतू आर्थिक विषमता नष्ट करून सामाजिक न्याय प्रस्थापित करणे हा होता. म्हणून पं.नेहरूंनी लोकशाही समाजवादाचा स्वीकार केला.

• **लोकशाही समाजवादाची वैशिष्ट्ये:-**

पं. नेहरूंनी स्वीकारलेल्या लोकशाही समाजवादाची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे :

**(१) भांडवलशाही अर्थव्यवस्थेला विरोध :-** भांडवलशाही समाजरचनेत संपत्ती ही काहीच व्यक्तींच्या हाती केंद्रीभूत असते. भांडवलदार संपत्तीच्या बळावर सत्ता काबिज करतात. सत्तेचा उपयोग स्वार्थासाठी करतात. परिणामी श्रीमंत अधिक श्रीमंत तर गरीब अधिक गरीब झाले. बेकारी, दारिद्र्य, मजुरांची पिळवणूक, त्यांच्यावरील अन्याय यासारख्या समस्या निर्माण झाल्या. सामाजिक व आर्थिक विषमता नष्ट करता यावी म्हणून पंडित नेहरूंनी भांडवलशाही समाजरचनेला विरोध करून लोकशाही समाजवादाचा स्वीकार केला.

**(२) अहिंसात्मक मार्गाने परिवर्तन :-** नेहरूंचा लोकशाहीवर विश्वास असल्यामुळे त्यांना हिंसा किंवा क्रांतीकारी मार्ग मान्य नव्हता. घटनात्मक मार्गाने किंवा सनदशीर मार्गाने लोकशाही समाजवाद प्रस्थापित करण्यावर त्यांनी भर दिला. काही व्यक्तींनी त्यांच्या या विचाराला विरोध केला. तेव्हा जनतेत जागरुकता निर्माण करण्यासाठी व त्यांची मानसिकता तयार करण्यासाठी त्यांनी विविध स्तरांवरुन प्रयत्न केले.

**(३) व्यक्ती स्वातंत्र्याला महत्त्व :-** नेहरूंचा लोकशाहीवर विश्वास असल्यामुळे व्यक्तीला त्यांनी केंद्रस्थानी मानले. व्यक्तीचा विकास करणे हेच राज्याचे कर्तव्य आहे. व्यक्तीला त्यांनी साध्य मानले. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी स्वातंत्र्य दिलेले असेल, मात्र स्वातंत्र्याचा अर्थ स्वैराचार असा असणार नाही. असे सांगून लोकशाही आणि समाजवाद यांचे एकत्रीकरण साधण्याचा प्रयत्न केला.

**(४) उत्पादन साधनांचे राष्ट्रीयीकरण :-** नेहरुंच्या मते, मोठ्या उत्पादनाची साधने काहीच व्यक्तींच्या हातात केंद्रित झाल्यास आर्थिक व सामाजिक विषमता निर्माण होईल.

म्हणून मोठ्या उदयोगधंद्यांची म्हणजेच उत्पादन साधनांचे राष्ट्रीयीकरण करण्यावर नेहरूंनी भर दिला.

**(५) खाजगी संपत्तीवर मर्यादा :–** समाजातील काही व्यक्ती अती श्रीमंत असल्यास त्यांच्याकडून गरिबांची पिळवणूक होऊ शकते. समाजात विषमता निर्माण होऊ शकते. म्हणून नेहरूंनी खाजगी संपत्तीवर मर्यादा घातल्या. त्यासाठी उत्पन्नाच्या आधारावर कराची आकारणी करण्यात आली.

**(६) संमिश्र अर्थव्यवस्था :–** भारतीय परिस्थिती विचारात घेऊन पं.नेहरूंनी मोठया उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण केले. लघु उद्योगधंदे खाजगी मालकीचे ठेवण्यात आले. अशाप्रकारे मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार करण्यात आला.

**(७) आर्थिक नियोजनाला प्राधान्य :–** पं. नेहरूंवर रशियातील नवीन आर्थिक नियोजनाचा () प्रभाव पडलेला होता. त्यामुळे भारताचा जलद आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी पं.नेहरूंनी नियोजनाचा स्वीकार केला. त्यासाठी नियोजन मंडळ स्थापन करण्यात आले. देशातील विविध आर्थिक समस्या सोडविण्यासाठी व देशाच्या प्रगतीसाठी पं. नेहरूंनी पंचवार्षिक योजनेची अंमलबजावणी केली.

**(८) समाजवादाचे व्यापक स्वरूप :–** पं.नेहरूंनी आपल्या समाजवादी विचारात केवळ आर्थिक क्षेत्राचा विचार केलेला नाही. याशिवाय सामाजिक, राजकीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे समाजवादी स्वरूप वचारात घेऊन देशाचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न केला.

**(९) सामूहिक हिताला प्राधान्य :–** पं. नेहरूंनी यक्तीऐवजी समाजाच्या हिताला प्राधान्य दिले. जास्तीत जास्त लोकांचे हित विचारात घेऊन पंचवार्षिक योजना तयार केल्या. त्याअंतर्गत सामूहिक विकास प्रकल्प राबविले. मात्र भारतीय जनतेतील कामचुकार प्रवृत्तीमुळे हे प्रकल्प म्हणावे तसे यशस्वी झाले नाही.

अशाप्रकारे पं. नेहरूंनी पंतप्रधान असताना आपले लोकशाही समाजवादी विचार प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला. १९५५मध्ये भरलेल्या बांडुंग परिषदेत त्यांनी समाजवादाची घोषणा केली.त्यानुसार समाजवादी विचारसरणी प्रत्यक्षात रुजू लागली.१९७६ मध्ये इंदिरा गांधी पंतप्रधान असताना ४२ व्या घटना दुरुस्तीनुसार भारतीय राज्यघटनेच्या उद्देश्य पत्रिकेत समाजवादाचा समावेश करण्यात आला. मात्र, १९९२ मध्ये भारत सरकारने स्वीकारलेल्या खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाच्या (खाऊजा) धोरणामुळे समाजवादाला धोका निर्माण झाला आहे.

## ८.२.४ पं. नेहरूंचे नियोजनाबाबत विचार :–

नियोजन म्हणजे राष्ट्रांच्या आर्थिक विकासासाठी विशिष्ट उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून ते साध्य करण्यासाठी तयार केलेल्या आर्थिक विकासाचा आराखडा होय.

पं. नेहरूंनी अविकसित भारत देशात नियोजनाद्वारे प्रगती साधण्याचा प्रयत्न केला. पं. नेहरुंच्या या विचारावर रशियातील () चा प्रभाव होता. रशियाने अतिशय कमी कालावधीत नियोजनाद्वारे देशाची प्रगती केली.तेव्हा भारतानेही नियोजनाचा स्वीकार करून देशाची प्रगती करावी यासाठी नेहरूंनी नियोजनाला प्राधान्य दिले.

राष्ट्रांच्या सर्वांगीण विकासाठी प्रथमता आर्थिक विकास आवश्यक आहे. त्याशिवाय सामाजिक क्षेत्रातील विषमता, अन्याय, शोषण इ.थांबणार नाही.म्हणून पं.नेहरूंनी भारताच्या आर्थिक विकासासाठी नियोजनाचा स्वीकार केला.

**⌯ नियोजनाची उद्दिष्ट्ये**

१) देशाचा आर्थिक विकास घडवून आणणे २) राहणीमानाचा दर्जा उंचावणे ३) देशात आर्थिक स्थैर्य निर्माण करणे.

ही उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवून पं.नेहरूंनी नियोजनाचा स्वीकार केला.त्यानुसार १९३८ मध्ये राष्ट्रीय नियोजन समीतीची स्थापना करण्यात आली. यादरम्यान जगात दुसऱ्या महायुद्धाची सुरुवात झाली. परिणामी नियोजन समितीच्या कार्यात व्यत्यय आला.त्यामुळे १९४५ मध्ये समितीने आपला अहवाल सादर केला.

⌯ राष्ट्रीय नियोजन समितीच्या अहवालातील मुद्दे :-

१) भारताचे नियोजन लोकशाही पद्धतीने व्हावे.

२) राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी विशिष्ट कालावधी ठरवावा.

३) आर्थिकक्षेत्रात सुसूत्रीकरण व समन्वय साधण्यासाठी नियोजन आयोगाची स्थापना करण्यात यावी.

या तरतूदींचा विचार करून नेहरूंनी नियोजनाचा स्वीकार केला.

घटना समीतीचे सदस्य या नात्याने व भारताचे पहिले पंतप्रधान या भूमिकेतून नेहरुंनी नियोजनाची संकल्पना प्रत्यक्षात आणली. म्हणून पं.नेहरूंना भारतीय नियोजनाचे जनक म्हणून ओळखले जाते.मार्च १९५० मध्ये भारतात पहिल्या नियोजन आयोगाची स्थापना करण्यात आली.या नियोजन आयोगाचा अध्यक्ष हा भारताचा पंतप्रधान असतो. त्यामुळे पहिल्या नियोजन आयोगाचे अध्यक्ष पं.नेहरू होते.

अशाप्रकारे देशात आर्थिक विकास घडवून आणण्याच्या उद्देशाने नेहरूंनी नियोजनाची अंमलबजावणी केली.

## ८.२.५ नेहरूंचे परराष्ट्र धोरणासंबंधी विचार :-

भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार म्हणून पं. नेहरूंना ओळखले जाते.मानवतावादी असलेल्या नेहरूंना युद्ध मान्य नव्हते.युद्धे हे देशातील सत्ता स्पर्धेतून निर्माण होतात.युद्धाचा परिणाम राष्ट्राराष्ट्रांत द्वेष, तिरस्कार व अपमानाची भावना निर्माण होते.त्यातूनच बदल्याचा भाव येतो. युद्धे ही आत्यंतिक राष्ट्रावादातूनच निर्माण होतात. जसे हिटलर आणि

मुसोलिनीने आत्यंतिक राष्ट्रवादाच्या भावनेतून इतर राष्ट्रांवर आकमणे केली.युद्धामुळे मोठ्याप्रमाणात जीवित व वित्तहानी होते.ही हानी मानवतावादाला काळिमा फासणारी आहे.मानवतावादी असणाऱ्या नेहरूंनी शांततेचा पुरस्कार केला. म्हणून नेहरूंनी जागतिक शांततेचे पुरस्कर्ते म्हणतात.

पंडित जवाहरलाल नेहरू हे स्वातंत्र्य आंदोलनातील प्रमुख नेते होते.५ वेळा ते राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष राहिले.भारताचे पंतप्रधान बनले.पंतप्रधान या नात्याने भारताचे परराष्ट्रधोरण त्यांना ठरवावे लागले. भारताची भौगोलिक,सामाजिक,आर्थिक व राजकिय परिस्थिती विचारात घेऊन पं.नेहरूंनी परराष्ट्र धोरण ठरविले.

ÿ नेहरूंच्या परराष्ट्रधोरणातील प्रमुख बाबी

१) नेहरूंचा साम्राज्यवादाला विरोध ब्रिटिशांच्या सम्राज्यवादी धोरणामुळे भारतीयांचे नैतिक व आर्थिक शोषण झाले. म्हणून नेहरूंनी साम्राज्यवादी धोरणाला विरोध केला.

**२) नेहरूंचा अलिप्ततावाद :-**

अलिप्ततेचा अर्थ तटस्थता होय.म्हणजे कोणत्याही आंतरराष्ट्रीय वादामध्ये सहभागी न होणे.दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणात अमेरिका व रशिया हे दोन गट निर्माण झाले.या दोन गटात सत्तास्पर्धा सुरू झाली. अमेरिकेने नाटो,सियाटो सेंटो, (, , ) असे करार करून त्या राष्ट्रांना आर्थिक व लष्करी मदत देण्याचे घोषीत केले.तर दुसरीकडे रशियाने वार्सा करार करून मदत घोषित केली.या दोन राष्ट्रांमध्ये चाललेल्या शीत युद्धात भाग घेण्याची तयारी भारताची नव्हती. कारण अमेरिकेच्या गटात गेलो तर त्यांची बंधने येणार व दुसऱ्या गटाकडून म्हणजेच रशियाकडून मदत मिळणार नाही. म्हणून स्वयंपूर्णतेच्या तत्त्वानुसार पं.नेहरूंनी पुढाकार घेऊन अलिप्ततावादी गट तयार केला व स्वतंत्र झालेल्या भारताने तटस्थतेचे धोरण स्वीकारले. त्यानुसार भारताने एका निश्चित व सुसंगत दृष्टिकोनातून जगाकडे पाहण्याचा व जगात शांतता व समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे.

**ÿ नेहरूंच्या परराष्ट्रधोरणाची मूलभूत तत्त्वे :-**

. आंतरराष्ट्रीय राजकारणात स्वतंत्र दृष्टिकोन बाळगणे व देशात चालणाऱ्या जगात स्पर्धेचे मूल्यमापन करुन निर्णय घेणे.

. वसाहतवाद किंवा साम्राज्यवादास विरोध करणे.

. आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील वादग्रस्त प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडविणे.

. नि:शस्त्रीकरणाचा वापर करणे.

. शेजारील राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवणे.

. जागतिक शांतता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे.

अशाप्रकारे पंडित नेहरूंनी जगात शांतता, सुव्यवस्था, स्थैर्य व

विकासासाठीअलिप्ततावादी धोरणाचा स्वीकार केला. त्यानुसार भारतीय राज्यघटनेत पुढील उद्दिष्ट्ये समाविष्ट करण्यात आली.

(१) राष्ट्रहिताचे रक्षण करणे.

(२) जागतिक शांतता टिकवणे.

(३) जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी युनो () ला मदत करणे

(४) राष्ट्राराष्ट्रातील वाद सामंजस्याने मिटविणे.

(५) जगातील मोठ्या राष्ट्रांनी इतर राष्ट्रांशी मैत्रीचे व सहकार्याचे संबंध ठेवणे.

(६) सार्वभौमत्वाचा आदर करणे.

अशाप्रकारे ही काही तत्त्वे भारतीय राज्यघटनेच्या परराष्ट्रीय धोरणात समाविष्ट करण्यात आली.सुरवातीला जगातील केवळ तीन राष्ट्रांनी एकत्र येऊन ही चळवळ सुरू केली होती.१९६१ मध्ये यात २५ राष्ट्रे आली.सध्या त्यात ११८ राष्ट्रे आहेत.

**नेहरूंची पंच शिल तत्त्वे :-**

आंतरराष्ट्रीय प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडविण्यासाठी, शांततामय जीवन प्रस्थापित करून सहअस्तित्व टिकविण्यासाठी, अविकसित देशाची आर्थिक प्रगती घडवून आणण्यासाठी, राष्ट्राराष्ट्रांत मैत्रीचे , सहकार्याचे व सौहार्दयपूर्ण संबंध प्रस्थापित करण्यासाठी पं. नेहरूंनी या पाच तत्वांचा म्हणजेच पंचशील तत्वांचा पुरस्कार केला.

नेहरूंनी स्वीकारलेली ही पंचशील तत्त्वे प्रामुख्याने चीनशी संबंधित आहेत. भारत आणि चीन यांच्यातील संघर्ष कमी होऊन स्नेहभाव वाढवावा यासाठी भारताने १९५४ मध्ये चीनचे पंतप्रधान चौ-ऐन-लाय यांच्याशी करार केला. या करारातील तत्त्वे म्हणजेच नेहरूंची पंचशील तत्त्वे होय. ही तत्त्वे पुढील प्रमाणे :-

१) जगातील सर्व राष्ट्रांनी एकमेकांच्या प्रादेशिक अखंडतेचा आणि सार्वभौमत्वाचा आदर करणे.

२) कोणत्याही राष्ट्राने अन्य राष्ट्रावर आक्रमण करू नये.

३) कोणत्याही राष्ट्राने इतर राष्ट्रांच्या अंतर्गत राज्यकारभारात हस्तक्षेप करू नये.

४) प्रत्येक राष्ट्राला असणाऱ्या स्वातंत्र्याचा व स्वायतत्तेचा सन्मान करणे.

५) नि:शस्त्रीकरणाचा स्वीकार करणे.

पंडीत नेहरूंनी जगात शांतता प्रस्थापित व्हावी, यासाठी जगाला पंचशील तत्त्वे सांगितली. ही जगाला दिलेली एक मोठी देणगी आहे.'जगा आणि जगू दया' हे भारताचे मुलभूत तत्त्वज्ञान आहे. हे तत्त्वज्ञान पंचशील तत्त्वांतून व्यक्त झाल्यामुळे या तत्त्वांना महत्त्व प्राप्त झाले. नेहरूंनी पंचशील तत्त्वांबरोबर स्वातंत्र्य, समता, बंधुता, सहकार्य प्रस्थापित करण्यासाठी तटस्थता, वाटाघाटी, शांततामय सहजीवन या चतु:सूत्रांची घोषणा केली. त्यानंतर अचानकपणे १९६२ मध्ये चीनचे भारतावर आक्रमण केले.यात भारताला पराभव

पत्करावा लागला.त्यामुळे नेहरूंच्या पंचशील तत्त्वांवर टीका देखील झाली. भारताच्या रक्षणासाठी व विकासासाठी हे धोरण योग्य नसल्याचे सांगितले गेले.

नेहरूंनी आपल्या परराष्ट्र धोरणात राष्ट्रहितापेक्षा मानवहिताला प्राधान्य दिले. आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वीकारलेल्या जागतिक शांततेच्या धोरणामुळे पं. नेहरूंचा जगाने शांतिदूत म्हणून गौरव केला.

---

## ८.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :-

१) पं. नेहरूया दोन ग्रंथांची नावे लिहा.

२) पं.नेहरूंच्या विचारावर प्रभाव पडलेल्या दोन विचारवंतांची नावे सांगा.

३) पं. नेहरूंनी लोकशाही शासनपद्धतीचे समर्थन का केले ?

४) पं. नेहरूंनी कोणत्या लोकशाही शासनप्रकारचा स्वीकार केला ? व का ?

५) लोकशाही समाजवादाचा स्वीकार करण्यामागे पं. नेहरूंचा हेतू काय होता ?

६) नियोजन म्हणजे काय ?

७) नियोजनाचे उद्दिष्ट्ये सांगा.

८) पं.नेहरुंच्या परराष्ट्र धोरणातील दोन ठळक तत्त्वे सांगा.

९) अलिप्ततावादाचा स्वीकार करण्यामागचा पं.नेहरूंचा हेतू काय होता ?

१०) पं.नेहरूंची पंचशील तत्त्वे कोणती ?

## ८.४ सारांश :-

प्रस्तुत घटकात भारताचे पहिले पंतप्रधान असलेल्या पंडित नेहरूंच्या जीवनपट व त्यांच्या विचारांवर प्रभाव टाकणाऱ्या विविध घटना व विचारवंतांचा अभ्यास केला.संसदीय लोकशाहीचा स्वीकार करणाऱ्या पंडित नेहरूंनी व्यक्तिविकास, सामाजिक व आर्थिक समानता, मूलभूत हक्कांना प्राधान्य दिले.भांडवलशाहीतील एकाधिकारशाही नष्ट व्हावी यासाठी समाजवादाला महत्त्व दिले.सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी पं.नेहरूंनी भांडवलशाही व्यवस्थेतील एकाधिकारशाहीला घटनात्मक मार्गाने विरोध केला.मोठ्या उत्पादनाच्या साधनांचे राष्ट्रीयीकरण करण्यावर त्यांनी भर दिल्याचे आपण अभ्यासले.भारतीय परिस्थिती विचारात घेवून मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला.पंचवार्षिक योजनेची अंमलबजावणी केली.त्याअंतर्गत सामुहिक विकास प्रकल्प राबविले.परंतु त्यात पाहिजे तसे यश आले नाही.भारताचे पंतप्रधान या नात्याने नियोजनाचा स्वीकार केला.देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी प्रत्यक्षात नियोजनाची संकल्पना आणली. भारताच्या परराष्ट्र धोरणाबाबत त्यांनी बजावलेल्या महत्त्वपूर्ण भुमिकेमुळे‘शांतिदूत‘ म्हणून त्यांना गौरविण्यात आले. मानवतावादी असलेल्या पं.नेहरूंनी शांततेचा स्वीकार केला. साम्राज्यवाद, अलिप्ततावाद ही त्यांच्या परराष्ट्र धोरणातील मुख्य तत्त्वे होती.त्या आधारावर त्यांनी जगासमोर पंचशील तत्त्वे मांडून जगात शांतता, सुव्यवस्था, समन्वय, सहजीवन, सहअस्तित्व